

P५

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



६



# माऊलींच्या जयघोषात रंगले रिंगण

## डोळ्यांचं पारणं फेडणारा संत तुकाराम महाराजांचा पहिला रिंगण सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** पंढरीच्या वाटेवर लाखो भक्तांच्या मुखी 'माऊली... माऊली!'चा गजर कायमच असतो. टाळ-मृदंगाच्या गजरात शिवाय अभंगाच्या लयीत, वारकरी संप्रदायाच्या परंपरेला जागणारा असा हा सोहळा असतो, अशाच भक्तिमय वातावरणात बेलवाडी (ता. इंदापूर) येथे संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील पहिल्या गोल रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या रिंगणात वारकऱ्यांचा भक्तिभाव, पालखीभोवती फिरणारी टाळ-वेगळी दिंड्यांची गर्दी, ढोल-ताशांचा गजर आणि मातीचे उडणारे कण हे सर्व डोळ्यांचे पारणे फेडणारे ठरले.

बेलवाडीतील हे पहिले रिंगण हे विशेष आकर्षण ठरले. पहाटेपासूनच गावात भक्तांची गर्दी उसळली होती. सनई-चौघड्यांच्या निनादात आणि माऊलीच्या जयजयकारात पालखी बेलवाडीत पोहोचली. त्यानंतर ठरलेल्या ठिकाणी रिंगणाची तयारी झाली. अगदी काळजीपूर्वक माती सपाट करून भव्य मैदान तयार करण्यात आले होते. रिंगण सुरू होताच वारकऱ्यांनी उत्साहाने भाग घेतला होता.

संत तुकाराम महाराजांची पालखी रिंगणात येताच वातावरण भारावून गेले. टाळ-मृदंगाच्या गजरात वारकरी जोशात आले. त्यांच्या मुखात ज्ञानोबा-तुकाराम, राम कृष्ण हरीचा अखंड जप सुरूच होता. एकीकडे अभंग गायन, तर दुसरीकडे ढोल-ताशांचे सूर, आणि त्याच वेळी रिंगणात वारकऱ्यांची परिक्रमा हे सर्व दृश्य पाहणाऱ्यांच्या » पान ४ वर



### डोळ्याचे पारणे फेडणारा सोहळा

- अश्वांचे पूजन क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. पालखीच्या अश्वांच्या रिंगणाला सुरुवात झाली ज्ञानोबा तुकारामच्या जयघोष मध्ये मानाच्या अश्वाने पालखीला तीन प्रदक्षिणा पूर्ण करून पालखीचे दर्शन घेतले व डोळ्याचे पारणे फेडणारा रिंगण सोहळा पार पडला.

- अश्वाचा रिंगण सोहळा पार पडल्यानंतर अश्वाची चरणधुली घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली.
- जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा नेत्रदीपक रिंगण सोहळा सुमारे एक तासापर्यंत चालला होता.
- पालखी सोहळ्याचे पहिले गोल रिंगण पार पडल्यानंतर पालखी बेलवाडी येथील मारुती मंदिरामध्ये खांद्यावरून नेण्यात आली.
- मारुती मंदिरामध्ये पंचक्रोशीतील भाविकांनी पालखीच्या दर्शनाचा लाभ घेतला रिंगण सोहळा पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात भाविक उपस्थित होते.

# अनिल परबांकडून खुलासा

## फडणवीस सरकारने काढला जीआर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात त्रिभाषा सूत्र हे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच स्वीकारलं होतं या भाजपच्या प्रचाराला शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब आणि मनसेचे नेते बाळा नांदगावकरांनी पुराव्यानिशी उत्तर दिलं आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना माशेलकर समितीचा अहवाल कॅबिनेटसमोर आला होता. नंतर तो अभ्यास गटाकडे देण्यात आला होता. त्याची पुढे एकही बैठक झाली नाही असा खुलासा अनिल परब यांनी केला. सरकारने जीआर काढल्यानंतरच अशा गोष्टींची अंमलबजावणी होते आणि फडणवीस सरकारने २२ एप्रिल रोजी असा जीआर काढला असा आरोपही त्यांनी केला. त्यामुळे भाजपचा खोटेपणाही समोर आल्याचे ते म्हणाले.



राज्यात पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याला, त्रिभाषा सूत्राला ठाकरे बंधूंनी विरोध केला असून 5 जुलै रोजी या निर्णयाच्या विरोधात संयुक्त मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या निमित्ताने 2006 नंतर दोन्ही ठाकरेंची एकत्रित ताकद दिसणार आहे. त्याचवेळी भाजपने उद्धव ठाकरेंवर आरोप केले आहेत. त्रिभाषा सूत्राच्या अंमलबजावणीचा अहवाल उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच स्वीकारला होता असा आरोप भाजपने केला. त्यावर अनिल परबांनी खुलासा केला आहे.

# पद्मश्री साधूवर बलात्काराचा आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका महिलेने भारत सेवाश्रम संघाचे साधू आणि पद्मश्री पुरस्कार विजेते कार्तिक महाराज यांच्यावर तब्बल १२ वेळा बलात्कार केल्याचा गंभीर आरोप केला आहे. नोकरीचे आमिष दाखवून आश्रमात बोलावून हे घृणास्पद कृत्य केल्याचे महिलेने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणामुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, ही घटना २०१३ सालची आहे. कार्तिक महाराज यांनी तिला मुर्शिदाबाद येथील एका आश्रमाच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी तिला आश्रमात राहण्याची सोयही करून देण्यात आली.

### तेलंगणातील वाघांची संख्या पुन्हा वाढवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल

# 'प्रोजेक्ट टायगर'ला हिरवा कंदील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हैदराबाद :** तेलंगणातील वाघांची संख्या पुन्हा वाढवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्राच्या मदतीनं प्रोजेक्ट टायगर अंतर्गत ताडोबा व्याघ्र प्रकल्पातून वाघांना कवल व्याघ्र प्रकल्पात आणण्यात येणार असून, महाराष्ट्राकडून त्याला हिरवा कंदील मिळाला आहे. तेलंगणाच्या औपचारिक विनंतीनंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. कारण सध्या कवल अभयारण्यात एकही निवासी वाघ नाही. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (एनटीसीए) ची एक टीम जुलैच्या पहिल्या आठवड्यात कवल व्याघ्र प्रकल्पा (KTR)ला भेट देऊन क्षेत्रीय तपासणी अन् अधिवास तयारीचा आढावा घेण्याची शक्यता आहे.



२०१२ मध्ये स्थापन झालेल्या आणि २०१५.३९ चौरस किमीमध्ये पसरलेल्या कवल व्याघ्र प्रकल्पाने मंचेरियल, निर्मल, आदिलाबाद आणि कुमुराम भीम आसिफाबाद जिल्ह्यांचा काही भाग व्यापला आहे. घनदाट जंगलाबरोबरच हरीण, सांबर आणि नीलगायी सारखे मुबलक शिकार असूनही, कवलमध्ये वाघांची संख्या स्थिर नाही. कधी कधी शेजारच्या महाराष्ट्रातून वाघ इथे येतात परंतु कालांतराने ते तिथून निघून जातात.

तेलंगणाच्या आसिफाबाद जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या महाराष्ट्राच्या ताडोबा अभयारण्यात ४० हून अधिक वाघ आहेत, तर जवळच्या इंद्रावती राष्ट्रीय उद्यानात २० हून अधिक वाघ आहेत. अलिकडच्याच एका पत्रव्यवहारात तेलंगणाचे मुख्य वन्यजीव वॉर्डन एलुसिंह मेरू यांनी त्यांच्या महाराष्ट्र समकक्षांना कवल येथे काही वाघ स्थलांतरित करण्याची औपचारिक विनंती केली होती. » पान ४ वर

# कोलकाता प्रकरणात सुरक्षा रक्षकाला अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** कोलकातामधील एका प्रतिष्ठित लॉ कॉलेजच्या कॅम्पसमध्ये एका २४ वर्षीय विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटनेनंतर संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक देखील केली आहे. आरोपींपैकी एकजण हा कॉलेजचा माजी विद्यार्थी आहे, तर दोघे सध्या शिक्षण घेत आहेत. या प्रकरणात पोलिसांनी सुरक्षारक्षकाला अटक केली आहे. मनोजित मिश्रा या प्रकरणी प्रमुख आरोपी आहे. मनोजित हा क्षिण कोलकाता टीएमसीपी (तृणमूल छात्र परिषद) पक्षाचा सरचिटणीस आहे. पोलिसांनी आरोपींना अलीपूर न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना १ जुलैपर्यंतची पोलीस कोठडी सुनावली.

# सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपूल प्रकल्पात विलंब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड रस्त्यावर सुरू असलेल्या उड्डाणपूल प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्याचे काम मुसळधार पावसामुळे अडथळ्यात आले असून, पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार १५ जूनला वाहतुकीसाठी खुला होणारा उड्डाणपूल आता जुलैच्या अखेरीसच कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

या प्रकल्पांतर्गत माणिकबाग ते हिंगणे दरम्यान सुमारे दीड किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल उभारण्यात येत आहे. पुणे महापालिकेने यापूर्वीच या उड्डाणपुलाचे उद्घाटन १५ जून रोजी करण्याची घोषणा केली होती. मात्र, अचानक पडलेल्या मुसळधार पावसामुळे उर्वरित कामांमध्ये अडथळा निर्माण झाला असून, कामाचा वेग मंदावला आहे. त्यामुळे नागरिकांना अजून काही काळ वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार आहे.

संपूर्ण सिंहगड रस्त्यावर ११८ कोटी रुपयांच्या निधीतून तीन टप्प्यांत उड्डाणपूल प्रकल्प राबवला जात आहे. यातील पहिला टप्पा – राजाराम पूल चौकातील उड्डाणपूल – २६ जानेवारी २०२५ रोजी, तर दुसरा टप्पा – विठ्ठलवाडी कमान ते फनटाइम थिएटर उड्डाणपूल – १ मे २०२५ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

मात्र, तिसऱ्या टप्प्याच्या कामास आता पावसामुळे उशीर होत असून, महापालिकेकडून जुलै अखेरपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या विलंबामुळे स्थानिक रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली असून, लवकर उड्डाणपूल सुरू करावा, अशी मागणी केली आहे.

# आयपीएस पराग जैन भारताचे नवे 'RAW' प्रमुख

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताची परकीय गुप्तचर संस्था म्हणून जगभरातही ख्याती असलेल्या रिसर्च अँड ॲनालिसिस विंग (RAW) या संस्थेची नवी धुरा आयपीएस अधिकारी पराग जैन यांच्याकडे सोपवली गेली आहे. १९८९ बँचचे अधिकारी पराग जैन हे ३० जून २०२५ पासून नवा पदभार स्विकारणार आहेत.

रवी सिन्हा यांच्याबदली आता जैन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रवी सिन्हा यांचा कार्यकाळ ३० जूनला संपत आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षांसाठी जैन यांची नियुक्ती सरकारने केली आहे.



पराग जैन यांनी ऑपरेशन सिंदूर मध्ये बौद्धिक क्षमतेचा आधारे गुप्त माहिती गोळा केली होती. त्यांच्या या कामगिरीनंतर आता रॉ ची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे. त्यांनी देशाच्या विविध पातळीवरील सुरक्षा यंत्रणेत काम केले आहे. त्यांचा प्रदिर्घ अनुभव पाहता त्यांची या पदावर वर्णी लागली आहे.

# पुणे जिल्हा राज्यात प्रथम आणण्याकरीता काम करा : मंत्री डॉ. वुईके

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आदिवासी जमातीच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरीता प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान राबविण्यात येत आहे; शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा नागरिकांना लाभ देवून जिल्ह्यात अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन पुणे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्याकरीता प्रशासनाचे काम करावे, याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवून हे अभियान यशस्वीपणे पूर्ण करावे, असे निर्देश राज्याचे आदिवासी विकास विभागाचे मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले.

डॉ. वुईके यांच्या हस्ते जिल्ह्यातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात धनादेश वाटप, कातकरी लाभार्थ्यांना घरकुलांकरीता वनहक्क दावा बहाल करण्यात आले. तसेच भिमाशंकर सेंद्रिय शेतकरी गट निगडाळे, ता. आंबेगाव येथील राईस मिलचे » पान ४ वर



- पुणे शहरात आदिवासी जमातीतील विद्यार्थ्यांकरीता अद्यायवत वस्तीगृह बांधण्याकरीता प्रशासनाने जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, याकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.
- आश्रमशाळेतील पारधी समाजाच्या विद्यार्थ्यांची आधार कार्डाकरीता नोंदणी करावी.
- आदिवासी बांधवांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासोबतच त्यांचे हक्क हिरावून घेणार नाही तसेच कातकरी समाजातील मुले शाळेपासून वचिंत राहणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.
- आदिवासींच्या कल्याणाकरीता राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे डॉ वूईके यांनी सांगितले.

> विकसित भारताकरीता आदिवासींचे योगदान विचारात घेता त्यांच्या सशक्तीकरणाकरिता 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' ३० जून पर्यंत राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीकरीता २५ योजना, १७ विभागाच्या माध्यमातून राबविण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानाअंतर्गत पुणे जिल्ह्यातील ९९ गावांची निवड करण्यात आली असून गावातील पात्र नागरिकांना शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ देण्याकरिता गावनिहाय कृती आराखडा तयार करा. येत्या १५ ऑगस्ट रोजी आयोजित ग्रामसभेत हा कृती आराखडा मंजूर करुन त्यानुसार कार्यवाही करावी. या गावात योजनांची व्यापक स्वरुपात जनजागृती करावी."
>
> **— डॉ. अशोक वुईके,** आदिवासी विकास विभाग मंत्री

## अध्यक्षपदी विजयमाला कदम



**पुणे :** भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार लि.पुणे या संस्थेची सन २०२५-२०३० या कालावधीसाठी नवनिर्वाचित संचालक मंडळ निवडणूक नुकतीच पार पाडली. संचालक मंडळाची प्रथम सभा निवडणूक निर्णय अधिकारी व सहनिबंधक पुणे शहर निलम पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडाराच्या सभागृहात घेण्यात आली. नवनिर्वाचित संचालक मंडळाने सर्वानुमते विजयमाला पतंगराव कदम यांची अध्यक्षपदी तर डॉ. भागवतराव निवृत्ती पवार यांची उपाध्यक्षपदी निवड केली. विजयमाला पतंगराव कदम यांनी १९८५ पासून संचालक म्हणून कार्यरत आहेत. यावेळी डॉ.मंदाकिनी पानसरे, वसंतराव माने, डॉ. भागवतराव पवार, नगरसेवक रामचंद्र कदम, कुलदीप गायकवाड व सरव्यवस्थापक जगन्नाथ शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कुलपती डॉ.शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ.विवेक सावजी, भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, भारती विद्यापीठ रविंद्रनाथ टागोर स्कूल ऑफ एक्सलंसच्या अध्यक्ष स्वप्नाली कदम, सहकार्यवाह डॉ.के.डी.जाधव, डॉ.एम.एस सगरे, व्ही.बी. म्हेत्रे यांनी नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## बेकायदा वास्तव्य; दोन बांगलादेशी महिलांना अटक

**पुणे :** कात्रज भागात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या दोन बांगलादेशी महिलांनी भारतीय पारपत्र, पॅनकार्ड, आधारकार्ड मिळविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी बांगलादेशी महिलांसह तिघांना आंबेगाव पोलिसांनी अटक केली. लिझा मकबूल शेख ऊर्फ खातून तस्लीमा मोफीजूर रेहमान (वय ३०), रिंकीदेवी ऊर्फ खातून तमीना मकबूल मोरल (वय ३८, दोघी सध्या रा. सिद्धिविनयाक सोसायटी, आंबेगाव बुद्रुक, कात्रज, मूळ रा. बांगलादेशी), प्रमोदकुमार चौधरी (रा. फतेहपूर, नालंदा, बिहार) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. यापूर्वी पुणे, मुंबई, ठाणे परिसरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी पकडले होते. बांगलादेशी नागरिकांविरुद्ध पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. आंबेगाव बुद्रुक परिसरात बांगलादेशी महिला वास्तव्यास असल्याची माहिती पोलीस कर्मचारी सागर नारगे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने छापा टाकून लिझा आणि रिंकीदेवी राहत असलेल्या सदनिकेवर छापा टाकला. पोलिसांनी चौकशी केली, तेव्हा दोघींनी भारतीय पारपत्र दाखविले. त्यांच्या घराची तपासणी करण्यात आली असता, त्यांच्याकडे बांगलादेशी पारपत्रही सापडले. पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील, सहायक आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली आंबेगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन चोरमोले, उपनिरीक्षक युवराज शिंदे, नीलेश जमदाडे, सागर नारगे, प्रमोद भोसले, स्वप्नील शर्मा, पूजा खवले यांनी ही कामगिरी केली.



## श्री ज्योतिष संशोधन केंद्र तर्फे 'ज्योतिष साधना महोत्सव'

**पुणे :** श्री ज्योतिष संशोधन केंद्र (जळगाव),पितांबरी प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड ,अभिजीत प्रतिष्ठान, (मुंबई ) यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात 'ज्योतिष साधना महोत्सव ' आयोजित करण्यात आला आहे. २९ जून रोजी सकाळी १० ते दुपारी ०४ या वेळेत विष्णूकृपा हॉल(शनिवार पेठ) येथे हा महोत्सव होणार आहे. कॅप्टन आशिष दामले (अध्यक्ष - परशुराम आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन, प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र) यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे.ज्येष्ठ उद्योजक रविंद्र प्रभुदेसाई हे अध्यक्षस्थानी असतील. श्वेता बोकील या महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा असणार आहेत. डॉ. मिलिंद पांडे (प्र -कुलगुरू, एमआईटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी),आनंद रेखी (संस्थापक आणि राष्ट्रीय अध्यक्ष "राष्ट्रीय मराठी मोर्चा"), अर्चनाताई सरुडकर, गोविंद कुलकर्णी (अध्यक्ष, ब्राह्मण महासंघ),आनंद दवे (अध्यक्ष, हिंदू महासंघ), सुनिल पुरोहित, सरिता पद्मन ('सरिताज किचन' फेम यू ट्यूबर), अतुल जी. अग्रवाल (बुऱ्हाणपूर), रविंद्र जोशी, आकाश जोशी,' तुझ्यात जीव रंगला ' फेम हार्दिक जोशी आणि अक्षया देवधर इत्यादि उपस्थित राहणार आहेत.

## एमपीएससी पदभरती मराठा उमेदवारांना मोठा दिलासा

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील अधीक्षक व तत्सम पदे, सामान्य राज्य सेवा गट-ब या संवर्गातील पदभरती मराठा (कुणबी) उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे या भरती प्रक्रियेसाठी मराठा जातीच्या उमेदवारांना कुणबी दाखला मिळाल्यास इतर मागासवर्गाचा दावा करण्याचा विकल्प आयोगाने उपलब्ध करून दिला आहे. तसे शुद्धिपत्रकच 'एमपीएससी'द्वारे जाहीर करण्यात आले आहे. या भरतीअंतर्गत एकूण ६५ पदे भरली जाणार आहेत. त्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावर २७ जूनपासून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू होणार आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत ११ जुलै पर्यंत असणार आहे. शासन निर्णय २८ मे २०२४ नुसार, अराखीव किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक ईडब्ल्यूएस प्रवर्गातून अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी इतर मागास वर्गाचे ओबीसी जात प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास अशा उमेदवारांना इतर मागास वर्गाचा ओबीसी दावा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## सन्मान शांतीदूतांचा...!



पुणे — सामाजिक क्षेत्रांत कार्यकरणाऱ्या शांतीदूत परिवाराचा ६ वा वर्धापनदिन रक्तदान शिबीर, अवयवदान,ध्यान शिबीर, मान्यवरांना शांतीदूत रत्न पुरस्कार आशा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

## शांतीदूत परिवारचा ६ वा वर्धापनदिन विविध उपक्रमांनी संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सामाजिक क्षेत्रांत कार्यकरणाऱ्या शांतीदूत परिवाराचा ६ वा वर्धापनदिन रक्तदान शिबीर, अवयवदान,ध्यान शिबीर, मान्यवरांना शांतीदूत रत्न पुरस्कार आशा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. एलओसी हॉस्पिटल नीलायम सिनेमागृह चौक येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी सल्लागार विशेष पोलीस महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य विठ्ठल जाधव, शांतीदूत परिवार संस्थापक विद्याताई जाधव, महाराष्ट्र अध्यक्ष तृशाली जाधव, कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्योजक रामदास माने, जीएसटी आयुक्त शिवकुमार साळुंके, संत तुकाराम महाराज यांचे थेट वंशज प्रशांतमहाराज मोरे, आयपीएस निखील पिंगळे, अप्पर पोलीस आयुक्त डॉ.रामदास चावरे, ब्रम्हकुमारी आशा दिदी,आदी मान्यवरांच्या बरोबरच महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलतांना रामदास माने यांनी तरुणांनी उद्योगाची कास धरून स्वतःची व देशाची प्रगती करावी असे प्रतिपादन केले. विठ्ठल जाधव यांनी बोलताना व्यक्तींनी स्वतः पुरते आर्थिक व सामाजिक काम करण्या ऐवजी सर्वांना प्रेमाने सोबत घेवून कार्य करावे असे सांगितले.

# 'युटर्न' चा 'बार फुसका'...!

### अहिल्यानगर मार्गाच्या वाहतूक कोंडीलाच 'गती'

राज्याची राजधानी नागपूरसह अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर या महत्त्वाच्या शहरांना जाण्यासाठी अहिल्यानगर या मार्गाचाच वापर करावा लागतो. विशेष म्हणजे मध्यप्रदेश या महत्त्वाच्या राज्यात जाण्यासाठी याच मार्गाचा वापर करावा लागतो, त्यातच गेल्या काही वर्षांच्या कालावधीत आयटीपार्क आणि अन्य महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे या भागात नागरीकरणात चांगलीच वाढ झाली आहे. त्यामुळे या भागातील वाहतूक कोंडी सातत्याने वाढत आहे; त्याचा त्रास वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यासाठी पोलीस प्रशासनासह महापालिका प्रशासनाने विविध उपाययोजना केल्या, परंतु त्यामध्ये फारसे यश आलेले नाही.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वडगावशेरी व परिसरात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी पुणे महापालिकेने आता ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः नगर रस्त्यावर रोज तासन्तास वाहने अडकून राहतात, परिणामी नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. ही परिस्थिती लक्षात घेता, खराडी-शिवणे नदीपात्र मार्ग पूर्णत्वास नेण्याचे महापालिकेचे प्रयत्न गतीमान झाले आहेत. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी अलीकडेच या मार्गाची पाहणी केली. यावेळी पथविभागाचे अधिकारी व स्थानिक सामाजिक कार्यकर्तेही उपस्थित होते. दीर्घकाळ रखडलेल्या या रस्त्याच्या प्रकल्पाला नवसंजीवनी देण्याचा निर्धार प्रशासनाने व्यक्त केला आहे. खराडी-शिवणे मार्गाचे काम १३ वर्षांपासून रखडलेले असून, एकूण भूसंपादनपैकी फक्त ५० टक्केच प्रक्रिया पूर्ण झाली आहे. उर्वरित भागासाठी जागाधारकांना नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. संपूर्ण रस्त्याची लांबी सुमारे ११.५ किमी असून, यातील ६ किमी भूसंपादन पूर्ण झाले आहे. खराडी गाव ते मुंढवा पूलदरम्यानचा रस्ता सध्या वाहतुकीसाठी खुला आहे.

प्रकल्पातील संगमवाडी ते गुंजन चौक (४ किमी), गुंजन चौकातील ५०० मीटर, आणि वडगावशेरी ते खराडी दरम्यानचा १ किमी भाग अजूनही अधुराच आहे. या भागातील भूसंपादन लवकरात लवकर पूर्ण करून काम सुरू करण्याचा मानस महापालिकेचा आहे.

या रस्त्यासाठी आवश्यक असलेले भूसंपादन पाच ठिकाणी उर्वरित आहे. जागाधारकांशी थेट संवाद साधून त्यांना मोबदल्याचा योग्य पर्याय देण्यात येईल. या संवादातून प्रक्रिया गतीमान होऊन, रस्त्याचे काम लवकरच पूर्णत्वास जाईल. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यास, नगर रस्त्यासह परिसरातील पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहेत. परिणामी वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणावर कमी होईल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका * रस्त्याच्या कामासाठी महापालिकेची पुढील योजना: भूसंपादनासाठी थेट संवाद आणि मोबदल्याचे पर्याय तातडीने उर्वरित प्रक्रियेला गती वाहतूक कोंडीमुक्तीसाठी रस्त्याचा तातडीने वापर

## पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट रखडल्याने सुरक्षेचा प्रश्न



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील रस्त्यांच्या जाळ्याचा कणा मानले जाणारे पूल सध्या धोकादायक स्थितीत असून, त्यांच्या तपासणी व देखभालीकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आकडेवारीनुसार, राज्यभरात एकूण १६ हजार ५१९ लहान-मोठे व ब्रिटिशकालीन पूल अस्तित्वात आहेत. मात्र, यापैकी केवळ ४५१ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले असून, तब्बल १४ हजार ३७५ पूल अजूनही तपासणीपासून वंचित आहेत. गेल्या दहा वर्षांत फक्त १६९३ पूल दुरुस्त करण्यात आले आहेत. उर्वरित हजारो पूल दुरुस्तीची वाट पाहत असून, यामुळे संभाव्य दुर्घटनांचा धोका कायम आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही स्थिती अधिक गंभीर ठरण्याची शक्यता आहे. दुरुस्तीअभावी अनेक पूल वाहतुकीसाठी अयोग्य झाले असून, अतिवृष्टीच्या काळात पूल पाण्याखाली जाण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी सावधानतेचे फलक, बॅरिकेट्स आणि पर्यायी मार्ग ठेवण्याच्या सूचना विभागाने दिल्या असल्या, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या उपाययोजना अपुऱ्या ठरत आहेत. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अडचणींचा सामना करण्यासाठी कार्यपद्धती तयार करण्यात आली असून, त्याअंतर्गत कनिष्ठ अभियंता ते अधीक्षक अभियंत्यांपर्यंत विशिष्ट जबाबदाऱ्या निश्चित केल्या आहेत. मात्र, या जबाबदाऱ्या किती प्रभावीपणे पार पाडल्या जात आहेत, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्यातील पूल आणि रस्त्यांची सुरक्षितता ही केवळ वाहतूक व्यवस्था नव्हे, तर जनतेच्या जीविताचा प्रश्न आहे. त्यामुळे सर्व पुलांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक त्या दुरुस्तीची कामे गतीने पूर्ण करणे, हीच काळाची गरज असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## सकारात्मक आशावादाची पेरणी व्हावी : प्रा. जोशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** धडधाकट व्यक्ती दु:खे सजवतात म्हणून ती दु:खे मोठी होतात. आशा-निराशेच्या खेळात निराशा वरचढ ठरते; पण प्रतिकुलतेतून अनुकुलता, अभावातून प्रभाव निर्माण करणे हाच खरा पुरुषार्थ आहे. सामान्य माणसांना जे उघड्या डोळ्यांनी दिसत नाही ते दिव्यांगांना अंतःचक्षूमुळे आणि जीवनदृष्टीमुळे दिसते. केवळ दृष्टीमुळे नव्हे तर जीवनदृष्टीमुळे जगणे प्रकाशमान होते, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केले. आडकर फौंडेशनतर्फे ज्येष्ठ दृष्टीहीन, मूकबधिर सामाजिक कार्यकर्त्या डॉ. हेलन केलर यांच्या जयंतीनिमित्त दिल्या जाणाऱ्या डॉ. हेलन केलर स्मृती पुरस्काराने ऑल इंडिया ब्लाईंड क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रवी वाघ यांचा गौरव करण्यात आला. पुरस्काराचे वितरण प्रा. जोशी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

नॅशनल फेडरेशन ऑफ ब्लाईंडचे राष्ट्रीय सल्लागार दिलीप शेलवंते यांची प्रमुख उपस्थिती होती. तर आडकर फौंडेशनचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, मैथिली आडकर मंचावर होते. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.




पुणे — आडकर फौंडेशनतर्फे ज्येष्ठ दृष्टीहीन, मूकबधिर सामाजिक कार्यकर्त्या डॉ. हेलन केलर यांच्या जयंतीनिमित्त दिल्या जाणाऱ्या डॉ. हेलन केलर स्मृती पुरस्काराने ऑल इंडिया ब्लाईंड क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रवी वाघ यांचा गौरव करण्यात आला.

# आपलेपणाच्या सूत्रात सगळ्यांना गुंफणे हेच रा.स्व.संघाचे काम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विविधतेने नटलेल्या जगाच्या मुळाशी एकच तत्व आहे. ते ओळखून वागणे म्हणजे आपलेपणा होय. तोच समाजाचा स्थायी भाव आहे. आपलेपणाच्या सूत्रात सगळ्यांना गुंफणे हेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम आहे. माणूस आपलेपणाकडे झुकला तर देवरुप होतो. एकांतामध्ये आत्मसाधना आणि लोकांती सेवा, परोपकाराचे कार्य करणारे आदर्श समाजात आहेत, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी सांगितले. आयुर्वेद भास्कर कै. वैद्य परशुराम य. वैद्य खडीवाले तथा दादा यांच्या उत्तुंग जीवनकार्याच्या आढावा घेणा-या 'दर्शन योगेश्वराचे - आयुर्वेद भास्कर दादा वैद्य खडीवाले' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलपती पद्मभूषण डॉ. शां.ब.मुजुमदार, वैद्य विनायक परशुराम वैद्य खडीवाले, संगीता विनायक वैद्य खडीवाले, डॉ. राजीव ढेरे आदी उपस्थित होते.

भागवत म्हणाले, आपलेपणाची वाट चोखाळणाऱ्या माणसांना तो आप्त समजतो. या आपलेपणानेच सर्वांचे जीवन उजळून निघावे, त्यासाठी कर्तृत्व खर्च करून स्वतःचेही जीवन उजळून टाकण्याची प्रेरणा समाजाला पुढे नेते. त्यातूनच समाजाचे परिवर्तन घडते. विनायक खडीवाले म्हणाले, आयुर्वेद, समाजसेवा, संशोधन यांसह जनकल्याण रक्तपेढी, जनकल्याण नेत्रपेढी, हरी परशुराम औषधालय कारखाना व दवाखाना, निराधार मुलांकरता आधार केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये औषधी वनस्पती उद्यान उभारणी, निराधार महिलांकरता वंदनीय ताई आपटे महिला विकास प्रतिष्ठान अशा अनेक संस्थांची उभारणी दादांनी केली आहे.

### महाराष्ट्रात आयुर्वेद विद्यापीठ हवे : मुजुमदार

आयुर्वेदाचे अनेक जाणकार आणि ज्यांनी आयुर्वेदासाठी आयुष्य वेचले, अशा दिग्गज व्यक्ती पुण्यात आहेत. पुण्यात आजमितीस ३० विद्यापीठे आहेत. आयुर्वेद शास्त्राची ही मोठी परंपरा पुण्यात असूनही पुण्यातच काय महाराष्ट्रात आयुर्वेदासाठी विद्यापीठ नाही, अशी खंत डॉ. शां.ब.मुजुमदार यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, राजस्थान आणि गुजरात मध्ये मात्र विद्यापीठ आहे. पुण्यामध्ये आयुर्वेद विद्यापीठाची नितांत आवश्यकता आहे



# ती जलपरी

*अशा पाणाळल्या वाटा*
*असे धावती ओहोळ*

*झुलुझुलु नाद त्यांचा*
*सुखे ऐकती प्रवाळ*

*अवखळ धारानृत्य*
*चाले निसर्गाच्या दारी*

*त्यात चिंब होते*
*साजिरी ती जलपरी*

# जगातलं सर्वात सुरक्षित घर

आपलं रहातं घर, इमारत सुरक्षित असावी असं प्रत्येकालाच वाटत असतं. म्हणूनच भूकंपप्रवण क्षेत्रात विशेष काळजी घेतली जाते. विशिष्ट पद्धतीने इमारती उभारल्या जातात. अग्निशमन यंत्रणा बसवली जाते. सुरक्षेचे शक्य ते सर्व उपाय केले जातात. मात्र एखादा अणूबॉम्ब पडला तर काहीच खैर नसते. पण जगात अत्यंत सुरक्षित असं एक घर आहे. या घरावर अणूबॉम्बचाही प्रभाव पडत नाही. हे अमेरिकेसारख्या बलशाली राष्ट्राच्या प्रमुखाचं घर असावं, असं तुमच्या मनात आलं असेल. पण हे घर पोलंडमध्ये आहे. विशेष म्हणजे ते एका सामान्य माणसाचं घर आहे. पोलंडच्या राजधानीत रहाणाऱ्या एका माणसाला सर्वात सुरक्षित घर बांधायचं होतं. मग त्याने देशातल्या सर्वात नावाजलेल्या आर्किटेक्चर फर्मकडे याबाबत विचारणा केली. यानंतर कंपनीने बांधलेलं घर बघून कोणीही थक्क होईल. हे जगातलं सर्वात सुरक्षित घर ठरलं आहे. विशेष म्हणजे फक्त एक बटण दाबल्यानंतर हे घर चारही बाजूंनी सिमेंटच्या भिंतींनी बंद होतं. हे घर एखाद्या किल्ल्यासारखं दिसू लागतं. यानंतर कोणीही घरात प्रवेश करू शकत नाही. घरमालकाची इच्छा असेल तर दुसऱ्या मजल्यावरच्या पुलावरून घरात शिरता येतं. घराच्या पुढच्या बाजूला शटरही आहे. पूर्णपणे बंद झाल्यानंतर या घरावर अणूबॉम्बचाही प्रभाव पडत नाही, असा या आर्किटेक्चर फर्मचा दावा आहे.



# या वस्तूंची होत आहे ऑनलाईन विक्री


तुम्ही बऱ्याच वस्तू ऑनलाईन खरेदी केल्या असतील. सर्वसाधारणपणे आपण कपडे, मोबाईल, घरगुती उपकरणं अशा वस्तूंची ऑनलाईन खरेदी करतो. ब्रिटनमध्ये मात्र एक विचित्र वस्तू ऑनलाईन खरेदी केली जाते. ही वस्तू खरेदी करण्याचा विचारही आपण कधी करू शकणार नाही. आता ही कोणती वस्तू असेल असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. ही वस्तू म्हणजे मानवी कवटी! हो, हे खरं आहे. ब्रिटनमध्ये मानवी कवटीची ऑनलाईन खरेदी-विक्री होते. इन्स्टाग्रामवर ऑनलाईन खरेदीचे हे व्यवहार होत आहेत. सर्वसाधारणपणे संशोधन आणि वैद्यकीय कारणांसाठी हाडं आणि कवटीची खरेदी मोठ्या प्रमाणावर होते. ब्रिटनमध्ये मानवी कवटी आणि हाडांच्या खरेदी-विक्रीवर कोणतेही निर्बंध नाहीत. त्यामुळे या वस्तू इथे अगदी सहज उपलब्ध होतात. या वस्तू खरेदी करण्याची इच्छा असणारा ग्राहक वैयक्तिक पातळीवर विक्रेत्याला संपर्क करतो. यानंतर त्यांच्यातले व्यवहार पूर्ण होतात. स्टॉकहॉम विद्यापीठाच्या २०१७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार ब्रिटनमध्ये मानवी कवटी आणि हाडांची बाजारपेठ ४६ हजार पाउंड म्हणजेच जवळपास ४० लाख रुपयांची आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये या बाजारपेठेत वाढ झाल्याचं या क्षेत्रातल्या तज्ज्ञांचं म्हणणं आहे. सध्या ही बाजारपेठ ७० लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे.



# जगाला विनाशापासून वाचवण्यासाठी गाईची निर्मिती

जगाच्या विनाशाबद्दल लोक अनेक वर्षांपासून चर्चा करत आहेत. पृथ्वीच्या नाशाची वेगवेगळी कारणे लोक देतात. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे, की पृथ्वीवर ज्या प्रकारे हवामान बदल होत आहेत, त्यामुळे आजपासून शेकडो वर्षांनी पृथ्वीवर जगणे कठीण होईल. या संदर्भात शास्त्रज्ञ गायीला पृथ्वीवरील हवामान बदलाचे एक कारण मानतात. याबाबत आता शास्त्रज्ञांनी जगाला विनाशापासून सावध करण्यासाठी एक अनोखी गाय तयार केली आहे.

गाईच्या दंशातून विषारी मिथेन वायू बाहेर पडतो, हा हरितगृह वायू आहे, जो पृथ्वीला तापवण्याचे सर्वात मोठे कारण मानले जाते. त्यामुळे पृथ्वी सतत गरम होत आहे. अशा स्थितीत स्कॉटलंडच्या शास्त्रज्ञांनी अशी गाय विकसित केली आहे, जी फार कमी वेळा ढेकर देईल आणि मिथेन वायू फारच कमी सोडेल. यामुळे जगात विनाश घडवून आणणारा काळ वाढवण्याचा प्रयत्न केला जाईल.



गायीचे वासरू भविष्यात जगाला विनाशापासून वाचवेल, अशी चर्चा आहे. अशा आणखी बछड्यांमध्ये बदल करण्याचा शास्त्रज्ञ विचार करत आहेत. हिल्डा नावाच्या या वासराला ग्रीन हाऊस इफेक्टविरोधी म्हटले जात आहे. एकीकडे जगभरातील गायी मिथेन वायूने पर्यावरणाची हानी करत असताना, हे वासरू हरितगृह परिणाम कमी करण्यास मदत करत आहे.

शास्त्रज्ञ अशा बदलांचा विचार करत आहेत, की त्यातून उत्सर्जित होणारा वायू पूर्णपणे शून्य होतो. जगाच्या हरितगृह वायू उत्सर्जनांपैकी सुमारे पाच टक्के गुरे तयार करतात, म्हणून संशोधक त्यांचा प्रभाव कमी करण्याचे मार्ग शोधण्यात व्यस्त होते. त्याअंतर्गत हिल्डा विकसित करण्यात आली.



# चला, वृक्षारोपण करू या

जगभरातच जंगलांचं प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. बेसुमार जंगलतोडीचे परिणाम आता दिसू लागले आहेत. पूर, दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे अनेक लोक बेघर होत आहेत. जागतिक तापमानवाढीची समस्या 'आ वासून' उभी आहे. काही लोक 'झाडं लावा, झाडं जगवा'सारखी मोहीम हाती घेतात, रोपटी लावतात, ती जगवतात. जगभरात विविध दिन साजरे केले जातात. मात्र झाडं लावण्याचा कोणताही दिवस नसतो. असा एक विशेष दिन असणं गरजेचं आहे. या दिवशी लोकांना सुट्टी द्यायला हवी. यामुळे झाडांचं आणि पर्यायाने जंगलांचं प्रमाण वाढेल. तुर्कस्थानमधल्या एका माणसाने ही कल्पना दिली. एनस साहिन असं या माणसाचं नाव आहे. त्याच्या ट्विटला तुफान प्रतिसाद मिळत आहे. 'माझ्याकडे एक कल्पना आहे. आपण राष्ट्रीय वृक्षारोपण दिन साजरा करू या. एक दिवस सुट्टी घेऊन झाडं लावू या, आपण जगापुढे चांगलं उदाहरण ठेऊ या आणि येत्या पिढ्यांना हिरवागार देश भेट देऊ या', असं ट्विट त्याने केलं होतं. तुर्कस्थानच्या राष्ट्रपतींनीही या ट्विटची दखल घेतली आहे. त्यांनी त्यावर सकारात्मक प्रतिक्रिया दिली आणि राष्ट्रीय वृक्षारोपण दिनाला मान्यताही दिली. यानंतर साहिननेही राष्ट्रपतींचे आभार मानले. यामुळे तुर्कीत वृक्षारोपणासाठी सुट्टी मिळणार आहे. मात्र त्याआधीच झाडं लावण्यासाठी असंख्य हात पुढे आले आहेत.

# अनोखं कुंड

भारतासह जगभरातच अनेक रहस्यमय कुंडं आहेत. काही कुंडांमधलं पाणी गरम असतं तर काही कुंडांमध्ये स्नान केल्याने त्वचारोग बरे होतात असंही म्हटलं जातं. मात्र या कुंडांमागचं रहस्य अजूनही उलगडलेलं नाही. असंच असं म्हणतात. एखाद्या भांड्यात उकळणाऱ्या पाण्यासारखं हे दृश्य असतं. दलाही कुंड या नावाने ते प्रसिद्ध आहे. हे कुंड सिमेंटच्या भिंतींनी वेढलं आहे. कुंडातलं पाणी उन्हाळ्यात थंड तर हिवाळ्यात गरम असतं. हा विरोधाभास का, याचाही थांग कोणाला लावता आलेला नाही.



एक चमत्कारी कुंड झारखंडमध्ये आहे. इथल्या बोकारो जिल्ह्यातल्या या कुंडाचं रहस्य भूगर्भशास्त्रज्ञांनाही उलगडता आलेलं नाही. या कुंडाजवळ उभं राहून जोरात टाळ्या वाजवल्या की त्यातलं पाणी आपोआप वर येऊ लागतं, या कुंडातल्या पाण्यामुळे चर्मरोग दूर होत असल्याचं लोकांचं म्हणणं आहे. या पाण्यात गंधक आणि हिलियम वायू असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. दर संक्रांतीला इथे जत्रा भरते. या ठिकाणी लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित असतात.

# २० रुपये चोरले म्हणून...

आपल्या देशात खटले वर्षानुवर्षं प्रलंबित असतात. म्हणूनच शहाण्याने न्यायालयाची पायरी चढू नये, असं म्हटलं जातं. खटला छोटा असो किंवा मोठा, आपल्या देशात न्याय मिळायला बराच वेळ लागतो. असंच काहीसं मध्य प्रदेशमधल्या ग्वाल्हेरमध्ये घडलं. अवघे २० रुपये चोरीचा हा खटला एक-दोन नाही तर तब्बल ४१ वर्षं सुरू होता. अखेर या खटल्याचा निकाल लागला. आरोपीला फक्त चार महिन्यांची शिक्षा झाली. इस्माइल खान या व्यक्तीवर १९७८ मध्ये २० रुपये चोरल्याचा आरोप ठेवण्यात आला. जिल्हा न्यायालयात याविरोधात खटला दाखल करण्यात आला होता. पुढची ४१ वर्षं या खटल्यावर सुनावणी सुरू होती. तारखांवर तारखा पडत होत्या. न्याय काही होत नव्हता. २००४ मध्ये इस्माइलने या खटल्याच्या सुनावणीला उपस्थित रहाणं बंद केलं. त्यानंतर १८ एप्रिल २०१९ या दिवशी पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आणि तुरूंगात डांबलं. जामीन मिळवून देणारं कोणीच नसल्यामुळे त्याला चार महिने तुरूंगात घालवावे लागले. बाबूलाल यांनी इस्माइलविरोधात खटला दाखल केला होता. गेली ४१ वर्षं प्रलंबित असणाऱ्या या खटल्यात आरोपीने शिक्षा भोगली आहे. त्यामुळे हा खटला पुढे सुरू ठेवण्यात काहीच अर्थ नाही, असं न्यायमूर्तींनी त्याला पटवून दिलं. फिर्यादीनेही याला मान्यता दिली आणि इस्माईलच्या मागचा ४१ वर्षांचा ससेमिरा अखेर संपला.





# निरागस कैदी

दुकानात चोरांनी धुमाकूळ घातला असेल, कोणी उगाचच त्रास देत असेल तर पोलिसात तक्रार केली जाते. मात्र न्यूझीलंडमधल्या वेलिंग्टन इथल्या एका दुकानदाराने चक्क दोन पेंग्विनविरोधात पोलिसात तक्रार दिली. गंमत म्हणजे न्यूझीलंड पोलिसांनी या पेंग्विनना ताब्यातही घेतलं. मात्र काही वेळानंतर त्यांना सोडून देण्यात आलं. इथल्या सुशीची विक्री करणाऱ्या दुकानात हे पेंग्विन सारखे घुसत होते. यामुळे दुकानदार खूपच वैतागला होता. त्याने पेंग्विनना बरेचदा बाहेर काढलं. पण ते पुन्हा पुन्हा येत असल्याने अखेर पोलिसात तक्रार द्यावी लागली. पेंग्विनची ही जोडी काही काळ पोलिसांच्या ताब्यात होती. मग त्यांना वेलिंग्टन हार्बरवर सोडण्यात आलं. या ठिकाणी पेंग्विनची ६०० जोडपी रहातात. सध्या पेंग्विनचा प्रजननाचा काळ असल्यामुळे हे पक्षी सुरक्षित जागेच्या शोधात भटकत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. याच कारणासाठी पेंग्विनची ही जोडी दुकानात घुसखोरी करत असावी.

# एक गूढ बेट

पाकिस्तानमध्ये मध्यंतरी एक विचित्र घटना घडली. इथलं एक बेट अचानक गायब झालं. एका रात्रीत बेट गायब झाल्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. २०१३ मध्ये पाकिस्तानमध्ये आलेल्या प्रलयंकारी भूकंपानंतर हे बेट पहिल्यांदा समोर आलं होतं. मात्र आता सहा वर्षांनंतर ते पुन्हा गायब झालं आहे. अंड्याच्या आकाराचं हे बेट २९५ फूट लांब आणि १३० फूट रूंद होतं. समुद्रसपाटीपासून ते ६० फूट उंच होतं. इथले लोक या बेटाला जलजला कोह असं म्हणायचे. जलजला कोह म्हणजे भूकंपामुळे निर्माण झालेला पर्वत. भूकंपादरम्यान टेक्टोनिक प्लेट्सची टक्कर झाल्यामुळे या बेटाची निर्मिती झाल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. भूकंपानंतर हे बेट अचानक दिसू लागलं. यामुळे या परिसरातले लोक पुरते गोंधळून गेले. हे नेमकं काय आहे, हे कोणालाच कळत नव्हतं. मग काही लोक नावेने या बेटाजवळ पोहोचले. या ठिकाणी भरपूर चिखल, माती आणि दगड असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. तसंच काही भागातून मिथेन वायूही बाहेर पडत असल्याचं दिसून आलं. नासाने या भागातले काही फोटो जारी केले आहेत. त्यात हे बेट कुठेच दिसत नाही. त्यामुळे हे बेट गायब झाल्याची चर्चा सुरू आहे. मात्र ६०-७० वर्षांपूर्वीही अशीच एक घटना घडल्याचं काही लोकांचं म्हणणं आहे. हे गूढ आता शास्त्रज्ञांनीच उलगडायला हवं.





# नका करू नासाडी

अनेकजण ताटात घेतलेलं अन्न वाया घालवतात. लग्न किंवा समारंभांमध्ये अन्नाची खूप नासाडी होते. जगभरातली बरीच मोठी लोकसंख्या एक वेळच्या अन्नापासून वंचित असताना होणारी अन्नाची ही नासाडी आपल्याला अस्वस्थ करून सोडते. ही नासाडी रोखण्याचे उपाय काहीजण करतात. अन्न टाकलं नाही तर काही टक्के सवलत देण्याच्या योजना राबवल्या जातात. लोकांना अन्नाचं महत्त्व कळावं यासाठी प्रयत्न होतात. असाच एक प्रयत्न राजस्थानमधल्या जोधपूरमध्ये करण्यात आला आहे. इथे विशेष थाळ्या बनवून घेण्यात आल्या आहेत. लोकांनी अन्न टाकू नये, यासाठी शहरात मोहीम राबवली जात आहे. केटरर्सनी आपल्या थाळ्यांवर ताटात अन्न टाकू नका असे शब्द कोरले आहेत. प्रत्येक थाळीवर हे शब्द कोरण्यात आले आहेत. त्यामुळे या थाळ्या हाती घेतल्यावरच अन्नाची नासाडी न करण्याचा संदेश लोकांपर्यंत पोहोचू शकेल. जोधपूरमध्ये या मोहिमेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अन्नाची नासाडी करू नका असे शब्द कोरलेल्या दोन टन स्टीलपासून जवळपास १० हजार थाळ्या तयार करून घेण्यात आल्या आहेत. सर्वात आधी कुंथूनाथ जैन मंदिरातल्या जयंतीलाल पारेख यांनी एक हजार थाळ्या तयार करून घेतल्या. त्यांनी महाराष्ट्रात अशा प्रकारच्या थाळ्या पाहिल्या होत्या. पारेख यांच्या प्रयत्नांनंतर आता परिसरातल्या विविध समाजांनीही अन्नाची नासाडी टाळण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

At a Glance

## डोंबिवली एमआयडीसीत नवीन रस्त्याची तोडफोड



**डोंबिवली :** डोंबिवली एमआयडीसी फेज १ मधील श्री जी लाईफ स्टाईल कंपनीसमोरच्या नव्याने करण्यात आलेल्या सीमेंट काँक्रीट रस्त्याची अचानक तोडफोड करण्यात आली आहे. या प्रकारामुळे स्थानिक रहिवासी आणि उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या रस्त्यासाठी शासनाने गेल्या तीस वर्षांत पहिल्यांदाच ११० कोटींच्या निधीतून डोंबिवली एमआयडीसीत दर्जेदार रस्त्यांची कामे करण्यात आली. काही दिवसात यांची तोडफोड सुरु झाली आहे. डोंबिवली एमआयडीसी परिसरात अनेक वर्षांनंतर चांगले रस्ते झाले होते. शासनाने केडीएमसी व डोंबिवली एमआयडीसी परिसरातील रस्त्यांसाठी ११० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. तीस वर्षात प्रथमच मंजूर झालेल्या या निधीत एमआयडीसी व केडीएमसी यांचा समावेश होता. मात्र, रस्ते पूर्ण होण्याच्या अवघ्या काही महिन्यांतच काँक्रीटीकरण केलेल्या रस्त्यांची तोडफोड करण्यास सुरवात झाली आहे.

# वारकऱ्यांना आरोग्यासाठी दर्जेदार सुविधा पुरवा : डॉ. नीलम गोऱ्हे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पंढरपूर येथे आषाढी वारीसाठी सर्व यंत्रणांनी परिपूर्ण नियोजन करावे. तसेच वारकऱ्यांना आरोग्य, पिण्याचे स्वच्छ पाणी यासह इतर सर्व दर्जेदार सुविधा पुरवाव्यात अशा सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ निलम गोऱ्हे यांनी दिल्या. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी शनिवारी विधानभवन येथे पूर्व तयारी व नियोजनाची बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या.

यावेळी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्यासह जिल्ह्यातील संबंधित अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मंदिरामध्ये वायुविजनाची योग्य सुविधा निर्माण करावी. विद्युतीकरणाचे काम चांगल्या दर्जाचे करावे. चंद्रभागेच्या पात्रामध्ये असलेल्या खड्ड्यांचे मार्किंग करून त्यांना लालबावटा लावण्यासारख्या उपाययोजना कराव्यात. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. याबैठकीमध्ये स्वच्छता, पिण्याचे पाणी, वाहतूक, एसटी बस, घनकचरा व्यवस्थापन, मैला निस्सारण या बाबींचा आढावा घेण्यात आला.



पंढरपूर शहरातील रस्त्यांवर पुरेशा प्रमाणात विजेचे खांब लावावेत. कोणताही कोपरा, रस्त्याचा शेवटचा भाग अंधारा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. महिलांसाठी स्वच्छतागृहांची चांगली सोय उपलब्ध ठेवावी. परिवहन महामंडळाने गाड्यांचे योग्य नियोजन करावे. एस.टी. विषयी काही तक्रारी असल्यास तसेच एखाद्या महिलेस एसटी बस मधून प्रवास करताना काही अडचण असल्यास तक्रार करता यावी यासाठी एक हेल्पलाईन क्रमांक सुरू करावा आणि त्याची प्रसिद्ध सर्वत्र करण्यात यावी.

- **डॉ नीलम गोऱ्हे,** उपसभापती

### उपसभापती डॉ. गोऱ्हे यांच्या सूचना

- १) रस्त्याने चालताना वाहन चालकांना दिंडीतील वारकरी व्यवस्थित दिसावेत यासाठी रस्त्यांवर विद्युत दिव्यांची व्यवस्था करावी.
- २) शहरात वारी काळात स्वच्छता ठेवण्यासाठी योग्य ते नियोजन करावे.
- ३) घाटांच्या दुरुस्तीचे सुरू असलेले काम लवकरात लवकर मार्गी लावावे.
- ४) घाट बांधताना ते ज्येष्ठ आणि दिव्यांग यांनाही व्यवस्थित चढता आणि उतरता येईल अशा पद्धतीचे बांधावेत.
- ५) भक्त निवासामध्ये दिव्यांग आणि ज्येष्ठ वारकऱ्यांसाठी रॅम्पची व्यवस्था करावी.
- ६) घाटांवर मुलांना, वृद्धांना आणि दिव्यांगांना बेवासर सोडण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे महिला व बालविकास विभागाने घाटांवर पथकांची नियुक्ती करावी.
- ७) सफाई कर्मचाऱ्यांची चांगली व्यवस्था करावी.

# अश्लील चाळे करणाऱ्या भोंदूबाबाला बेड्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आपल्याकडे दिव्य आध्यात्मिक शक्ती आहे, असं भासवून भक्तांच्या मोबाईलमध्ये नकळत एयरड्रॉइड किड्स हा हिडन ॲप भोंदू बाबा इंस्टॉल करायचा. त्यामार्गे महिलांवर तसंच पुरुष भक्तांवर डिजिटल पाळत ठेवायचा. तसंच आपल्या भक्तांना वेश्यागमन, अनैतिक शारीरिक संबंध आणि इतर अश्लील कृत्य करण्यास भाग पाडणाऱ्या ढोंगी बाबाला पिंपरी चिंचवड शहरातील बावधन पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

प्रसाद दादा उर्फ बाबा उर्फ प्रसाद दादा भीमराव तामदार वय 29 वर्ष असं या भोंदू बाबाचं नाव आहे. प्रसाद दादा भीमराव तामदार हा स्वतःला आध्यात्मिक गुरू भासवायचा. त्याने एका तक्रारदाराचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्याची धक्कादायक तक्रार बावधन पोलीस स्टेशनमध्ये दाखल केल्यानंतर बावधन पोलिसांनी प्रसाद दादा भीमराव तामदार या भोंदू बाबाला बेड्या ठोकल्या आहेत.

- प्रसाद दादा भीमराव तामदार याचे सोशल मीडियावर अनेक महिलांना आंघोळ घालताना, महिलांसोबत विचित्र डान्स करत असताना, तसंच महिलांची ओटी भरत असतानाचे व्हिडिओ याआधी देखील वायरल झाले आहेत. पुरुष आणि महिला भक्तांचे शारीरिक आणि मानसिक छळ करण्यासाठी प्रसाद तामदार याने पुण्यातील मुळशी तालुक्यातील सुस गावातील स्वामी समर्थ बिल्डिंगमध्ये चक्क एक मठ उभारला आहे. प्रसाद तामदार विरोधात बावधन पोलिसांनी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व आघोरी प्रथा व जादूटोण प्रमाण गुन्हा दाखल केला आहे. पिंपरी चिंचवडचे डीसीपी बापू बांगर यांनी ही माहिती दिली.

# शिंदे गटाच्या नेत्याविरूद्ध दुसऱ्यांदा विनयभंगाचा गुन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शिंदे गटाचे माजी नगरसेवक मोहन उगले यांच्यावर पुन्हा एकदा विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेने त्यांच्या विरोधात वाईट नजर, मानसिक छळ आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप करत कल्याण बाजारपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे कल्याणच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटाची अडचण वाढली आहे.



मोहन उगले असे शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवकाचे नाव आहे. मोहन उगलेंकडून पीडित महिलेला त्रास सहन करावा लागत होता. मोहन उगले वारंवार पीडित महिलेकडे वाईट नजरेने पाहून मानसिक छळ करत होते, असा आरोप महिलेनं केला आहे. आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जात असल्याचंही पीडित महिलेनं आपल्या तक्रारीत नमूद केलं आहे. याच छळाला कंटाळून पीडितेनं कल्याण बाजारपेठ पोलीस ठाणे गाठले. तसेच मोहन उगले यांच्याविरोधात तक्रार दाखल केली.

# शिक्षकांनी काळाबरोबर आधुनिकतेची कास धरावी : कृष्णकुमार गोयल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खडकी शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे भविष्य हे उज्वल आहे. कारण काळानुरूप स्पर्धेमध्ये टिकणाऱ्या सर्व नवीन अभ्यासक्रमांची सुरुवात संस्थेच्या विविध विभागांमध्ये करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक सर्व आधुनिक व्यवस्था संस्थेने केलेली आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या आरंभीच्या सभेच्या निमित्ताने संस्थेतील सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना संबोधित करताना कृष्णकुमार गोयल बोलत होते.



मार्गदर्शन करताना कृष्णकुमार गोयल सोबत डावीकडून सूरजभान अगरवाल, सुधीर फेंगसे, संजय चाकणे, आनंद छाजेड, अनिल मेहता, राजेंद्र भुतडा, अजय सूर्यवंशी, ज्ञानेश्वर मुरकुटे.

यांप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष अनिल मेहता, सचिव आनंद छाजेड, सहसचिव सुरजभान अगरवाल, संचालक ॲड .अजय सूर्यवंशी, रमेश अवस्थी, राजेंद्र भूतडा,ज्ञानेश्वर मुरकुटे, मधुकर टिळेकर, सुधीर फेंगसे, कमलेश पंगुडवाले उपस्थित होते.

आभार व्यक्त करताना संस्थेचे सहसचिव आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय चाकणे यांनी महाविद्यालयात सुरू झालेल्या नवीन अभ्यासक्रमांची माहिती देत महाविद्यालयाला ऑटोनॉमस दर्जा प्राप्त झालेला असून नवनवीन उपक्रमांसाठी सर्वांचे स्वागत असल्याचे प्रतिपादन केलेयावेळी संस्थेतील सर्व विभागांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते.

हीं संस्था माझी आहे. मी संस्थेचा आहे. विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य हेच माझे ध्येय आणि संपत्ती आहे. या भावनेने प्रत्येकाने काम केले पाहिजे. चांगल्या कामांची कदर करणारी आपली संस्था आहे. त्याच विद्यार्थ्यांना सुसंस्कृत करून जबाबदार नागरिक बनविण्याची सर्वस्वी जबाबदारी ही शिक्षकांची आहे. - **कृष्णकुमार गोयल**

# दिव्यांग जोडप्याचा अनोखा विवाह संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** माणुसकी फौंडेशन व अक्षदा विवाह संस्था यांच्या पुढाकाराने बीड येथील नितिन विमलकुमार जेगावकर, सिंधुदुर्ग येथील रेश्मा संभाजी कदम या दोन्हीही दिव्यांग वधु वरांचा विवाह हिंदू वैदिक विवाह पद्धतीने अतिशय थाटामाटात पार पडला. रेश्माला आई वडिल बहिण भाऊ कोणीही नाही. आत्याने सांभाळ करुन तिला मोठे केले, तर नितीनला फक्त ९० पार केलेली आई त्यामुळे ती या विवाह सोहळ्यास ऊपस्थित राहु शकली नाही.



Goodwill India यांच्या मार्फत संसारोपयोगी साहित्य (झाल), व भोजनाची व्यवस्था कालिदास मोरे यांच्या माध्यमातून करण्यात आली. तर संध्या देशपांडे, भाग्यश्री मोरे, बालकल्याण संस्थेच्या मिनीता पाटिल, युवराज दिसले, मिलन पवार, जयश्री देशपांडे, सुर्योदय वृद्धाश्रमाच्या छायाताई भगत व मायाताई, माणुसकी फौंडेशन च्या रसिका भवाळकर, सामाजिक कार्यकर्त्या ऊज्वला भोसले, मोनिका राऊत, मंगल पराते, निना भालशंकर, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष प्रताप थोरात, दिव्यांग व्यक्तींसाठी काम करणारे हरिदास शिंदे आदी मान्यवर मोठ्या संख्येने वधु वरांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

## दोन दिवसांत पावसाचा जोर वाढणार

**मुंबई :** राज्यात गेल्या दोन दिवसांपासून पाऊस पुन्हा सक्रिय झाला आहे. कोकणपट्टी तसेच मुंबई ठाणे व उपनगरात पावसाची संततधार सुरु होती. मुंबई, ठाणे, पालघरसह तळकोकण आणि विदर्भात आज पावसाचा येलो अलर्ट जरी करण्यात आला आहे.

शनिवारी झालेल्या पावसामुळे विदर्भात शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. हवामान खात्याचा अंदाजानुसार पुढील दोन दिवस पावसाचा जोर कायम राहणार आहे . उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्हांमध्ये पावसाचा तीव्र अलर्ट आहे. तर पुढील दोन दिवसांत मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

# पाकिस्तानी सैनिकांवर आत्मघातकी हल्ला

**खैबर पख्तूनख्वा :** पाकिस्तानमधील खैबर पख्तूनख्वा प्रांतात उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात एक भीषण हल्ला झाला आहे. पाकिस्तानी सैनिकांच्या ताफ्याला लक्ष्य करण्यात आले आहे. या आत्मघातकी बॉम्बस्फोटात तब्बल १३ सैनिक ठार झाले. खैबर पख्तूनख्वा प्रांतातील उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात हा बॉम्बस्फोट झाल्याची घटना शनिवारी घडली.



उत्तर वझिरीस्तान जिल्ह्यात एका ठिकाणी हल्लेखोराने स्फोटकांनी भरलेलं एक वाहन लष्करी ताफ्यावर धडकावल्याचं सांगण्यात येत आहे. या हल्ल्यात तब्बल १३ सैनिक ठार झाले असून १९ नागरिक जखमी झाले आहेत. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तान तालिबानशी (टीटीपी) संलग्न असलेल्या हाफिज गुल बहादूर गटाने घेतली आहे. २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तान ताब्यात घेतल्यापासून पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात हिंसाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे इस्लामाबादने काबुलवर सीमापार हल्ले करणाऱ्या दहशतवाद्यांना आश्रय देण्याचा आरोप केला आहे. मात्र, हा आरोप अफगाण तालिबान नाकारत आहे.

## दरबार बॅन्ड'चे इकबाल दरबार यांचे निधन

**पुणे :** पुण्यातील प्रसिद्ध दरबार बँडचे संस्थापक इकबाल दरबार यांचं निधन झालं. महमंद रफी यांचे चाहते अशी त्यांची ओळख होती. याशिवाय उत्तम सॅक्सोफोन वादक म्हणून त्यांनी नाव कमावलं होतं. मृत्यूसमयी त्यांचं वय ७५ वर्षं होतं. त्यांच्यामागे तीन मुले, एक मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. ऑर्केस्ट्रा ही संकल्पना महाराष्ट्रात रुजवणाऱ्या मोजक्या कलावंतांपैकी एक होते. त्यांच्या वादनाचे संपूर्ण महाराष्ट्रात होते. अनेक बॉलिवूडमधील कलाकारही त्यांच्या वादनाचे चाहते होते. त्यांच्या निधनाने मनोरंजन सृष्टीवर शोककळा पसरली आहे.



# हिंदी भाषा सक्तीचा जीआर काढला का ?

## आदित्य ठाकरे यांचा खळबळजनक सवाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हिंदी भाषेच्या मुद्द्यावरुन राज्यात सध्या रान पेटलं आहे. त्यातच आता युवासेनेचे अध्यक्ष आमदार आदित्य ठाकरे यांनी एक खळबळजनक सवाल उपस्थित केला आहे. भाजपला आणि देवेंद्र फडणवीसांना अडचणीत आणण्यासाठी एकनाथ शिंदे यांनीच हा हिंदी सक्तीचा जीआर काढला आहे का? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. फडणवीसांच्याविरोधात महायुतीच्या सरकारमध्ये काम सरु असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्याचबरोबर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचा राजीनामा घ्यायला हवा, अशी मागणीही त्यांनी केली.



"महायुती सरकार सध्या हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर मविआ सरकारनं काढलेल्या अहवालाबाबत बोलत आहे. पण अहवालानंतर अभ्यासगट स्विकारण्यात आला होता, ही वेगळी गोष्ट आहे. पण आम्ही हिंदी सक्तीचा नाही तर मराठी सक्तीचा जीआर काढला होता. मुंबई महापालिकेत आम्ही SSC बोर्डासह इतर सर्व बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची केली होती. ही हिंदी भाषा किंवा तिसरी भाषा लादण्याचं काम आहे हा जीआर कोणी काढला? उलट ते सध्या आमच्यावरच आरोप करत आहेत, कुठल्या नशेत आहेत कुणास ठावूक? कारण गेल्या तीन वर्षात राज्यात दोन वेगळे मुख्यमंत्री झालेत. सरकारमध्ये ते स्वतः बसलेत पण आरोप आमच्यावर करत आहेत.

- **आदित्य ठाकरे**

पान १ वरून

## पुणे जिल्हा राज्यात प्रथम...

दृकश्राव्यप्रणालीद्वारे उद्धाटन करण्यात आले.

डॉ. वुईके यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील आंबेगाव व जून्नर तालुक्यातील आदिवासी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी, निदान, प्रतिबंधात्मक उपचाराकरीता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव आणि के.ई.एम. रुग्णालय संशोधन केंद्र पुणे यांच्या सामंजस्य करार करण्यात आला. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी महान्याय अभियान आणि प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार उमा खापरे, दिलीप वळसे पाटील, सुनील शेळके, बापूसाहेब पठारे, शंकर मांडेकर, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लिना बनसोड, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त गोपीचंद कदम, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगावचे प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई आदी उपस्थित होते.

## माऊलींच्या जयघोषात रंगले रिंगण

डोळ्यांत पाणी आले. वारकऱ्यांच्या दिंड्या रिंगणात उतरताच भक्ती आणि सामूहिकतेचा अप्रतिम संगम दिसून आला. पारंपरिक पोशाखातील वारकरी, पायात माती, ओठांवर विठ्ठलाचे नाम आणि अंत:करणात भक्तीचा झरा वाहणारे हे क्षण रिंगणात पावलोपावली दिसून येत होते. बेलवाडी ग्रामस्थांनी आणि स्थानिक संस्थांनी या सोहळ्याचे सुयोग्य नियोजन केले होते. रिंगणासाठी स्वतंत्र मैदानाची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, वैद्यकीय मदत केंद्रे, सुरक्षा व्यवस्था, स्वयंसेवकांची तैनाती इत्यादी गोष्टींमुळे कोणतीही अडचण न होता सोहळा पार पडला. सुरक्षितता आणि स्वच्छतेचा आग्रह राखत रिंगणाला आलेल्या हजारो वारकऱ्यांनी संयम दाखवला. सर्वत्र 'जय जय राम कृष्ण हरी'चा जयघोष सुरू होता. या भक्तिरसात न्हालेलं वातावरण हे गावासाठी गौरवाचे क्षण होते.

## 'प्रोजेक्ट टायगर'ला हिरवा कंदील

महाराष्ट्रानेही त्यास सहमती दर्शविली आहे. तेलंगणाने दोन वर्षांपेक्षा जास्त वयाचे किमान एक नर आणि दोन मादी वाघांचा समावेश असलेले पाच वाघ मागितले आहेत, जे जंगलात स्वतंत्रपणे जगू शकतील. याची तयारी करण्यासाठी कवलच्या मुख्य क्षेत्रात असलेले म्हैसमपेट आणि रामपूर ही गावे सुमारे २० किमी अंतरावर स्थलांतरित करण्यात आली आहेत, ज्यामुळे येणाऱ्या वाघांना त्यांचे अधिपत्य स्थापन करण्यासाठी जागा मोकळी झाली आहे.

## लोकलचा भार लवकरच होणार कमी

# कल्याण-भिंवडी मेट्रो ५ चा विस्तार लवकरच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईत गेल्या काही दिवसांपासून लोकल ट्रेनची गर्दी कमी करण्यासाठी राज्य सरकारने नवीन पाऊले उचलली आहेत. अशातच लोकल ट्रेनची गर्दी कमी करण्यासाठी मेट्रो ५ चा विस्तार करण्याचा निर्णय राज्य सरकाने घेतला असून ठाणे-कल्याण-भिंवडी या ठिकाणी मेट्रो ५ चा विस्तार करण्यात येणार आहे. त्यामुळे लोकल ट्रेनची गर्दी कमी होईल असा विश्वास राज्य सरकारच्यावतीने व्यक्त करण्यात आला आहे. तसेच हा विस्तार उल्हासनगर आणि अंबरनाथ पर्यंत केला जाईल अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी महत्वाची बैठक देखील बोलवली होती. भिंवडी शहरातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन परिवहन सेवेच्या गरजा भागविण्यासाठी कल्याण - भिंवडी मेट्रो लाईन प्रकल्प राबविण्यात येत आहे. भिंवडी शहरात मोठ्या प्रमाणात मालवाहतूक होत असते त्यामुळे स्थानिकांना कायमच वाहतून कोंडीचा सामना करावा लागतो.

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) राबविण्यात येत असलेल्या मेट्रो लाईन-5 या प्रकल्पांच्या माध्यमातून ठाणे, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर परिसरातील लाखो नागरिकांना जलद, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध होणार आहे. विकसनशील शहरे आणि औद्योगिक केंद्रे यांच्यासाठी सार्वजनिक वाहतूक आणि रस्ते ही दोन्ही माध्यमे परस्परपूरक असून त्यांची अंमलबजावणी समांतर पद्धतीने केल्यास विकासाची गती वाढेल. त्यामुळे नागरिकांना अधिक फायदेशीर सेवा मिळू शकणार आहे."

- **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

- १) या प्रकल्पांमुळे औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे.
- २) मेट्रो प्रकल्पाचा विस्तार उल्हासनगर पर्यंत वाढवला जाईल.
- ३) विशेष समिती नेमून अभ्यास करतील त्यामुळे अंबरनाथ, उल्हासनगर परिसरात राहणाऱ्या लाखो रहिवाशांचा प्रवास जलद गतीने होणार आहे.

#रा

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar
29•06•2025



**इराण आणि इस्रायलदरम्यानचे युध्द झडले आणि अमेरिकेच्या इराणवरील बाँबहल्ल्यानंतर शांत झाले. मात्र मधल्या काळात परिणामस्वरुप महागाई वाढली आणि तेलाचा व्यापार संकटात येईल, अशी शक्यता बोलून दाखवली जाऊ लागली. आज ही शक्यता दिसत नसली तरी अशा घडामोडींचा जागतिक अर्थकारणावरील प्रभाव हा एक महत्वाचा मुद्दा आहे.**

# आखाती संघर्ष आणि जागतिक झळ

**परामर्श**
हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार
राष्ट्रसंचार





इराण आणि इस्रायलदरम्यानचे युध्द आजघडीला शांत दिसत असले तरी नजिकच्या भविष्यकाळात पुन्हा पेटणार नाही, अशी खात्री आज कोणीच देताना दिसत नाही. हे युध्द त्या दोन देशांमध्ये झडले आणि अमेरिकेच्या इराणवरील बाँबहल्ल्यानंतर शांत झाले. मात्र मधल्या काळात परिणामस्वरुप महागाई वाढली आणि तेलाचा व्यापार संकटात येईल, अशी शक्यता बोलून दाखवली जाऊ लागली. आज ही शक्यता दिसत नसली तरी अशा घडामोडींचा जागतिक अर्थकारणावरील प्रभाव हा एक महत्वाचा मुद्दा आहे. तो सर्वच देशांना सदोदीत लक्षात ठेवावा लागतो. मध्य पूर्व हा जगातील तेल उत्पादनाचा एक प्रमुख भाग आहे. जगातील सुमारे २५ टक्के तेल व्यापार इराण आणि होर्मुझच्या आखातासारख्या त्याच्या आसपासच्या भागातून होतो. इस्रायल आणि इराणमधील युद्ध आत्ता शांत झाले असले तरी पुढे पुन्हा भडकले, तर तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय येऊ शकतो. शिपिंग मार्ग बंद होऊ शकतात आणि तेल टँकरवर हल्ल्याचा धोका वाढू शकतो. यामुळे तेलाच्या किमती गगनाला भिडू शकतात. त्याचा परिणाम अलिकडेच दिसून येऊ लागला होता.

गेल्या काही दिवसांमध्ये तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. कच्च्या तेलाच्या किमती प्रति पिंप ७८ डॉलर्सवर पोहोचल्या. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती वाढू शकतात. परिणामी, सामान्य लोकांचा खर्च वाढेल. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे महागाईदेखील वाढेल. तेलाचा वापर केवळ वाहनांसाठी नाही, तर वस्तूंच्या उत्पादनासाठी आणि ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठीदेखील केला जातो. कच्चे तेल महाग झाल्यास वाहतुकीचा खर्च वाढेल. त्यामुळे अन्नपदार्थ आणि दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढू शकतात. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांवर भार वाढेल. दोन्ही देशांमधील युद्धापूर्वी, महागाई नियंत्रणात असल्याचे दिसून येत होते आणि यामुळेच अलिकडच्या काळात अनेक मोठ्या अर्थव्यवस्थांच्या मध्यवर्ती बँका त्यांच्या देशांमधील बँकांना दिलेल्या कर्जावरील व्याजदर कमी करत होत्या. 'बँक ऑफ इंग्लंड' ने अलीकडेच ब्रिटनचा बेस इंटरेस्ट रेट ४.२५ टक्के केला. भारतीय रिझर्व्ह बँकेनेही अलिकडेच प्रमुख रेपो रेट ५० बेसिस पॉइंट्सने कमी केला. तथापि, ट्रम्प यांच्या 'टॅरिफ वॉर' मुळे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने दर कपात कमी न करता 'जैसे थे' ठेवले आहेत.

आज अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे थांबलेले इराण-इस्रायल युद्ध भविष्यात पुन्हा अनुभवायला मिळू शकते. ते नेहमीच जागतिक व्यापारात अडथळा आणू शकते. होर्मुझची सामुद्रधुनी हा जगातील तेल व्यापाराचा एक प्रमुख मार्ग आहे. दोन्ही देशांमधील तणावामुळे हा मार्ग बंद झाल्यास जहाजांना लांब मार्गाने जावे लागू शकते. यामुळे वस्तूंच्या वाहतुकीचा खर्च वाढेल आणि विम्याच्या किमतीही वाढू शकतात. तेल आयातीवर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. भारतातून कापड, तांदूळ आणि मसाल्यासारख्या वस्तूंच्या निर्यातीवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

अलिकडच्या काळात अनेक विमान कंपन्यांनी मध्य पूर्वेतील उड्डाणे स्थगित किंवा रद्द केली तर काही देशांनी त्यांचे हवाई क्षेत्र बंद केले. मध्य पूर्वेतील सर्वात मोठी विमान कंपनी असलेल्या एमिरेट्सने सांगितले की त्यांनी इराक, जॉर्डन, लेबनॉन आणि इराणला जाणारी आणि जाणारी उड्डाणे ३० जूनपर्यंत स्थगित केली. एतिहाद एअरवेजने अबू धाबी आणि तेल अवीव दरम्यानची उड्डाणे रद्द केली. कतार एअरवेजने इराण, इराक आणि सीरियाला जाणारी उड्डाणे तात्पुरती रद्द केली. मध्यपूर्वेत पुन्हा एकदा भडका उडाल्यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत ताबडतोब दहा टक्क्यांनी वाढ झाली. ३० मे २०२५ रोजी कच्च्या तेलाचे दर ६२ डॉलर प्रति बॅरल इतक्या खाली घसरले होते. परंतु यात वाढ होत दर ७८ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. त्याचप्रमाणे लगेच शेअर बाजारातही घसरण झाली. अर्थात जागतिक अस्थिरता निर्माण झाल्यामुळे सोने दहा ग्रॅमला एक लाख रुपयांवर गेले. बऱ्याचदा आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे येतात आणि शेअर बाजार कोसळतो, तेव्हा गुंतवणूकदार सोन्याकडे वळतात. या वेळी असेच घडले. इस्रायलने इराणच्या दोन तेल आणि नैसर्गिक वायू शुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ले केले. इराण हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे.

कच्च्या तेलाच्या किमती वाढत गेल्यास तेलविक्री कंपन्यांना पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवाव्या लागतात. यामुळे वाहतूक, अन्नपदार्थ तसेच इतर वस्तू महाग होऊ शकतात. इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे सर्वाधिक फटका आधीच कर्जबाजारी असलेल्या पाकिस्तानलाही बसला. तिथे पेट्रोल आणि डिझेलचे भाव भारताच्या तुलनेत दुपटीने वाढले. पाकिस्तानच्या हाय स्पीड डिझेलच्या किमतीत प्रति लिटर सुमारे आठ आणि पेट्रोलच्या किमतीत प्रति लिटर चार रुपये ८० पैसे पाकिस्तानी रुपयांची वाढ करण्यात आली. आता तिथे हाय स्पीड डिझेल २६२ रुपये प्रति लिटर तर पेट्रोल २५८ रुपये प्रति लिटर झाले आहे. अगोदरच युक्रेन-रशिया आणि इस्रायल-हमास संघर्षाचे जगातील वस्तू बाजार किंवा कमोडिटी मार्केटवर विपरीत परिणाम झाले आहेत. इस्रायल-इराण तणावामुळे एका आठवड्यात कच्च्या तेलाचे भाव सोळा टक्क्यांनी वधारले. इराणने होरमुझ सामुद्रधुनी व्यापारासाठी बंद करण्याचे अतिरेकी पाऊल उचलू नये, यासाठी बरेच देश प्रयत्नशील राहिल्याचे गेल्या काही काळात पहायला मिळाले. भारतात ८७ टक्के खनिज तेल आयात केले जाते. त्यापैकी बरेचसे तेल होरमुझच्या मार्गाने आणले जाते. तेलाचे दर वाढले की आयातखर्च वाढून वित्तीय तूट मर्यादेबाहेर जाते. अशा वेळी रिझर्व्ह बँकेला व्याजदरवाढीचा पर्याय स्वीकारावा लागतो आणि तसे झाल्यास उत्पादनवृद्धीवर प्रतिकूल परिणाम होतो.

२०२१ च्या दिवाळीनंतर कच्च्या तेलाचे भाव बॅरलला ८५ डॉलरपर्यंत पोहोचले तेव्हा देशातील पेट्रोल आणि डिझेलचे भावही विक्रमी पातळीवर पोहोचले होते. पेट्रोल आणि डिझेलचा अर्थव्यवस्थेवर व्यापक परिणाम होत असतो. त्यामुळे अन्नधान्यापासून खतांपर्यंत आणि दूध-अंड्यापासून फळे-भाजीपाल्यापर्यंत सर्व वस्तू प्रचंड महाग झाल्या होत्या. तेव्हा टोमॅटो ८० रुपये किलो आणि कोथिंबिरीची एक जुडी सव्वाशे रुपयाला गेली होती. इतकी महागाई कधी कुणी पाहिली आहे का? २०१८ नंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव इतके कधीही वाढले नव्हते. २०२१ अखेर जगभर कोरोनाचे संकट निवळत चालले होते. त्यामुळे अर्थव्यवस्थांना उभारी मिळू लागली. परिणामी, सर्वच वस्तूंची मागणी वाढत चालली आणि त्याचे पर्यवसान इंधनांच्या किमती वाढण्यात झाले. त्यावेळी जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांनी तेलाचे भाव वधारले असतानाही उत्पादनात टप्प्याटप्प्यानेच वाढ करण्याचे ठरवले होते. २०२० मध्ये ब्रेंट क्रुडची किंमत बॅरलला ४२ डॉलर होती. २०२१ अखेर ती दुपटीवर गेली. अशा वेळी मागणीच्या तुलनेत उत्पादन आणि पुरवठा मोठ्या प्रमाणात वाढला असता, तर भाव खाली आले असते. परंतु तेल निर्यातदारांची 'ओपेक' ही संघटना तसेच तेल उत्पादकांचा दुसरा एक समूह यांच्या बैठकीत केवळ प्रति दिन चार लाख बॅरल्सनेच उत्पादन वाढवण्याचा निर्णय झाला.

कोव्हिडच्या काळात अनेक देशांनी प्रवासबंदी असल्यामुळे कच्च्या तेलाच्या उत्पादनकपातीचा निर्णय राबवण्यात आला. परंतु कोविड महामारी संपल्यानंतर मागणीमध्ये लक्षणीय वाढ होत असूनही, तेलसंपन्न देशांनी त्यानुसार उत्पादन वाढवले नाही. सध्या चलनफुगवट्याचा दर २.५ टक्क्यांवर आला असून आणखी पाव टक्क्याने घसरेल, असा अंदाज केंद्र सरकारच्या ग्राहक कामकाज विभागाने व्यक्त केला आहे. परंतु, तेलाचे दर चढे राहिल्यास आणि अतिपावसामुळे पिकांचे नुकसान झाल्यास, भाववाढीचे संकट पुन्हा उद्भवू शकते, हे लक्षात घेतले पाहिजे.

## बेरोजगारी वाढू शकते

- दोन्ही देशांमधील युद्धाच्या बातमीने अलिकडच्या काळात शेअर बाजारातही खळबळ उडाली. याचा भारतीय शेअर बाजारावरही परिणाम झाला. काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे की भीतीपोटी गुंतवणूकदार सोने किंवा चांदीसारख्या सुरक्षित ठिकाणी आपले पैसे गुंतवत आहेत. सोन्याची किंमत वाढली आहे. डॉलर मजबूत झाला आहे. त्यामुळे शेअर बाजारात घसरण दिसून येत आहे. तथापि, या तणावाचा काही बाजारपेठांवर अद्याप फारसा परिणाम झालेला नाही. भारतातील सेन्सेक्स आणि निफ्टी सारख्या भांडवली बाजारावर गेल्या काही दिवसांपासून सातत्याने दबाव दिसतो आहे. युद्धाचा जागतिक पुरवठा साखळीवरही परिणाम होतो. जागतिक पुरवठा साखळी बंद पडल्याने इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स आणि औषधे यासारख्या उद्योगांचे नुकसान होऊ शकते.

---

# आणीबाणी तेव्हाची आणि आताची

**पन्नाशी अनुभवणाऱ्या २५ जून १९७५ च्या आणीबाणीच्या काळात अनेकांची धरपकड झाली, तुरुंगवास भोगावा लागला. मूलभूत अधिकारांचा संकोच झाला. अर्थात तो अनुभव घेणारे आज देशात अघोषित आणीबाणी आहे, असे म्हणतात. तेव्हा सत्ताधाऱ्यांच्या गुर्मीमुळे आणीबाणी लादावी लागली, तर आता विकासाच्या, संस्कृतीच्या नावाखाली वेगवेगळ्या यंत्रणांच्या आधारे आणीबाणी लागू करण्यात आल्याची टीका होत होत आहे.**




**बरोबर ५० वर्षांपूर्वी, २५ जून १९७५ च्या रात्री, भारतीय लोकशाहीवर सर्वात काळा डाग पडला. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारने अचानक संपूर्ण देशात आणीबाणी जाहीर केली. या निर्णयानंतर, नागरिकांचे मूलभूत अधिकार हिरावून घेण्यात आले. वर्तमानपत्रांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली, विरोधकांना तुरुंगात टाकण्यात आले आणि सर्वांचा आवाज दाबण्यात आला. भारतात यापूर्वी दोनदा आणीबाणी लागू करण्यात आली होती, परंतु त्यामागे युद्ध किंवा बाह्य हल्ला अशी ठोस कारणे होती. २६ ऑक्टोबर १९६२ रोजी चीनशी युद्ध झाल्यानंतर देशात पहिल्यांदाच आणीबाणी लागू करण्यात आली. तेव्हा जवाहरलाल नेहरू पंतप्रधानपदी होते आणि बाह्य धोक्यामुळे ती लागू करण्यात आली. ही आणीबाणी १९६८ पर्यंत चालली. १९७१ ची दुसरी आणीबाणी ३ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तान युद्धामुळे लागू करण्यात आली. हे युद्ध बांगलादेशच्या स्वातंत्र्याशी संबंधित होते आणि देशाच्या सुरक्षेला धोका होता. या वेळी व्ही. व्ही. गिरी राष्ट्रपती होते. १९७५ ची तिसरी आणीबाणी २५ जून १९७५ च्या रात्री इंदिरा गांधी सरकारने अंतर्गत अस्थिरतेचे कारण देत अचानक लागू केली गेली, मात्र खरे कारण न्यायालयाचा निर्णय होता.**

**विश्लेषण**
नंदकुमार काळे
राष्ट्रसंचार

पाहता पाहता देशात आणीबाणी लादली गेली, त्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली. ही देशाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील एक अत्यंत महत्वपूर्ण घटना. आज मागे वळून पाहताना या घटनेचे गंभीर पडसाद उमटलेले दिसतात. इंदिरा गांधींनी लादलेली घोषित आणीबाणी अनुभवणारे बडे नेते, ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत आजकाल पुन्हा आणीबाणी अवतरल्याचा आरोप करतात. हे नेते काँग्रेसचेच आहेत असे नाही. शिवाय याविषयी काँग्रेसवाले कोणत्या तोंडाने बोलणार? अर्थात, काही इंदिरानिष्ठ नेते आजही आणीबाणीच्या तत्कालिन अपरिहार्यतेचे समर्थन करतात; पण आणीबाणी ही घोडचूकच होती, अशी कबुली देत बहुतांश काँग्रेसजन या लांच्छनातून स्वतःची आणि पक्षाची सुटका करून घेण्यासाठी धडपडतात. 'सर्व ज्येष्ठ नेते तुरुंगवासात असल्यामुळे आपण भूमिगत राहून आणीबाणीविरुद्ध प्रचारसाहित्य बनवले. त्या वेळी गांधीवादी लोकांसोबत काम करण्याची संधी मिळाली,' असे मोदी सांगतात. 'आणीबाणीचे स्मरण करत गळे काढण्याची आपली प्रकृती नाही. आणीबाणीमध्ये आलेल्या संकटांमध्ये भारताची लोकशाही तावून-सुलाखून निघाली. चोहोबाजूंनी अन्याय होत असताना त्याविरुद्ध लढण्याची एक जिद्द असते. ती मूल्यांसाठी जगण्याची ताकद देते. आणीबाणीतून मिळालेला हा सर्वात मोठा धडा आहे,' असे आणीबाणीविषयीचे मोदी यांचे चिंतन असले, तरी भारतीय जनता पक्षाने ज्या पद्धतीने आणीबाणीविरोधात मोहीम उघडून काँग्रेसला पुन्हा आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची व्यूहनीती आखली आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

मोदी यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये इंदिरा गांधीच्या १९७१ च्या निवडणूक प्रचार आणि व्यवस्थापन तंत्राची माहिती घेतली होती. स्वाभाविकच इंदिरा गांधींनी केलेल्या चुका टाळून सर्वसामान्यांवर आणीबाणी न लादता व्यवस्थेवर आपला वरचष्मा प्रस्थापित करण्यावर त्यांचा भर आहे. इंदिरा गांधी यांच्या पावलावर पाऊल टाकणारे मोदी स्वतःच्या प्रतिमेबद्दल कमालीचे जागरुक आणि सतर्क आहेत. इंदिरा गांधींइतकेच ते महत्त्वाकांक्षीही आहेत. जनधारणा प्रतिकूल होणार नाही आणि जनमानसातील प्रतिमा बिघडणार नाही याची काळजी घेत ते राजकीय अडथळे दूर करण्याच्या प्रयत्नात असतात. इंदिरा गांधींच्या आणीबाणीला त्यांचे पुत्र संजय गांधींमुळे दहशतीचे परिमाण लाभले. इंदिरा-संजय गांधींच्या जोडीच्या तुलनेत मोदी-अमित शहा जोडी अधिक चातुर्याने अघोषित आणीबाणी हाताळत आहे. केंद्रात सत्तेत आल्यानंतर सत्तेतून आणखी सत्ता मिळवत त्यांनी पक्षावर आणि देशातील एकूणच सत्ताकारणावर आपली पकड घट्ट केली आहे.

१२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द केली होती आणि त्यांना सहा वर्षे निवडणूक लढवण्यास मनाई केली होती. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्यासाठी देशभरात निदर्शने सुरू झाली. इंदिरा गांधी यांनी स्वतःला वाचवण्यासाठी आणि सत्तेत राहण्यासाठी राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांना आणीबाणी जाहीर करण्यास भाग पाडले.

ही आणीबाणी पूर्ण २१ महिने म्हणजे २१ मार्च १९७७ पर्यंत चालली. आणीबाणीच्या काळात संविधानाच्या कलम ३५२ अंतर्गत देशातील नागरिकांचे मूलभूत अधिकार रद्द करण्यात आले. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य रद्द करण्यात आले. सरकारच्या परवानगीने प्रत्येक बातमी प्रकाशित करण्यात आली. राजकीय विरोधकांना अटक करून तुरुंगात टाकण्यात आले. त्यात जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांसारखी मोठी नावे समाविष्ट होती. १९७५ ची आणीबाणी अजूनही भारतीय लोकशाहीचा सर्वात काळा अध्याय मानली जाते. ती इंदिरा गांधींच्या हुकूमशाही विचारसरणीचे आणि सत्तेच्या भुकेचे प्रतीक मानली जाते. आजही राजकीय पक्ष या निर्णयासाठी काँग्रेस आणि इंदिरा गांधींना कोंडीत पकडतात. हा असा काळ होता, जेव्हा भारतातील लोकशाहीला जबरदस्तीने बंद खोलीत कैद करण्यात आले होते. इंदिरा गांधींनी संवैधानिक तरतुदींच्या मदतीने आणीबाणी लादली; परंतु आणीबाणीच्या काळात जे काही घडले ते आज औपचारिक घोषणा न करता घडत आहे त्याहून वाईट होते. फरक इतकाच आहे, की आणीबाणीच्या काळात केले गेले ते शिस्तीच्या नावाखाली होते, तर आज विकास आणि राष्ट्रवाद हे मंत्र आहेत. आणीबाणीच्या काळात खुशामत आणि राजकीय ढोंगीपणाच्या मर्यादा ओलांडत तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष देवकांत बरुआ यांनी 'इंदिरा म्हणजे भारत, भारत म्हणजे इंदिरा' असा नारा दिला.

आज भाजपमध्ये रविशंकर प्रसाद, शिवराजसिंह चौहान आणि देवेंद्र फडणवीस यांच्यापासून ते अगदी खालच्या पातळीवरील कार्यकर्त्यांपर्यंत अनेक नेते मोदी यांना दैवी शक्तीचे मूर्त स्वरूप किंवा अलौकिक क्षमता असलेले म्हणून वर्णन करतात. भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी मोदींना देवांचेही नेते म्हटले, तेव्हा इंदिराजींच्या काळातील राजकीय खुशामतीत आणि सध्याच्या खुशामतीत काहीच फरक नसतो, हे लक्षात आले. आज लोकशाहीची रक्षक म्हणता येतील, अशा संघटना कमी आहेत. अनेक राजकीय पक्ष, प्रशासकीय संस्थाही लोकशाही मूल्यांना वचनबद्ध नाहीत. आज पुन्हा एकदा सरकारी मंत्री न्यायालयांना खटले कसे निकाली काढायचे याबद्दल सल्ला देताना ऐकू येतात. न्यायालयांनीही सरकारच्या हेतूंनुसार निर्णय दिले आहेत. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सार्वजनिक व्यासपीठांवर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचे कौतुक करतात; त्यांची विशेष प्रशंसा पंतप्रधान मोदी यांच्यासाठी राखीव असते. एकंदरीत, न्यायव्यवस्था सरकारशी वचनबद्ध झाली आहे. निवडणूक आयोगाची विश्वासार्हता नष्ट झाली आहे. पंतप्रधान आणि त्यांच्या पक्षाच्या सोयी लक्षात घेऊन निवडणुकांचे वेळापत्रक आखले जातात. माहिती अधिकार कायदा जवळजवळ निष्प्रभ झाला आहे. सीबीआय, प्राप्तिकर विभाग आणि अंमलबजावणी संचालनालय यासारख्या संस्था सरकारशी असहमत असलेले विरोधी पक्षनेते, सामाजिक कार्यकर्ते, लेखक आणि बुद्धिजीवींना त्रास देण्यासाठी साधने बनल्या आहेत. या कामातही, न्यायव्यवस्था सरकारला अप्रत्यक्षपणे सहाय्यक म्हणून काम करते.

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माध्यमांची स्थितीही आज चिंताजनक आहे. आज पत्रकारिता आणीबाणीनंतर होती तशी राहिलेली नाही. याचे मुख्य कारण म्हणजे मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांचा या क्षेत्रात प्रवेश आणि माध्यम गटांमध्ये असलेली नफा कमावण्याची स्पर्धा. नफेखोरीमुळे माध्यम संस्था पूर्णपणे जनविरोधी आणि सरकारच्या समर्थक बनल्या आहेत. सरकारी आणि बिगरसरकारी माध्यमांमधील फरक जवळजवळ संपला आहे. व्यावसायिक विचारांमुळे माध्यमांची आक्रमकता आणि निष्पक्षता केवळ कमी होत नाही तर व्यावसायिक, नैतिक आणि लोकशाही मूल्ये आणि नागरी हक्कांबद्दलची त्यांची वचनबद्धता देखील कमी होत आहे. परिणामी, देश एका अघोषित आणीबाणीला सामोरा जात आहे. आसपास कोणीच सुखी, समाधानी दिसत नाही. शासन, प्रशासन यापासून त्रस्त दिसत आहे. हे वास्तव समाज मान्य करेल, तो सूदिन...

## देशाबाहेर आपली प्रतिमा अबाधित राखण्याचे आव्हान

**इंदिरा गांधींच्या आणीबाणीच्या तुलनेत मोदी यांच्या राजवटीतील अघोषित आणीबाणीला मर्यादा आहेत. कारण जमाना बदलला आहे. इंदिरा गांधींची आणीबाणी भोगणारे पंचवीस टक्के लोकही आज देशात नसतील. आणीबाणीनंतर दृढ झालेले अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि इतर मूलभूत हक्क हिरावून घेणे आता शक्य नाही. आज 'सोशल मीडिया' ला काबूत ठेवणेही अवघड आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या सर्व मार्केटिंग तंत्रानिशी देशात आणि देशाबाहेर आपली प्रतिमा अबाधित राखण्याचे आव्हान मोदींपुढे आहे.**

# एक तरी वारी अनुभवावी

पंढरपूरची वारी म्हणजे महाराष्ट्राचा सांस्कृतिक लोकोत्सव होय. या लोकोत्सवा मध्ये लोक पायी चालतात. चालताना टाळ, मृदुंगाच्या साथीने विठ्ठल नामाचा चाललेला गजर ऐकून आसमंत दुमदुमून जातो. भक्तीचा अलोट सागर विठ्ठलाच्या भेटीला जातो. मग आषाढी एकादशीला तो पंढरपुरचे दर्शन घेवून सुखावतो. असे मिळालेले सुख जीवनाला उर्जा देते. अशी उर्जा प्राप्त करण्यासाठी वारकरी संप्रदाय एकमेव अधिष्ठान आहे. वारीमधून उत्तम प्रबोधन घडते. मोठी लोकसंख्या उपलब्ध असल्याने यावारीत प्रबोधनासाठी वेगवेगळे विषय घेत या वारीत वारी घेवून सामील होतात. त्यासाठी एक तरी करावी

पंढरीचा महिमा। देतां आणिक उपमा ॥ संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातून पंढरपूर वारीचा महिमा लक्षात येतो सध्या राज्यातून विठ्ठलाच्या भेटीस अनेक संत पालखीचे प्रस्थान झाले आहे व होत आहे. या वारी बरोबर अनेक दिंड्या विठ्ठल नामाचा गजर करत सहभागी होतात. अश्याच पण इतर वेगवेगळ्या स्वरूपाच्या दिंड्या राज्यभारातून जात आहेत. वारी चालताना धार्मिक सामाजिक, सांस्कृतिक, लोकसेवा पैलूंची ओळख होत जाते. या वारीबरोबर लोकसेवा, पर्यावरण, जनजागृतीचे व्रत घेवून अनेक आगळ्या वेगळ्या दिंडया सहभागी होत प्रबोधन करतात. धार्मिक विचारांबरोबर इतर सेवेचे विचारांचा अंगीकार व्हावा हाच यांचा हेतू असतो. जो विषय आवडला त्या विषमाच्या वारीत सामील होवून प्रबोधन करावे.

## आरोग्यायाची वारी पंढरीच्या द्वारी


निर्मल वारी दिंडी मध्ये पाणी, वीज तसेच शौचालय सुविधातून स्वच्छता राखून निर्मल वारी संपन्न केली जाते. आरोग्यायाची वारी पंढरीच्या द्वारी म्हणत या दिंडीतून वारकर्यांना आरोग्य सेवा देण्याचा हेतू असतो. यात रुग्णवाहिका, आरोग्य पथक, आरोग्य सेवक, आरोग्य दूत, औषध साठा घेवून ठिकठिकाणी पथके कार्य करत असतात. जल दिंडी ही दिंडी साधारण कार्तिकी एकादशीला राज्यभरातून निघते. ही दिंडी नदींच्या मार्गे निघते यात पाणी बचत, जल प्रदूषण रोखणे व पर्यावरण महत्व लोकांमध्ये रुजवणे हेतू असतो. संविधान समता दिंडी मधून संविधान सर्वांपर्यंत पोहचावे उद्देशाने संविधान समता दिंडी महाराष्ट्रभर समाजकल्याण विभाग बार्टी मार्फत दरवर्षी काढली जाते. तसेच समता दिंडीतून राज्यातील पुरोगामी विचार संस्था, पत्रकार, साहित्यिक, कलावंत, शिक्षक सहभागी होत समाजाचे प्रबोधन करतात.

## वारी लोकोत्सवाची परंपरा

महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा असल्याने अश्या अनेक दिंडी तयार करत या वारीत सहभागी होऊन राष्ट्रउद्धाराचे कार्य करत आहेत. समाजात धार्मिक अधिष्ठान रुजवण्याबरोबर सेवाभावी वृत्ती जोपासली जाते. यामुळे मानव सेवा हीच ईश्वर सेवा समजून अशा प्रबोधन दिंड्या कार्यातून मानवीमुल्य जोपासण्याचे कार्य घडते. विविध दिंडयामुळे वारी समृद्ध होत जाते. यातून सामाजिक एकोपा अधिक वाढीस लावण्यास मोलाचा हातभार लागत आहे. आपल्या हातूनही अशी सेवा होईल यासाठी युवकांनी आपला सहभाग घेत वारी अनुभवली पाहिजे. यातून वारी लोकोत्सवाची परंपरा अधिक व्यापक होईल.

## ग्राहक जनजागृती दिंडी

ग्राहक जनजागृती दिंडी सुद्धा काही ठिकाणी काढली जाते. यातून ग्राहकांचे हक्क, जबाबदारी, व फसवणूक या बाबत जागृत करताना शाळा, महाविद्यालयातून प्रबोधन केले जाते. वृक्ष दिंडी मधून लोकाना पर्यावरण संरक्षण, संगोपन बाबत जागरूक करणे. वारी मार्गावर देशी वृक्ष लावणे. यात निसर्ग संस्था, शाळा, महाविध्यालये सहभागी होतात. अक्षर दिंडी सुद्धा काढली जाते.अनेक हौशी कलाकार संतांचे अभंग हाताने लिहून फलक घेवून सहभागी होतात. प्रबोधन दिंडीतून ग्रामसेवक, तलाठी सहभागी होत वृक्षारोपण, बेटी बचाव, प्लास्टिक बंदी, पाणी वाचवा, नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण असे विषय घेत वारीत सहभागी होतात. बीज दिंडी मध्ये शेतकऱ्यांसाठी विविध बियाणे त्यांचे संवर्धन महत्व सांगितले जाते. ग्रंथ दिंडी मधून विविध ग्रंथांचे समाज्याला ज्ञान मिळावे या उद्धेशाने काढली जाते. विध्यार्थी दिंडी अनेक शाळा, महाविध्यालायातून काढली जाते. स्वातंत्र्य, समता व बंधुता हा संदेश रुजावा या उद्धेशाने गावागावांतून काढली जाते.



भक्ती
विठ्ठल वळसेपाटील
राष्ट्रसंचार

# एका हाताने टाळी वाजत नाही..!

**कौटुंबिक वाद विवाद होतात. तसेच प्रेम प्रकरणातही वाद विवाद होतात. ब्लॅकमेलिंगचे देखील प्रकार घडतात. त्यात कधीच कुणा एकाची चूक नसते. कारण, नैसर्गिकरित्या क्रिया आणि प्रतिक्रिया घडत असतात. त्यामुळे कोणत्याही गोष्टीसाठी केवळ कुणा एकाला जबाबदार धरणे अन्यायकारक ठरू शकते. त्यामुळे एखादी गोष्ट जाणीवपूर्वक किंवा अनवधानाने घडली असली तरी टाळी एका हाताने वाजत नाही. दोघेही तेवढेच जबाबदार असतात, असा निर्णय एका प्रकरणात सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.**

एका हाताने टाळी वाजत नाही'हे वाक्य एखाद्या नात्याच्या जबाबदारीबद्दल आणि त्या नात्यात दोघांचाही सहभाग असतो याचा गंभीर इशारा देणारं आहे. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या एका प्रकरणात सुनावणी करताना न्यायालयाने ही संकल्पना केवळ सामाजिक नव्हे, तर कायदेशीर दृष्टीनेही महत्त्वाची असते हे अधोरेखित केले आहे.

लग्नाचे खोटे आश्वासन देऊन शारीरिक संबंध बनवल्याच्या आरोपात अटकेत असलेल्या २३ वर्षीय युवकाला सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. या युवकावर ४० वर्षीय विवाहित महिलेने आरोप केला होता. युवक ९ महिने कारागृहामध्ये राहिला, तरीही त्याच्याविरोधातील आरोप निश्चित झाले नाहीत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने त्याला अंतरिम जामीन दिला आहे. त्याशिवाय याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिल्ली पोलिसांना फटकारले आहे.

न्यायालयाने म्हटले आहे की, जेव्हा महिला स्वतःच्या मर्जीने युवकासोबत गेली होती, मग पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा कसा नोंदवला? एका हाताने टाळी वाजत नाही. तुम्ही भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अंतर्गत गुन्हा कोणत्या आधारे दाखल केला? ती छोटी मुलगी नाही, ४० वर्षांची आहे. हे दोघे एकत्र जम्मूला गेले होते. जेव्हा महिला आणि युवकामध्ये संबंध सुरू होते, तेव्हा ती विवाहित होती. भलेही ती पतीपासून वेगळी राहत होती, परंतु तिचा घटस्फोट झाला नव्हता. नात्यात दुरावा निर्माण झाल्यानंतर कायद्याचा दुरुपयोग करून असे खटले दाखल केले जातात. त्यामुळे ना केवळ कोर्टावर ताण येतो, तर या गुन्ह्यातील आरोपीच्या प्रतिमेवरही डाग पडतो, असे न्यायालयाने म्हटले आहे.

या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने युवकाला अंतरिम जामीन देत काही अटी घातल्या. त्यात त्याने महिलेशी संपर्क करू नये आणि त्याच्या स्वातंत्र्याचा गैरवापर करू नये, असे म्हटले आहे. महिला आणि युवक पहिल्यांदा २०२१ साली सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आले. ही महिला तिच्या कपड्यांचे ब्रॉण्डिंग करण्यासाठी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरचा शोध घेत होती. तेव्हा युवकाने तिला कन्टेन्ट बनवण्यासाठी आयफोनची मागणी केली. त्यानंतर महिलेने जम्मूच्या एका स्टोअरमधून त्याला आयफोन दिला. आरोपीने फोन विकण्यावरून या दोघांमध्ये वाद झाला. त्यानंतर डिसेंबर २०२१ मध्ये आरोपी युवक महिलेच्या घरी आला. २० हजार परत देण्याच्या बहाण्याने तिला शूटसाठी घेऊन गेला. रस्त्यात महिलेवर अत्याचार केला. आरोपी युवकाने अनेकदा ब्लॅकमेल केल्याचा आरोप महिलेने तक्रारीत केला आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी ट्रायल कोर्टात हा खटला चालवण्यास परवानगी देत आरोपीला अंतरिम जामीन दिला आहे.



कायदा
ॲड. गायत्री कांबळे
राष्ट्रसंचार



# लोकशाहीची ताकद व सामर्थ्य

भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ५० वर्ष पूर्ण झाली. बरोबर ५० वर्षापूर्वी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली.

राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता. या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली.

आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले.

सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला. संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते.

४९ वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण.



इतिहास
श्याम ठाणेदार, पुणे
राष्ट्रसंचार



# सामान्य माणसाच्या आयुष्यातील हिंदी!



सध्या वाहिन्यांवर वेगवेगळ्या चर्चा चालू असतात. त्यात सध्या हिंदी भाषेवर खूप गरमागरम चर्चा चालू आहे. अशावेळी विचार आला. की खर म्हणजे सामान्य माणसाला हिंदी जवळची आहे का? आणि असल्यास ती एवढी जवळ कशी आली?

थोडं मागे गेल्यावर आठवल, की लहानपणापासून आपण मनोरंजन म्हणून काय काय पाहिलंय, अथवा ऐकलय, तेव्हा लक्षात असे आले की, जास्ती करून आपण पाहिलेले चित्रपट आणि ऐकलेली गाणी ही हिंदीच होती की, आजही तुम्ही रस्त्यावर प्रत्येक माणसाला विचारले, समजा, तुमचा आवडता हिरो कोण? तर जास्ती करून लोकं हे हिंदी सिनेमातील अभिनेत्यांचीच नावे घेतील. पहिला पाहिलेला चित्रपट कुठला या प्रश्नावरही हिंदी चित्रपटच नाव येऊ शकत, याचा अर्थ आपल्या मातृ भाषेतील काहीच आपण पहात नाही, असा नाही, तर त्या गोष्टींचा प्रभाव आपल्यावर जास्त आहे.

उदाहरणच द्यायचं झाल तर अमिताभ बच्चन चा दिवार आणि शोले अन बाकीही त्याकाळातले सिनेमे, यांचे संवाद साधारण ६०, ७०, ८०,९० च्या दशकात जन्माला आलेल्या आपल्या मराठी लोकांना लक्षात असतात. त्यात मग भर पडते ते ८० आणि ९० च्या दशकात जन्मलेल्या लोकांसाठी सनी देओल आणि नाना पाटेकर यांच्या संवादांची, आम्ही आयुष्यात विसरू शकत नाही. आम्हाला जेवढा अशी ही बनवाबनवी आवडतो तेवढाच क्रांतिवीर आणि तिरंगा आवडतो. त्यात दामिनी चित्रपटातला तो सनी देओल चा'तारीख पे तारीख'हा संवाद तर कुठेही उगाचच काम रखडत असेल तर आठवतोच.


माझा एक भाऊ लहानपणी साधारण तीन चार वर्षांचा असताना चित्रपट कुठला बघायचा यावर कुणी न विचारताच'बंटी और बबली'ची ऑर्डर त्या तिकीट देणारया माणसाला करून आला होता. आणि त्यानंतर त्यातल्या गाण्यांवर थियेटर मध्ये बेभान होऊन नाचला होता. वास्तविक हा माझा भाऊ एरव्ही प्रचंड कुणाशी बोलताना लाजायचा. पटकन बोलायचा नाही, पण थियेटर मध्ये मनापासून एन्जॉय करत नाचला होता. अजून एक गोष्ट म्हणजे माझा तोच भाऊ त्यावेळी चिडला की"ए नासमझ" असं बोलायचा.

आता मला सांगा की, हा शब्द तो कुठल्या पाठ्यपुस्तकात किंवा कुणी त्याला शिकवला होता, कुणीच नाही, पण तरीही त्याच्या तो लक्षात राहिला आणि मुख्य म्हणजे तो कुठे वापरायचा, हे त्याला कळल अगदी योग्य पद्धतीने. तसं बाकी सुद्धा शब्द त्याला चित्रपटातून कळले असतील. हा प्रभाव आहे, आणि हा हिंदीचा प्रभाव शिकून येत नाही.

आज इतका जमाना बदललाय, की समाज माध्यमांच्या जमान्यात प्रत्येक मुला-मुलींच्या कानावर वेगवेगळ्या गोष्टी अधिक वेगाने पडतात. जरी कितीही दुर्गम भागात राहणाऱ्या मुला-मुलीना हिंदीही तशी अनोळखी भाषा नाहीये. तिची बोलायची पद्धत वेगवेगळी असू शकते. एखाद्याच्या हिंदीत मराठी मिसळलेलीही असू शकते. पण तरी पण त्यांना ती हिंदी आपली वाटते हे महत्वाचे.

जसं मागे एक पुढारी"हमारे इस नगर मय जो कचरापट्टी हाय ना उसकू हम जल्दी से जल्दी स्वच्छ कर देगा. आप हमकु गाली मत देना, बल्की मत देना और जितवा देना"असं बोलला होता. त्या नेत्याचा पूर्व इतिहास अभ्यासला असता असं लक्षात आल की ह्याचा आणि हिंदी भाषेचा कधी संबध आलाही नसेल. पण आज तो हिंदी भाषेत खर्ड भाषण करू शकतो. आता हा जेमतेम ४थी शिकलेला पण न शिकताच ह्याच हिंदीवर त्याने दिल्ली सुद्धा गाजवली होती. हे विशेष.... अशी किती उदाहरण आहेत नेत्यांची, ज्यांचा शालेय जीवनात हिंदीचा लवलेशही स्पर्शून गेला नाही. पण नंतर त्या नेत्यांनी स्व अभ्यासाने हिंदी विकसित केली.

बऱ्याच वेळेला दक्षिणेशी आपली तुलना केली जाते, पण फरक आहे, हिंदी फिल्म इंडस्ट्री, ज्याला बॉलीवूड म्हणतात ती मुंबईतच वाढली, रुजली, आणि मोठी झाली, पर्यायाने महाराष्ट्रात ती झपाट्याने मोठी होत गेली. आणि आपल्या जीवनाचा अभिन्न अंग बनली. आणि त्याचमुळे हिंदी सुपरहिट सिनेमे सिंघम सारखे हे आपल्या महाराष्ट्रातच त्याचे चित्रीकरण होते. इतकेच नाही, तर मोठमोठ्या दिग्दर्शकांच्या चित्रपटात मराठी व्यक्तिरेखेला अनन्यसाधारण महत्व असते. कारण एकच हिंदीला आपल्याकडे मोठ्याप्रमाणावर प्रेक्षक आहेत. हिंदी ही भाषा आपल्या नसनसात आहे तिला पहिली पासून शिकण्याची गरज आहे की नाही हे तुम्हीच ठरवा हिंदी चित्रपट आणि गाण्यांच्या प्रभावामुळे आणि समाज माध्यमांमुळे ह्या येणाऱ्या हुशार पिढीला ती येईलच असा विश्वास वाटतो.






सामाजिक
हर्षल आल्पे
राष्ट्रसंचार

# "चोराच्या उलट्या ....."?

**मद्यसम्राट विजय मल्ल्या यांनी नुकतीच राज शमानी या लोकप्रिय यूट्यूबरला चार तासांची प्रदीर्घ मुलाखत दिली. आपण राजकीय सुडाचा बळी आहोत असा दावा त्यांनी केला. मला हवं तर 'फरार' म्हणा पण 'चोर' म्हणू नका असंही आवाहन त्यांनी केले. मराठी भाषेत "चोराच्या उलट्या ........" अशी म्हण आहे. त्याचा प्रत्यय या मुलाखतीत पदोपदी आला. जगभरात दोन कोटी लोकांनी ही मुलाखत पाहिल्याचा "गर्व" विजय मल्ल्या यांना आहे. या पार्श्वभूमीवर या मुलाखतीची शहानिशा.**



आर्थिक
प्रा. नंदकुमार काकिर्डे
राष्ट्रसंचार

विजय विठ्ठल मल्ल्या हे नाव भारतीयांना नवीन नाही. 18 डिसेंबर 1955 ला कोलकाता येथे त्यांचा जन्म झाला. सेंट झेवियर्स कॉलेजमधून वाणिज्य पदवी घेतली. व्यापार,उद्योजक व राजकारण हा त्यांचा व्यवसाय. 1986 मध्ये पहिला विवाह समीरा तय्यबजी यांच्याशी केला. त्यानंतर दुसरा विवाह 1993 मध्ये रेखा मल्ल्या यांच्याशी विवाह झाला. सिद्धार्थ मल्ल्या, लैला मल्ल्या, तान्या मल्ल्या व लीला मल्ल्या ही त्यांची संतती. कर्नाटक मधून 2002 मध्ये जनता दल सेक्युलर व काँग्रेस यांच्या पाठिंब्यामुळे पहिल्यांदा खासदार झाले तर 2010 मध्ये जनता दल सेक्युलर व बीजेपी यांच्या पाठिंब्यामुळे दुसऱ्यांदा खासदार झाले. मे 2016 मध्ये त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. सरकार दरबारी फरार, आर्थिक गुन्ह्यांसाठी भारतात हवी असलेली व्यक्ती अशी नोंद आहे. सध्या लंडन मध्ये त्यांचे वास्तव्य आहे.

2016 मध्ये केंद्र सरकारने तयार केलेल्या दिवाळखोरी आणि दिवाळे संहितेची शक्ती दाखवण्याच्या प्रयत्नात मोदी सरकारने त्यांचे ध्येय गाठले. त्याचे विजय मल्ल्या उत्तम उदाहरण असे वक्तव्य त्यांनी मुलाखतीत केले. राज्यसभेची खासदारकी,मानद डॉक्टरेट आणि राजकीय क्षेत्राबरोबरच अन्य क्षेत्रांशी जवळचे संबंध ठेवून देशात राजकीय प्रभाव निर्माण करणाऱ्या या व्यक्तीला तुरुंगात टाकून कायद्यासमोर कोणीही मोठा नाही हे दाखवण्याचा मोदी सरकारचा प्रयत्न होता. मात्र अटकेपूर्वीच विजय मल्ल्या फरार झाले व लंडन निवासी झाले. त्यांचा पासपोर्ट केंद्र सरकारने जप्त केल्यामुळे त्यांना भारतात परतता येत नाही असाही दावा त्यांनी केला. एवढेच नाही तर माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांनी संसदेला याबाबतची माहिती दिली होती असे मल्ल्या यांनी मुलाखतीत सांगितले आहे. आपण एक "गैरसमजग्रस्त" उद्योजक असून किंगफिशर एअरलाइन्सच्या पतनासाठी उच्च विमान इंधन कर, रुपयाचे अवमूल्यन व इतिहाद एअरवेजला त्यांच्या कंपनीत गुंतवणूक करण्याला भारत सरकारने परवानगी नाकारल्याने आपली कंपनी तोट्यात गेली असे त्यांनी नमूद केले आहे.भारताचे विमान वाहतूक क्षेत्र अनेक वर्षांपासून अतिरेकी नियमन व दंडात्मक कर आकारणी याच्याशी सामना करत असल्याचा त्यांचा दावा आहे. किंगफिशर कंपनी तोट्यात गेलेली होती. मात्र त्याचवेळी इंडिगो आणि स्पाइस सेट यासारख्या विमान कंपन्या नफ्यात होत्या ही गोष्ट सोयीस्करपणे विजय मल्ल्या विसरलेले आहेत.

विजय मल्ल्या यांना 1983 मध्ये वयाच्या 28 व्या वर्षी युनायटेड ब्रुवरीज समूह, किसान प्रॉडक्टस, युबी पेट्रोकेमिकल्स, आणखी काही कंपन्या व प्रचंड मालमत्ता वारसा हक्काने मिळाली. त्यावेळी त्यांनी मोठ्या प्रमाणावर नव्या कंपन्यांची खरेदी सुरू केली. त्यातील बहुतेक सर्व खरेदी आर्थिक अडचणीत आली. त्यावेळी त्यांनी किंगफिशर हा सर्वात लोकप्रिय बिअरचा ब्रँड तयार केला होता. तसेच मॅकडोवेल नंबर 1, रॉयल चॅलेंज, बॅग पायपर सारखे ब्रँड बाजारपेठेत सादर करून भारतीय मद्य बाजारपेठेत वर्चस्व निर्माण केले होते. 1988 मध्ये विकत घेतलेली बर्जर पेंट्स ही कंपनी 250 कोटी रुपयांना कान्साई पेंटस यांना विकावी लागली. 1989 मध्ये विकत घेतलेली बेस्ट अँड क्रॉम्प्टन उत्कृष्ट कंपनी गैरव्यवस्थापनामुळे गाळात गेल्याने 1995 मध्ये त्याची विक्री करणे मल्ल्या यांना भाग पडले. 1990 मध्ये विकत घेतलेली मंगळूर केमिकल्स अँड फर्टीलायझर्स ही कंपनी 1994 मध्ये आजारी म्हणून घोषित करावी लागली. अखेरीस कर्ज फेडीच्या अटीनुसार वन टाइम सेटलमेंट व 135 कोटी रुपयांची व्याजमाफी घेऊन ही कंपनी झुआरी इंडस्ट्रीजला विकण्यात आली. विविध 'किसान' ब्रँडची उत्पादने तयार करणारी कंपनी युनि लिव्हरला विकण्यात आली. या पाठोपाठच त्यांना पिझ्झा कंपनी, कार्बोरेटेड वॉटर कंपनी, टेलिकॉम व आरोग्य सेवा व अन्य काही कंपन्या बंद कराव्या लागल्या.

अनेक राष्ट्रीयकृत बँकांनी कोणत्याही गंभीर इशाऱ्याला न जुमानता कोट्यावधी रुपयांचे कर्जाचे रूपांतरअधिमुल्यल्यासह भाग भांडवलात परिवर्तित केले. त्यावेळी अरुणा राय, प्रशांत भूषण व निखिल डे या त्रयींनी लिहिलेल्या पत्रामध्ये याचा उल्लेख करण्यात आला होता.पण त्याकडे केंद्र सरकार, विविध राष्ट्रीयकृत बँका यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आढळले. यावेळी किंगफिशर कडून इतर युबी समूहातील कंपन्यांकडे निधी वळवण्यात आला होता.सर्व कर्जे फेडण्यात विजय मल्ल्या यशस्वी झाले नाहीत तर त्यांना अनेक राष्ट्रीयकृत बँकांनी डिफॉल्टर घोषित केले होते. त्याचवेळी विजय मल्ल्या लंडनला पळून गेले. यावेळी केंद्र सरकारच्या संबंधित खात्यांनी विजय मल्ल्या यांची मालमत्ता व शेअर विकून टाकून 14 हजार कोटी रुपये वसुली केली होती. मल्ल्या यांच्यावर 6200 कोटी रुपये कर्जाचा बोजा होता. मल्ल्या यांचा दावा होता की त्यांच्या कर्जापेक्षा जप्त केलेल्या मालमत्तेचे मूल्य खूप जास्त आहे. किंगफिशर ची अश्लील कॅलेंडर, वैभवशाली जीवनशैली व निर्णयांची अपरिपक्वता या काळात वाढलेली होती. त्यामुळे जनतेत मोठ्या प्रमाणावर असंतोषही निर्माण झालेला होता. त्यांच्या कंपन्यांना बँकांच्या कर्जातून बाहेर काढण्यासाठी विजय मल्ल्या त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेतून किमान 4000 कोटी रुपये देणार होते. प्रत्यक्षात ही रक्कम कधीच दिली नाही. परदेशातून कर्जफेड करण्याची तयारी दाखवली. तोपर्यंत सर्व गोष्टींना खूप उशीर झालेला होता. दिवाळखोरी कायद्याने इतर अनेक मोठ्या कर्जबुडव्यांच्या तुलनेत विजय मल्ल्याकडून जास्त वसुली केली आहे.

"मी गुन्हेगार नाही," असे त्यांनी सांगितले. "मी नोकऱ्या निर्माण केल्या, ब्रँड निर्माण केले आणि मला शक्य असलेला प्रत्येक पैसा परत करण्याची ऑफर दिली." त्याला एफईओ कायद्यांतर्गत फरार आर्थिक गुन्हेगार म्हणून घोषित करण्यात आले होते, जे भारतातील या कायद्यांतर्गत पहिलेच प्रकरण आहे.

**युक्त्यांचा राजा :** 2003 त्यांनी अत्यंत महत्त्वाकांक्षी किंगफिशर एअरलाइन्स कंपनी स्थापन केली. ती प्रत्यक्षात 2005 मध्ये सुरू झाली. आंतरराष्ट्रीय उड्डाण हक्क मिळवण्यासाठी त्यांनी एअर डेक्कन कंपनी ताब्यात घेतली. त्यांनी संपत्तीची मोठ्या प्रमाणावर उधळपट्टी केली ही बाब नाकारता येणार नाही. त्यांच्या चुकीच्या निर्णयाचा मोठा आर्थिक फटका त्यांच्या कंपनीला बसला. त्यावेळी तेलाच्या किमती वाढल्या, महसूल कमी झाला आणि कर्ज वाढत राहिले. परिणामतः किंगफिशर एअरलाइन्सचे 12 वाजले. त्यांना 7000 कोटी रुपयांचे प्रचंड नुकसान झाले. या नुकसानीतील कंपनीला आर्थिक सवलती मेळाव्यात म्हणून विजय मल्ल्या यांनी अत्यंत भयंकर युक्त्या वापरल्या. सातत्याने विविध उड्डाणे रद्द करणे, कर्मचाऱ्यांना पगार न देणे असे प्रकार केले. यावेळी स्टेट बँकेसह अनेक राष्ट्रीयकृत बँकांनी विजय मल्ल्या यांना भरभरून कर्ज दिली होती. या विमान कंपनीने कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी दिला नाही तसेच उद्गम स्रोतावरील कर वजावट रक्कम सरकारला भरली नाही. त्या रकमेचा अपहार केला. त्यामुळे कर अधिकाऱ्यांनी त्यांची खाती गोठवली.सेवा कर, विक्री कर आणि कर्मचाऱ्यांचे पगार मोठ्या प्रमाणावर विलंबित झालेले होते. 2012 मध्ये किंगफिशर एअरलाइन्स चे काम बंद पडले. त्यांनी त्यावेळी 9000 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे स्टेट बँकेसह विविध राष्ट्रीयकृत बँकांचे कर्ज बुडवलेले होते. 2016 मध्ये त्यांनी साठावा वाढदिवस भव्य प्रमाणात केला. 2011 मध्ये व्हेरिटास नावाच्या कॅनडियन संशोधन कंपनीने किंगफिशर एअरलाइन्स बाबत धोक्याची घंटा वाजवली होती. ही कंपनी दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असल्याचे नमूद केले होते. कंपनीचे भाग भांडवल नष्ट होऊन कशीबशी कंपनी चालू होती.



प्रत्यार्पणाचे प्रयत्न आणि न्यायालयीन खटले चालू आहेत. या मुलाखती द्वारे त्यांनी स्वतःला निर्दोष असल्याचे सांगत आपण देश प्रेमी आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न केला. एव्हढेच नाही तर किंग फिशर कर्मचाऱ्यांची माफी त्यांनी या मुलाखतीत मानभावीपणे मागितली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने त्यांची बाजू पुढे मांडण्याची गरज असून विजय मल्ल्या यांच्या डाव्याबाबत वस्तुस्थिती मांडण्याची निश्चित गरज आहे. त्यांची मुलाखत लबाड पणाची असून सत्य चव्हाट्यावर आणले पाहिजे. अर्थात यात केंद्र सरकारची चूक असेल तर तीही प्रांजळपणे कबूल करण्याची हिम्मत मोदी सरकारने दाखवली पाहिजे. फुटबॉल खेळात जसा सेल्फ गोल असतो तसा या प्रकरणात मोदी सरकारचा होऊ नये ही अपेक्षा.

---

**वीणा वर्ल्डसोबत नैनिताल मसुरी ट्रीपचं एप्रिल शेवटच्या आठवड्यात बुकींग केलं खरं पण अचानक पहेलगाम हल्ल्याची बातमी आली.भारत पाकिस्तान युद्धाचे ढग जमा झाले.ब्लॅक आऊट ट्रेनिंग सुरू होतं न होतं तोच भारताने सर्जिकल स्ट्राईक केलं आणि एक प्रकारे युद्धच सुरू झालं.खरं तर सीमेवर हल्ले सुरू करून पाकिस्ताननेच युद्धाला सुरूवात केली होती.अशा परिस्थितीत बाहेर फिरायला जाणं म्हणजे अवघड होतं.पण उत्तराखंडमध्ये काहीही अडचण नसल्याने जायचं फायनल केलं.**

# उत्तराखंड अनुभवताना..



भटकंती
डॉ.कीर्ती शशिकांत जाधव
राष्ट्रसंचार

टूरसाठी भरपूर खरेदी झाली. पुण्यातून रात्री दोन वाजता फ्लाईट होतं.दिल्लीत साधारण पहाटे साडेचारला पोहोचलो. फ्रेश झालो. एक्झिटला वीणा वर्ल्डचे दूत आमच्या स्वागताला तयार होते. चार पाच दिवसांसाठी बसमध्ये खाता येतील असे ड्राय स्नॅक्स देऊन आमच्या खाद्ययात्रेला त्यांनी सुरुवात केली. आलेल्या सर्वांची नोंद टूर मॅनेजर यज्ञेश वैद्य यांनी घेतली. काही सूचना दिल्या आणि काही अंतरावर बस उभी होती त्याठिकाणी जाण्यास सांगितले.आपापल्या सीटवर सगळे स्थानापन्न होऊन नैनितालच्या दिशेने प्रवास सुरू झाला.बसमध्ये आम्हांला संपूर्ण टूरची माहिती देण्यात आली.दुपारी नाझियाबाद येथे जेवणाचा आस्वाद घेतला आणि पुन्हा प्रवास सुरू झाला. सगळे रात्री जागरण झाल्यामुळे दमलेले होते. हा प्रवास कधी डुलक्या काढत तर कधी खिडकीतून दिसणारी उत्तर प्रदेशातील गावे पाहत पार पडला. जेव्हा घाट सुरू झाला तेव्हा खोल दिसणा-या द-या आणि पर्वतरांगा पाहून सगळे हरखून गेले. आपोआपच ते सुखद क्षण कॅमेऱ्यात कैद होऊ लागले. साधारण दोन तासात घाट पार करून भवालीमधील 'क्लार्क्स इन' रेस्टॉरंटला पोहोचलो आणि निवांत झालो.

वीणा वर्ल्डसोबत ही आमची पहिलीच टूर. भवालीमधलं 'क्लार्क्स इन' हे देखणं 3 स्टार रेस्टॉरंट. इथे आल्यापासूनच खूप आरामदायक वाटत होतं. जागा बदलली की झोप न येणा-या माझ्यासारखीला रात्री मस्त झोप लागली.आज ट्रीपचा साईट सिईंगचा पहिलाच दिवस होता. सकाळी जाग आल्यावर खिडकीतून पहिल्यांदा दर्शन झालं ते उंचच्या उंच वृक्षराजींचं. रोपवेचा अनुभव खूप छान होता.नऊ दहा जणांचा ग्रुप असल्याने भिती कमी झाली.अवाढव्य निसर्ग ,खोल द-या, विस्तीर्ण नैनी लेक पाहून डोळ्याचे पारणे फिटले.त्यानंतर 360 हा थरारक तरीही निसर्गाचं विलोभनीय दर्शन घडवणारा अनुभव होता.

लाईफ जॅकेट घालून बोटींगचा अनुभव अविस्मरणीय होता.संथ पाण्यावरचा हा जलविहार अतिशय सुखद होता तरीही बोट चालवणा-यांच्या कष्टाची जाणीव झाली.वर आल्यावर यज्ञेश वैद्य यांनी देशमुख उभयतांना त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त छोटंसं सेलिब्रेशन करून सर्वांनाच सुखद धक्का दिला.

टूरचा तिसरा दिवस होता.आधीच यज्ञेश यांनी कल्पना दिल्याप्रमाणे छोटासा प्रवास म्हणजे जवळपास ३६० कि.मी.चा प्रवास मसुरीला पोहोचण्यासाठी करायचा होता.त्यामुळे दिवसभर केवळ प्रवास, प्रवास आणि प्रवासच करावा लागणार याची मानसिक तयारी होती. भवालीमधल्या क्लार्क्स इनमधून नाश्ता करून बाहेर पडलो.कालाढुंगी ( नाव जरा विचित्रच )स्थित जिम कॉर्बेट म्युझियमला पोहोचलो. सुरूवातीलाच चिली आणि रूद्राक्षाच्या झाडांनी आमचं लक्ष वेधून घेतलं.जिम कार्बेट यांचं राहतं घर अर्थात म्युझियम पाहून खूप भारी वाटलं. ज्या भूमीवर अशा महान व्यक्तींचं वास्तव्य होतं तिथे वावरताना मन अलगद त्या काळात जाऊन पोहोचलं.त्यांच्या अफाट आणि अचाट कार्याची माहिती मिळाली.तेथून जवळच फ्रूट सॅलड आणि शिकंजीचा आस्वाद घेऊन तसेच थोडीफार खरेदी करून निघालो.तिथून पुढे नाझियाबादपर्यंत प्रवासच प्रवास होता.या प्रवासात गेम आणि गाण्याच्या भेंड्यांनी रंगत आणली. नाझियाबादमध्ये ड्रीम रेस्टॉरंटमध्ये जेवणाची सात्त्विकता सर्वांनी अनुभवली आणि आणखी किती तास असे प्रश्न एकमेकांना विचारत प्रवास सुरू झाला.प्रवासात गुगल बाबाने उत्तराखंडच्या दोन भागांची (कुमाऊ आणि गढवाल) माहिती पुढ्यात ठेवली. विष्णूचा कूर्म अवतार येथे झाला. कूर्मांचल वरून पुढे कुमाऊ नाव पडलं.गढवाल अर्थात गडांचा मालक.गढवाली लोकं अध्यात्मिक तर कुमाऊ अधिक कलात्मक असतात.अशी बरीचशी माहिती मिळवत प्रवास चालू होता.

हरिद्वारला बसमधूनच गंगादर्शनाचा लाभ झाला.ज्या पवित्र नदीचा उल्लेख वर्षानुवर्ष ऐकतोय ती प्रत्यक्षात पाहून आनंद झाला.त्यानंतर देहरादून हे प्रसिद्ध शहर लागलं.या शहराचा अफाट विस्तार डोळ्यात साठवत मसुरीपासून अलिकडे एक तासाच्या अंतरावर चहा घेण्यासाठी थांबलो. तेथून पुढे घाट सुरू झाला.अंधार पडत गेला आणि दिव्यांच्या झगमगाटात न्हाऊन निघालेलं देहरादून शहर पाहून डोळ्यांचे पारणे फिटले.घाट पार करत मसुरीला पोहोचल्यावर सायकल रिक्षातून अलिशान ट्युलिप इन वर पोहोचलो आणि सगळा थकवा कुठल्याकुठे पळून गेला.फ्रेश होऊन सुंदर जेवणाचा आस्वाद घेत आजच्या दिवसाची सांगता झाली.

नैनिताल,मसुरी ट्रीपचा चौथा दिवस होता. पहाटे साडेपाचला बाहेर उजाडलं होतं. केम्टी वॉटरफॉल हे आजचं मुख्य आकर्षण होतं.भरपेट नाश्ता करून निघालो.सायकल रिक्षा करून पटापट गांधी चौकात आलो.तेथून काही अंतरावर बस उभीच होती.बसमध्ये जाऊन बसताच यज्ञेश यांनी नेहमीप्रमाणे गणपती बाप्पाचा जयजयकार करून आजच्या दिवसाचा श्रीगणेशा केला.विशेष म्हणजे सुरूवातीलाच त्यांनी मसुरी हे नाव येथे आढळणा-या मंचुर फुलांमुळे पडले,असे सांगितले. शिवाय ब्रिटीश लोक या धबधब्याजवळ कॅम्प टाकून टी पार्टी करत असत.त्यामुळे याला केम्टी वॉटरफॉल असे नाव पडले.अशी सुंदर माहिती दिली.काही वेळात रोप-वे ने धबधब्याजवळ पोहोचलो.नयनरम्य कोसळता धबधबा पाहून भिजण्याचा उत्साह अनावर झाला परंतु खाली साठलेल्या पाण्याच्या शुद्धतेबाबत शंका आल्याने आम्ही आपलं मनातल्या मनातच चिंब भिजून घेतलं.धबधबा दिसेल असे फोटो काढून दुधाची तहान ताकावर भागवली.पण तरीही वातावरण खूप थंड आणि आल्हाददायक असल्याने सगळे खूष होते.काहींनी ॲडव्हेंचर गेम खेळून टूरचा आनंद आणखी वर्धित केला.त्यानंतर आईस्क्रीम खाऊन आम्ही गढवाली वेषात फोटो काढण्याची हौस भागवून घेतली.रोप-वे ने पुन्हा खाली आलो.आज बसपर्यंत मात्र खूप चालावं लागलं त्यामुळे दमून गेलो.कधी एकदा हॉटेलवर जाऊन विश्रांती घेतोय असं होऊन गेलं..

पूर्वी घड्याळ नसल्याने मसुरीमध्ये गनचे बार उडवून लोकांना वेळ कळण्याची सोय ब्रिटीशांनी केली होती.अशी माहिती यज्ञेश यांनी दिली.रोप-वेने गन हिल पॉईंटला पोहोचलो.सात हजार फूट उंचीवर असलेलं हे ठिकाण. हवा थंड जाणवत होती. किरकोळ खरेदी करून यज्ञेश यांनी बनवलेल्या कुल्हड चहाचा आस्वाद सर्वांनी घेतला.

टूरचा पाचवा दिवस होता.आधीच सांगितल्याप्रमाणे हॉटेलमधून ५.५० ला चेक आऊट करायचं होतं.त्यामुळे सगळेच काळजीने लवकर उठून आवरून रिसेप्शनला आले. सगळ्यांच्या बॅग्जही तयार होत्या.सायकल रिक्षातून गांधी चौक आणि तेथून बसने मसुरीला बाय बाय करत सगळे घाटातून दिसणारं निसर्ग सौंदर्य पाहण्यात मग्न झाले.काही अंतरावर श्री प्रकाशेश्वर मंदिर लागले.पुढे गंगा माता मंदिर,राधाकृष्ण मंदिर,शिवालय, लक्ष्मण मंदिर (भारतातील एकमेव),लक्ष्मण झुला या सर्व ठिकाणी अध्यात्मिक इतिहास ऐकत सर्वांनी दर्शन घेतले.

त्यानंतर उत्तराखंड सरकारकडून मान्यता मिळालेले इस्कॉनप्रणीत रत्ने,रूद्राक्ष आणि स्फटिक यांचे अनमोल दालन पहायला मिळाले. शर्मा यांच्याकडून एकमुखी रुद्राक्ष त्याचे दर्शन आणि त्यासंबंधी मौलिक माहिती मिळाली.नवरत्नांच्या आणि स्फटीकांच्या माळा पाहून हरखून जायला झालं. हॉटेलच्या बाहेर चोटीवाला माणूस हे एक आकर्षण होतं.त्याचं कारण विचारलं असता इ.स.१९५३ पासून त्यांचं हॉटेल सुरू झालं.त्यावेळी सगळे वेटर चोटीवाले होते.त्यामुळे या हॉटेलला चोटीवाला रेस्टॉरंट असं नाव पडलं.अशी माहिती मिळाली.जेवण अतिशय उत्तम होतं.राफ्टींगला गेलेला ग्रुप येईपर्यंत बाकीचे जेवून निवांत थांबले. त्यानंतर सर्वजण बोटीतून पैलतीरावर गेले आणि बसमधून हरिद्वारकडे रवाना झाले.सात वाजता हरिद्वारला पोहोचताच गंगाआरती पाहण्यासाठी सर्वजण उत्सुक होते. गंगाआरतीचे काठावरील भारावलेले वातावरण आणि दिव्यांनी सजलेल्या काठाचे विहंगम दृष्य डोळ्यात साठवत सर्वजण मुक्कामी परतले.टूरच्या नियोजनातील हा अंतिम टप्पा होता.तो पार पाडल्यानंतर सर्वांना परतीचे वेध लागले असावेत,

---

# पावसाचा आणि फॅशनचा मिलाप

**"एक लडकी भिगीभागी सी..." – या ओळी जशा ऐकताना मनात नजाकतीचं चित्र उमटतं, तसंच काहीसं आजच्या पावसाळी सौंदर्यात दिसून येतं. हलकासा सरींचा स्पर्श, कुंद हवेत मिसळलेला अत्तराचा सुवास, आणि त्यात एक तरुणी – हलकीशी साडी सावरत, पायात रंगीत प्लास्टिकच्या चपला घालत, आत्मविश्वासाने भिजत जात असते. हे सौंदर्य केवळ नजरेत नाही, तर तिच्या व्यक्तिमत्त्वात झळकते. पावसाळा म्हणजे सौंदर्याचं नवं परिमाण. चकाकणाऱ्या ऊनाप्रमाणे भडक नाही, तर हलक्याशा धुंदीत मिसळलेलं – अगदी कोऱ्या कॅनव्हासवर पसरलेल्या रंगांच्या पावसासारखं. या हंगामात सौंदर्य म्हणजे साजणं नाही, तर सहजपणे उलगडणं. आणि ही उलगडणं प्लास्टिक फुटवेअरपासून सुरू होते.**



फॅशन
ज्योती हांडगे, पुणे
राष्ट्रसंचार

### प्लास्टिक फुटवेअर: ट्रेंडीचा, प्रॅक्टिकलचा एकत्रित फॉर्म्युला

- पूर्वी प्लास्टिकची चप्पल म्हणजे केवळ पावसात भिजू नयेत म्हणून केलेली तडजोड वाटायची. पण आता ती आहे फॅशनचा एक स्टेटमेंट पीस.
- चमकदार रंग – गुलाबी, पिवळ्या, निळ्या आणि पारदर्शक टोनमध्ये उपलब्ध असणाऱ्या या चपला आजच्या मुलींच्या स्टाईलचा भाग बनल्या आहेत. पायाच्या साजेश्या बकल्स, फ्रिंज, किंवा मिनिमल डिझाईन – प्रत्येक जोडीलाच एक वेगळा कॅरेक्टर असतो.

### सहज वॉशेबल आणि लाइटवेट

- या चप्पलांमध्ये चालताना होणारा आवाज, थोडासा धपापाट वाटला तरी त्यातली आत्मविश्वासाची चाल हीच खरी सौंदर्याची ओळख बनते.
- हलकी साडी: पारंपरिकतेतून उलगडणारा मॉडर्न लूक
- पावसात साडी नेसणं हे जरा धाडसाचं काम असतं. पण आजच्या तरुणीला ही साडी म्हणजे तिच्या स्त्रीत्वाची ताकद वाटते.
- हलकं सिंथेटिक, जॉर्जेट, शिफॉन किंवा क्रेप हे साडीचे पर्याय पावसात लवकर सुकतात आणि फॅशनसुद्धा दाखवतात.
- फिकट रंग – जसे की आकाशी, गुलाबी, फिकट पिवळा किंवा राखाडी – हे रंग पावसाच्या पार्श्वभूमीवर अधिक खुलून दिसतात.
- फंकी ब्लाउज किंवा क्रॉप टॉपसह साडी पेअर करणे ही सध्या कॉलेज आणि ऑफिसमधल्या मुलींची आवडती स्टाईल आहे. पावसात साडीने भिजणारी तरुणी म्हणजे कवितेचं जिवंत रूपच. तिच्या प्रत्येक पावलातून सौंदर्य ओघवतं – न केवळ लूकमधून, तर आत्मविश्वासातून.

### आत्मविश्वास: या सौंदर्याचा खरा श्रृंगार

- सर्वात महत्त्वाचं म्हणजे – आत्मविश्वास. तो कोणत्याही कपड्यांपेक्षा, कोणत्याही ॲक्सेसरीपेक्षा जास्त उठून दिसतो. ओलसर केसांमध्येही जर तिचं हास्य टिकून असेल, तर ती फॅशन आयकॉन आहे. रस्त्यावरच्या पाण्यातून उडणाऱ्या सरींमध्ये चालताना जर ती मागे न वळता चालत राहते, तर ती 'रेन क्वीन' आहे. तिच्या डोळ्यांत जर उत्सुकता आहे, तर ती पावसात भिजताना स्वतःचं अस्तित्व ओळखते आहे. हाच आत्मविश्वास 'झगमगता' वाटतो. कारण तो मेकअपने मिळत नाही, तो आत्मभानातून निर्माण होतो.
- ब्यूटी टिप्स – पावसासाठी सौंदर्याची शालीनता
- पावसात सौंदर्याची खास काळजी घ्यावी लागते, हे ही विसरू नये. काही खास टिप्स: BB Cream किंवा Tint: हलकं, वॉटरप्रूफ आणि त्वचेला नैसर्गिक लुक देणारं.
- ब्लॉटिंग पेपर: चेहऱ्यावरील अतिरिक्त ओलावा घेण्यासाठी.
- लिप अँड चीक टिंट: मेकअप लाइट आणि टिकाऊ ठेवण्यासाठी.
- जलरंगासारखे नेलपॉलिश: जरा जास्तच बोलके वाटतात पावसात!
- स्टाईल ॲक्सेसरी – पावसातही हटके राहण्यासाठी
- पारदर्शक छत्र्या, रेनप्रूफ स्लिंग बॅग्स, आणि मिनिमलिस्ट ज्वेलरी – हे सगळं पावसातही स्टाईल कायम राखतं
- केस सावरण्यासाठी प्रिंटेड स्कार्फ किंवा हेअर बँड – ते सौंदर्य वाढवतंच, पण केसही सुरक्षित ठेवतात.



वळती (ता.आंबेगाव )येथील काटवानवस्तीत चोरट्यांनी घरफोडी करून लाखोंचा ऐवज लंपास केला. दुसऱ्या छायाचित्रात घरातील साहित्याची केलेली उचकापाचक.(छाया: किशोर खुडे)

## वळतीत काटवान वस्तीत घरफोडी

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात चोरट्यांचा उपद्रव सुरूच आहे. वळती येथील काटवानवस्तीत घरफोडी करून अज्ञात चोरट्यांनी एक लाख रुपयांची रोख रक्कम व सोन्या- चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना शुक्रवारी (दि. २७) रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली.
याबाबत सविस्तर माहिती अशी की वळती गावाच्या पूर्वेला तीन किलोमीटर अंतरावर काटवान वस्ती आहे येथील नकुबाई जयराम भोर (वय वर्ष -८५) या वृद्ध महिला राहतात. गेली पंधरा दिवसांपासून त्या आजारी आहे. दोन दिवसांपूर्वी त्यांची शेतजमीन करणाऱ्या दुसऱ्या शेतकऱ्याने त्यांना खंडाचे पैसे दिले होते. ते पैसे घरातच ठेवले होते नकुबाई भोर यांचा धाकटा मुलगा ज्ञानेश्वर जयराम भोर येथून जवळच असलेल्या भागडेश्वर चौकात राहतो. नकुबाई भोर या धाकट्या मुलाच्या घरी राहत होत्या. याचाच आज्ञात चोरट्यांनी फायदा घेत नकुबाई भोर यांच्या घराशेजारी राहणाऱ्या रामहरी कोंडीभाऊ भोर व त्यांचा थोरला मुलगा बबन जयराम भोर यांच्या घरांना कड्या लावल्या. त्यानंतर चोरट्यांनी नकुबाई भोर यांच्या घराचे कडी कोयंडे- कटरच्या साह्याने तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटात ठेवलेले रोख एक लाख व पाकिटात ठेवलेले पंधराशे रुपये, दीड तोळ्याची सोन्याची बोरमाळ, अर्धा तोळ्याची नथ, तीन तोळ्याच्या चांदीच्या मासोळ्या, असा एकुण ऐवज चोरट्यांनी लंपास केला. चोरीची घटना कळताच वळती गावचे पोलीस पाटील प्रकाश लोंढे पाटील यांनी मंचर पोलीस ठाण्यात घटनेची खबर दिली. मंचर पोलीस ठाण्याचे सहायक फौजदार एस आर मांडवे, पोलीस कॉन्स्टेबल पी.एस. गवारी, एफ.ए. मोमीन यांनी घटनास्थळी येऊन घटनेचा पंचनामा केला.

## श्री संत गुलाबबाबा पालखी सोहळ्याचे ३० जुलैला प्रस्थान

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील रेडा गावामधून



सालाबादप्रमाणे श्री संत गुलाबबाबा पायी पालखी सोहळा श्री क्षेत्र गुलाबनगर (रेडा) ते श्री क्षेत्र पंढरपूर हा आषाढ शुद्ध सोमवारी (दि.३०) जून रोजी सायंकाळी ४ वाजता. पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. या पालखी सोहळ्यामध्ये भारतातील विविध राज्यातून श्री संत गुलाबबाबांचे भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यावेळी ॲड. गोपाल उमक, अध्यक्ष श्री संत गुलाबबाबा समाधी मंदिर ट्रस्ट श्री क्षेत्र टाकरखेड (मोरे) ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती व श्री संत गुलाबबाबा यांचे वंशज तसेच प्राध्यापक नरेंद्र पलांदुकर, अध्यक्ष श्री संत गुलाबबाबा संस्थान काटेल धाम ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा , चंद्रकुमार अग्रवाल सचिव सिद्धेश्वर श्री संत गुलाबबाबा समाधी मंदिर टाकरखेडा (मोरे) अध्यक्ष श्री संत गुलाबबाबा प्रतिष्ठान पंढरपूर यांच्या हस्ते या पालखी सोहळ्याचे प्रस्थान होणार आहे

या पालखी सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक विश्वासराव पवार, गोपाल रोकडे, उद्योजक रमेश हिरे, डॉ. शिवाजीराव पाटील सचिव श्री संत गुलाबबाबा प्रतिष्ठान पंढरपूर, पै. दामोदर वानखडे, गोपाल कोलते, शाहीर मुरलीधर लोणाग्रे, उद्योजक कमलाकर बागुल, प्रकाश देशमुख मुख्य प्रवर्तक बँक ऑफ बडोदा मुंबई निशिकांत लाड,पै. अशिष शिरगावकर,मनोहर म्हात्रे, भूषण शिंदे, भगवान म्हात्रे, संतोष राऊत, हेमंत पाटील,मनोज म्हात्रे,प्रकाश मिसाळ,आर.जी.पाटील ,आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## पुणे जिल्हा व्यापारी रिटेल संघ अध्यक्षपदी किरण शिंदे

**रांजणगाव गणपती :** पुणे जिल्हा व्यापारी रीटेल



संघाच्या अध्यक्षपदी रांजणगाव गणपती येथील व्यावसायिक हॉटेल मातोश्रीचे मालक किरण शिंदे आणि उपाध्यक्षपदी न्हावरा गावचे उद्योजक श्रीपाद ऑटो बजाज शोरूम व श्रीपाद ज्वेलर्स अँड कंपनीचे मालक कमलेश बापूराव बुराडे यांची नियुक्ती करण्यात आली. भारतीय कॅट आणि पुणे जिल्हा रिटेल व्यापारी संघाच्या वतीने पुणे सहकार नगर सातव हॉलमध्ये नव्याने पदग्रहण कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी या निवडी करण्यात आल्या. व्यापारी संघाच्या माध्यमातून जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी नवनवीन तरुणांना काम करण्याची संधी देण्यात आली. व्यापाऱ्यांच्या आणि दुकानदारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी त्याचबरोबर त्यांना येणाऱ्या समस्यांचा त्याचबरोबर त्यांच्या आरोग्याचा प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी संघटना गेल्या अनेक वर्षापासून काम करत आहे. व्यापारी वर्गाच्या शासन दरबारी असणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी त्याचबरोबर व्यापाऱ्यांच्या प्रगतीसाठी शासन दरबारी योग्य पाठ पुरवठा करून. व्यापाऱ्यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे दोन्ही पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष व्यापारी संघाचे अध्यक्ष सचिन निवगुणे त्याचबरोबर जिल्ह्याचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दहा कोटी व्यापाऱ्यांच्या प्रगतीसाठी भारत सरकार अनेक योजनांचा शासन दरबारी विचार चालू आहे. व्यापाऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी संघटनेच्या वतीने काम करण्याचे मार्गदर्शन केले. अशा प्रकारे मोठ्या उत्साहांमध्ये आनंद मध्ये विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात संघटनेच्या पदग्रहणाचा कार्यक्रम पार पडला.

# भक्तिभावाने पालखी सोहळा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** शहा ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल, इंदापूर येथे पालखी सोहळा उत्साहात व आनंदात पार पडला यात शाळेतील विद्यार्थांनी उत्साहाने भाग घेतला पारंपरिक आणि भक्तिभावाने परिपूर्ण असा पालखी सोहळा अत्यंत मंगल वातावरणात साजरा करण्यात आला.

"विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल,गजर करत अभंगाने विद्यार्थी भक्तीरसा मध्ये समरस झाले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी पंढरीनाथा मज वावा साक्षात्कारा..." "तुज मागतो मी आता, श्रीहरी पंढरीनाथा..." "माऊली माऊली..." या अभंगगजरांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

मुख्य अतिथी म्हणून श्रीमती राणी संजय शहा, श्री अमोल शहा, श्रीमती माही शहा, श्री प्रमोद शहा, श्रीमती सारिका शहा, श्री मुकुंद शहा, श्रीमती अंकिता शहा, श्री भरत शहा, श्रीमती वैशाली शहा श्री अंगद शहा व श्रीमती रुचिरा शहा यांची उपस्थिती लाभली.

पारंपरिक पोशाख परिधान



करून सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी या पालखी सोहळ्यात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. श्री विठ्ठल-रुख्मिणीच्या सुंदर सजवलेल्या पालखीची मिरवणूक लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात निघाली. प्रत्येक पावलावर "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" चा गजर परिसरात भक्तीमय आनंद निर्माण करत होता.

शाळेच्या आवारातून फिरून ही पालखी मुख्य प्रांगणात आली, जिथे विशेष प्रार्थना सभा घेण्यात आली. या वेळी विद्या कराडे यांनी वारी परंपरेचे महत्त्व, वारकऱ्यांचे शिस्तबद्ध जीवन आणि श्रद्धेचे स्थान यावर अतिशय प्रेरणादायी भाषण केले.

### जागवली एकोप्याची भावना

● शाळा व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचे कौतुक करत, पारंपरिकतेचा सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोचविण्याच्या प्रयत्नांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या कराडे यांनी केले, तर आभार ऑफ विद्या दारेकर यांनी मानले. कार्यक्रमाचा समारोप सर्व उपस्थितांना प्रसाद वितरण करून करण्यात आला. या सोहळ्याने विद्यार्थ्यांमध्ये भक्तिभाव, एकोप्याची भावना, आणि आपली सांस्कृतिक ओळख जपण्याची प्रेरणा जागवली.

# हुंडाबळीविरोधात 'बाहुला बाहुली' चा विवाह

## लोकसेवा इंग्लिश मीडियम स्कूल, फुलगाव चा उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तूळापूर :** 'हुंडा घेणार त्यांना विरोध करा, समाज बदलण्यास मदत करा', 'हुंडा नाकारु, समानतेचे नवे पर्व सुरु करु', 'हुंडा नाही प्रेम हवे, नवीन संसारात सुख हवे' अशा घोषणा देत फुलगाव येथील लोकसेवा इंग्रजी माध्यम शाळेत अनोखा कार्यक्रम संपन्न झाला. समाजात अजूनही होत असलेले 'हुंडाबळी' तसेच 'स्त्री-भृण हत्या' याविरुद्ध प्रबोधन करण्याच्या हेतूने शाळेने 'बाहुला बाहुलीच्या विवाह सोहळ्याचे' आयोजन केले होते. यास लोकसेवा शाळेतील विद्यार्थी, पालकांसोबतच परिसरातील नागरिकही मोठ्या प्रमाणात उपस्थित राहिले होते.

हुंडाबंदी म्हणजेच हुंडा देणे किंवा घेणे यावर कायद्याने बंदी आहे. हुंडा मागणी केल्यास शिक्षा होऊ शकते, असे फलक घेऊन वऱ्हाडींनी वाजत गाजत वर वधू स्वरूपातील बाहुल्यांची मिरवणूक काढली. लग्नात वर वधूंना शुभेच्छा म्हणून उपस्थितांनी झाडांच्या बिया, तुळशीची रोपे, पुस्तके, संगीताचे साहित्य, क्रीडा साहित्य आशीर्वाद स्वरूपात भेट दिले.

विवाह सोहळ्याची संकल्पना व नियोजन ज्येष्ठ माजी कला शिक्षिका व सेवाव्रती प्रतिभा भडसावळे यांनी केले. बाहुल्या पुण्यातील ज्येष्ठ बाहुलीकार जयंत साठे यांनी साकारल्या.



हुंडाबळी आणि स्त्रीभ्रूणहत्या याविरुद्ध प्रबोधनासाठी लोकसेवा इंग्रजी माध्यम आयोजित बाहुला बाहुली विवाह प्रसंगी शाळेतील विद्यार्थी. विद्यालयाच्या या उपक्रमाला उपस्थितांनी भरभरुन प्रतिसाद दिला.

याप्रसंगी शाळेचे संस्थापक माजी आमदार दीपक पायगुडे, संचालक नरहरी पाटील, शॉपीमॉन सर, जाधव सर, सुरेश पाटील, अर्जुन शिंदे, मनीषा तिरकुंडे, अक्षय पोटे, प्रभाकर भडसावळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची जबाबदारी लोकसेवा इंग्लिश मीडियम स्कूलचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पार पाडली.

# अवैद्य वाहतुकीचा त्वरित बंदोबस्त व्हावा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव :** पुणे-अहिल्या नगर महामार्गावरती रांजणगाव परिसरातही सध्या मोठ्या प्रमाणामध्ये अवैध वाहतूक सुरू आहे या अवैद्य वाहतुकीचा त्वरित बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी प्रादेशिक परिवहन पुणे विभागाकडे रांजणगाव सोसायटीचे माजी चेअरमन व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य आत्माराम खेडकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, रांजणगाव ते शिक्रापूर रिक्षा धारक अवैधरित्या प्रवासी वाहतूक करत आहेत, तसेच ते प्रवाशांकडून मनमानी पैसे घेणे नशापान, धूम्रपान करत गाडी चालविणे प्रवाशांशी गैरवर्तन करणे पीएमटी स्टॉप व एसटी स्टैंड वर वाहतुकीस व ग्रामस्थांस अडथळा होईल अशा पद्धतीने रिक्षा पार्क करणे त्यामुळे एसटी बस व पीएमटी पार्किंग करण्यास व गावातील वाहने पार्क करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

तरी लवकरात लवकर लक्ष घालून शहानिशा करून एक कर्मचारी नेमून ग्रामस्थ व एसटी महामंडळ पीएमटी यांना अडचण होणार नाही याची दक्षता घ्यावी. व ग्रामस्थांची होणारी गैरसोय टाळावी. अशी मागणी खेडकर यांनी केली आहे.

### हा तर प्रवाशांच्या जीवाशी खेळ

रिक्षा मालकांकडे तीन प्रवासी परवाना असताना आठ ते दहा प्रवासी बसवून प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत आहे तरी या सर्व रिक्षा चे पेपर व ड्रायव्हरचे लायसन्स चेक करावे, शासनाने ठरवून दिलेला गणवेश ते कधीच वापरत नाही व बॅच बिल्ला पण वापरत नाही.

# डिंगोरेचे क्रिडा शिक्षक झाले राजपत्रीत अधिकारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय डिंगोरेचे विद्यार्थी प्रिय क्रीडा शिक्षक विजय काकडे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची तालुका क्रीडा अधिकारी ही परीक्षा उत्तीर्ण होऊन नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यात राजपत्रित अधिकारी झाले. याबद्दल पुष्पावती विद्यालय डिंगोरे येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्राम विकास मंडळाचे सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप, डिंगोरच्या सरपंच सीमा सोनवणे, मुक्ताई मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण नाना लोहोटे, दत्तात्रय लोहोटे, बाळकृष्ण खरात, सरस्वती विद्यालय उदापूर चे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर, शिल्पा भालेराव, संजय डुंबरे हे उपस्थित होते.

शालेय जीवनात शिक्षक ही केवळ अध्यापन करणारी व्यक्ती नसते तर ती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारी मार्गदर्शकही असते.आज ज्या शिक्षकांनी ही परीक्षा उत्तीर्ण केली त्यांनी फक्त स्वतःच्या क्षमतेचे नव्हे तर शाळेच्या नावाचेही उज्वल करणारे कार्य केले असल्याचे प्रतिपादन ग्राम विकास मंडळ ओतूरचे खजिनदार व कार्यक्रमाचे अध्यक्ष रघुनाथ अण्णा तांबे यांनी व्यक्त केले. त्यांच्या परिश्रम, चिकाटी आणि क्रीडा क्षेत्रातील निष्ठा याला आज मान्यता लाभली असल्याची माहिती मुख्याध्यापक शरद माळवे यांनी दिली.

या कार्यक्रमाचे नियोजन वैभव देशमुख,दिनेश पाटील, मंगेश कोंडार, रतीलाल बागुल, मंगेश डुंबरे,किसन भुतांबरे, साधना तांबे यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगन्नाथ गाढवे, सूत्रसंचालन दत्तात्रय घोलप यांनी केले तर आभार दिपा सावंत यांनी मानले.



# विम्यासाठी आता ॲग्रीस्टॅक, ई-पीक पाहणी सक्तीची

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पंतप्रधान खरीप पीकविमा योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने यंदाच्या हंगामात महत्त्वपूर्ण आणि कडक अटी लागू केल्या आहेत. आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ई-पीक पाहणी' आणि 'ॲग्रिस्टॅक ओळख क्रमांक' सक्तीचे करण्यात आले आहेत.

शेतकऱ्याने नोंदवलेले पीक क्षेत्र आणि प्रत्यक्ष विमा घेतलेल्या क्षेत्रामध्ये जर कुठलीही तफावत आढळली, तर विमा तात्काळ रद्द केला जाईल, एवढेच नव्हे तर



संबंधित शेतकऱ्याला पुढील पाच वर्षे कोणत्याही कृषी योजनेपासून वंचित राहावे लागणार आहे.

खरीप हंगामात कांदा व कापूस यांसारख्या नगदी पिकांसाठी ५ टक्के विमा हप्ता, तर उर्वरित अधिसूचित पिकांसाठी २ टक्के विमा हप्ता आकारण्यात येणार आहे. तांत्रिक सर्वेक्षण, उपग्रह प्रतिमा आणि ड्रोन पाहणीच्या आधारे संभाव्य जोखीम कमी झाल्यामुळेच काही जिल्ह्यांमध्ये हा हप्ता ०.२५ ते १ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे.

नोंदणी आणि प्रत्यक्ष विमा यामध्ये विसंगती आढळल्यास फक्त विमा रद्दच केला जाणार नाही, तर शेतकऱ्याने भरलेला हप्ता देखील जप्त केला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांनी पूर्ण प्रक्रिया प्रामाणिकपणे आणि अचूक माहितीच्या आधारे करणे अत्यावश्यक ठरणार आहे.

खरीप हंगामासाठी पीकविमा योजनेचा लाभ घ्यायचा असल्यास ३१ जुलै २०२५ ही अंतिम मुदत आहे. त्याआधी डिजिटल क्रॉप सर्व्हे ॲपवरून ई-पीक पाहणीची नोंदणी आणि ॲग्रिस्टॅक क्रमांकाची पूर्तता करणे आवश्यक आहे.

> ई-पीक पाहणीमध्ये चुकीची माहिती देणाऱ्या, खोट्या कागदपत्रांद्वारे विमा मिळवू पाहणाऱ्या शेतकऱ्यांना काळ्या यादीत टाकण्यात येणार आहे. अशा शेतकऱ्यांना पाच वर्षे शेतीसंबंधित कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळणार नाही."
> **— विनयकुमार आवटे** कृषी विभागाचे संचालक

# 'अनलॉग हिंजवडी' साठी आवाज उठवणार

## आयटीयन्सच्या भूमिकेला : समर्थन; पावसाळी अधिवेशनात वेधणार राज्य शासनाचे लक्ष : आमदार महेश लांडगे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी- चिंचवड :** हिंजवडी आयटी पार्कच्या समस्यांवर उपाययोजनांची मागणी आम्ही राज्य सरकारकडे केली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयटीयन्स आणि लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घ्यावी. हिंजवडीसह सात गावांचा समावेश आणि चाकण-आळंदी-खेड अशी नवी महापालिका निर्मितीबाबतच्या प्रस्तावावरही निर्णय व्हावा. आयटीयन्सच्या भूमिकेशी आम्ही पूर्णत: सहमत आहोत आणि सोबत आहोत. त्यामुळे आगामी पावसाळी आधिवेशनामध्ये या मुद्यावर राज्य सरकारचे लक्ष वेधणार आहे. एमआयडीसी, पीएमआरडीए, महापालिका अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुख्य अधिकाऱ्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये एकत्रित बैठक घेण्यात येणार आहे, असे आश्वासन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिले. पिंपरी-चिंचवड शहराची ओळख देशभरातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण करणारे हिंजवडी आयटी पार्क सध्या अनेक समस्यांच्या विळख्यात अडकले आहे. पायाभूत सुविधांची दुरवस्था, रस्त्यांची खराब अवस्था, वाहतूक कोंडी, अपुऱ्या सार्वजनिक वाहतूक सुविधा, पाणी व ड्रेनेज समस्यांमुळे येथील आयटी व्यावसायिक आणि रहिवासी त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर

#UNCLOGHinjawadiITPark ही स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली असून, अवघ्या दोन-तीन दिवसांतच या मोहिमेला २५ हजारांहून अधिक नागरिकांनी पाठिंबा दर्शवला आहे. या मोहिमेमुळे आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या समस्या पुन्हा एकदा प्रकाशझोतात आल्या असून, या भागाच्या विकासासाठी तातडीच्या उपाययोजनांची मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान, वाकड-पिंपरी-चिंचवड रेसिडेन्ट डेव्हलपमेंट अॅन्ड वेलफेअर असोसिएशनचे प्रमुख सचिन लोंढे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आज आमदार महेश लांडगे यांची भेट घेतली. या बैठकीदरम्यान हिंजवडी आयटी हबमध्ये उद्भवलेल्या विविध समस्या आणि त्यावर अपेक्षित उपाययोजना याबाबत सविस्तर चर्चा झाली. पायाभूत सुविधा सक्षम करणे, वाहतूक व्यवस्थापन सुधारणा, हरित क्षेत्राचे जतन आणि स्थानिक प्रशासनाशी समन्वय अशा विविध मुद्द्यांवर त्यांनी आपले विचार मांडले. दरम्यान, पुणे व पिंपरी-चिंचवड शहराच्या आजुबाजुला असलेल्या पीएमआरडीए हद्दीमध्ये पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही प्रयत्न करणार आहोत. वाहतूक समस्या, पावसाळी पाण्याचा निचरा व्यवस्था, कचरा समस्या आणि नागरी आरोग्य तसेच पर्यावरण संवर्धनासाठी सातत्यपूर्ण पुढाकार घेण्याची माझी भूमिका आहे, असे यावेळी आमदार लांडगे यांनी सांगितले.

**सात गावांचा महापालिकेत समावेश**

या भागातील वाढती लोकसंख्या आणि नागरी गरजांचा विचार करता हिंजवडीसह अन्य सात गावांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्याचा प्रस्ताव सध्या प्रलंबित आहे. या प्रस्तावावर भाजपा महायुती सरकार सकारात्मक असल्याची माहिती देण्यात आली आहे. यासोबतच, शहराच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या चाकण, आळंदी आणि खेड या नगरपालिकांना एकत्र करून नवीन महापालिका निर्माण करण्याबाबतही हालचाली सुरू आहेत.



नागरिकांचा वाढता प्रतिसाद, स्थानिक संघटनांची भूमिका आणि राजकीय पुढाकार या सर्व घटकांमुळे #UNCLOGHinjawadiITPark ही मोहीम आता केवळ ऑनलाईन आंदोलन न राहता, व्यवस्थेत बदल घडवून आणणारी चळवळ ठरली आहे. सरकार म्हणून आम्ही या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहोत. तसेच, आम्ही चाकण-आळंदी आणि खेड नगरपालिका मिळून नवीन महापालिका निर्माण करण्याच्या मागणीचेही समर्थन करीत आहोत. यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेवरील ताण कमी होईल.

**- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे



## आयसीएआयच्या वतीने "एमएसएमई" दिन साजरा

**पिंपरी :** निगडी येथील इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटन्टस ऑफ इंडियाच्या(आयसीएआय) वतीने उद्योजकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या "एक दिन एमएसएमई के नाम" ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी इंटरनॅशनल आलायन्सचे संचालक अॅड जमशेद मिस्त्री, सीए महेश्वर मराठे,सीए संतोष एच. दोशी,इंडो-अमेरिकन चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अंनत गोवंडे,अबेआयचे संचालक सीए निपुण सिकरी,काबीलचे संस्थापक मुस्तफा हरनेसवाला,गुंतवणूक सल्लागार आकाश सुरेका,आयडीयाज टू इम्पॅक्ट हबचे तुषार शेट्टी, भाडीपाच्या संस्थापिका पॉला मॅकग्लिन,अभिनेत्री आयली घिया,माय बिग ब्रँड स्टोरीच्या संचालिका मोनिका राजदान, ऍड रशना जेहानी, आयसीएआयचे शाखाध्यक्ष सीए वैभव मोदी, उपाध्यक्षा सीए सारिका चोरडिया, सचिव सीए मनोज मालपाणी, खजिनदार सीए महावीर कोठारी, विद्यार्थी संघटना अध्यक्ष सीए धीरज बलदोटा, कार्यकारी सदस्य सीए शैलेश बोरे व सीए सचिन ढेरंगे आदी उपस्थित होते.



## प्राचार्य प्रदीप कदम यांना शांतिदूत सेवारत्न पुरस्कार

**पिंपरी :** महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते आणि कॉनक्वेस्ट कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड कॉम्प्युटर स्टडीज - चिखली या महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप कदम यांना शांतिदूत परिवार आणि एल ओ सी हॉस्पिटल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने २०२५ च्या शांतिदूत सेवारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उद्योजक रामदास माने, पुणे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे, जी एस टी आयुक्त शिवकुमार साळुंखे, सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. विठ्ठल जाधव, पुणे अप्पर पोलीस आयुक्त प्रवीण पाटील यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर शांतिदूत परिवार संस्थेच्या अध्यक्षा विद्या जाधव, संत तुकाराम महाराजांचे वंशज ह. भ. प. प्रशांतमहाराज मोरे, प्राचार्य रामदास चौरे, गझलगायक भीमराव पांचाळे आदी उपस्थित होते.प्राचार्य प्रदीप कदम यांनी गेल्या पंधरा वर्षांपासून महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर वेगवेगळ्या विषयांवर सुमारे २५०० हून अधिक प्रेरणादायी व्याख्याने दिलेली आहेत. प्राचार्य कदम हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बहि:शाल व्याख्याते म्हणूनही कार्यरत आहेत.



## स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**पुणे :** महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्युकेशन सोसायटीकडून केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा आणि न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी परीक्षा मध्ये निवड झालेल्या गुणवंत मुस्लिम विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ दि. २८ जून रोजी उत्साहात पार पडला.या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून जकात फाउंडेशन ऑफ इंडिया(दिल्ली) चे संस्थापक अध्यक्ष सय्यद जफर मेहमूद,राज्याचे जीएसटी कर आयुक्त मेहबूब कासार,सौ.कासार, यशदा ,बार्टी चे माजी संचालक रविंद्र चव्हाण,महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्ष आबेदा इनामदार,सचिव प्रा.इरफान शेख उपस्थित होते. महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्युकेशन सोसायटीच्या ए.के.के.न्यू लॉ अकॅडमी व पीएचडी सेंटर येथे उभारण्यात आलेल्या डॉ.पी.ए.इनामदार स्पर्धा परीक्षा केंद्राचे उदघाटन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.प्रा.इरफान शेख यांनी स्वागत केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.जेसिंटा बॅस्टियन आणि डॉ.स्वाती शिंदे यांनी केले.


## रायसोनी महाविद्यालयात जनजागृती अभियान

**पुणे :** जागतिक अंमली पदार्थविरोधी सप्ताहानिमित्त पुणे शहर पोलिस आयुक्तालय, वाघोली पोलिस स्टेशन आणि जी. एच. रायसोनी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय, वाघोली यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती व नशामुक्ती जनजागृती अभियानाचे रायसोनी महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात वाघोली पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय चंदन यांनी अंमली पदार्थांच्या आहारी गेल्यास मानसिक, शारीरिक आणि सामाजिक नुकसान कसे होते, याचे अतिशय सखोल विवेचन केले. जीएच रायसोनी महाविद्यालयाचे उपसंचालक डॉ. प्रवीण जांगडे यांनी विद्यार्थ्यांच्या समोर शिक्षण आणि चांगल्या सवयींचा परस्परसंबंध स्पष्ट केला. कार्यक्रमाला जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग आणि मॅनेजमेंटचे कॅम्पस संचालक डॉ. आर. डी. खराडकर, पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव, सहाय्यक पोलिस आयुक्त प्रांजली सोनवणे, वरीष्ठ पोलिस निरीक्षक युवराज हांडे यांचे सहकार्य लाभले. यावेळी महाविद्यालयाचे कुलसचिव सुजीतकुमार कारंडे आदी उपस्थित होते.

# खरेदीसाठी 'महालगीनघाई'...!

### विस्तारासाठी महामेट्रोच्या पंधरा नव्या ट्रेन; ४५ नवे कोच

पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था चांगलीच ढासळली होती; त्याचा थेट फटका सर्वसामान्य प्रवासी आणि चाकरमान्यांना सहन करावा लागत होता. विशेष म्हणजे पैसे मोजूनही काही मिनिटांचा प्रवास तब्बल तासांवर गेल्याने सर्वसामान्य प्रवासी हतबल झाला होता; त्यामुळेच एकेकाळी 'सायकलींचे शहर' अशी ओळख असलेले पुणे 'दुचाकींचे शहर' अशी ओळख झाली आहे. त्यातूनच अपघातांच्या प्रमाणातही वाढ होत असून वाहतूक कोंडीने नागरिक हैराण झाले आहेत; त्यामुळे पुण्यात गेल्या काही वर्षांपूर्वीच दाखल झालेली 'महामेट्रो' पुणेकरांसाठी वरदान ठरली आहे. हा प्रवास अधिक जलद आणि सुखकर असल्याने या प्रवासाला पुणेकरांची अल्पावधीतच पसंती मिळाली आहे.



पुणेकर प्रवाशांना अधिकाअधिक दर्जेदार आणि जलद सेवा देण्यासाठी महामेट्रोचे नेहमीच प्राधान्य राहिले आहे; त्यामध्ये यापुढील कालावधीतही सातत्य कायम असणार आहे. नव्या ट्रेन आणि कोचसाठी काही वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे; त्यामुळे त्यासाठी प्रशासनाने आतापासूनच जय्यत तयारी सुरु केली आहे. त्यासंदर्भात संबधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. **-श्रावण हर्डीकर,** व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो

**संख्यात्मक माहिती - एक नजर**

- सध्याच्या ट्रेन : ३४
- सध्याचे कोच (डबे) : १०२
- नवीन खरेदी होणाऱ्या ट्रेन : १५
- वाढणारे कोच : ४५
- एकूण संभाव्य ट्रेन (लवकरच) : ४९
- एकूण संभाव्य कोच (लवकरच) : १४७
- सध्याची दैनंदिन प्रवासीसंख्या : १.७ लाख
- लक्षित दैनंदिन प्रवासीसंख्या : ३.५ लाख



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातील वाढती वाहतूक आणि मेट्रोचा झपाट्याने वाढत चाललेला प्रतिसाद लक्षात घेता, महामेट्रो प्रशासनाने मेट्रो सेवेचा पुढील टप्पा अधिक प्रभावी करण्याचा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत पुणे मेट्रोच्या ताफ्यात लवकरच १५ नव्या मेट्रो ट्रेनचा समावेश होणार असून, एकूण ४५ कोच (डबे) वाढवले जाणार आहेत. सध्या पुणे मेट्रोकडे ३४ ट्रेन आणि १०२ डबे कार्यरत असून, त्याद्वारे दररोज सुमारे १ लाख ७० हजार प्रवासी सेवा घेत आहेत. येत्या काळात दोन नवीन मार्गिकांसाठी केंद्र सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर, महामेट्रोने या नव्या ट्रेन खरेदीसाठी नियोजन सुरू केले आहे. प्रत्येक नव्या ट्रेनमध्ये ३ डबे असतील, त्यामुळे एकूण डब्यांची संख्या १४७ वर पोहोचणार आहे.

महामेट्रोचे महाव्यवस्थापक व कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी सांगितले की, "प्रवाशांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे अधिक क्षमतेची सेवा पुरविणे आवश्यक आहे. नव्या ट्रेनमुळे मेट्रोमध्ये गर्दीचा त्रास कमी होईल आणि नागरिकांचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित व आरामदायक होईल." महामेट्रो प्रशासन सध्या फीडर सेवा, पार्किंग सोय आणि नव्या प्रवेशद्वारांची उभारणी यांसारख्या विविध उपाययोजना करत असून, मेट्रोचा वापर अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. भविष्यातील दैनंदिन प्रवासीसंख्या साडेतीन लाखांपर्यंत पोहोचवण्याचे लक्ष असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# मोहल्ला कमिटी बैठकीत शाब्दिक चकमक





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराच्या स्थानिक प्रशासनातील समन्वय अभावाची एक नवी उदाहरण धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयात पाहायला मिळाली. नागरिकांच्या समस्या ऐकण्यासाठी आयोजित मोहल्ला कमिटीच्या बैठकीत महायुतीतील दोन प्रमुख घटक – शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) – यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली. यामुळे बैठकीचे स्वरूपच गोंधळात परिवर्तित झाले.

बैठकीदरम्यान पायाभूत सुविधा, कचरा व्यवस्थापन, तसेच अनधिकृत बांधकामांवर चर्चा सुरू असतानाच एका रहिवासी महिलेकडून स्थानिक झोपडपट्टीतील अवैध धंद्यांविषयी तक्रार मांडण्यात आली. या मुद्द्यावर चर्चा सुरू होताच, उपस्थित पदाधिकारी उद्धव कांबळे (शिवसेना - शिंदे गट) यांनी हस्तक्षेप करत मत मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष सुभाष जगताप यांनी त्यांना मध्येच थांबवत आक्षेप घेतला. कांबळे यांना नंतर बोलण्याची संधी देण्यात आली, मात्र त्यांनी वादग्रस्त पद्धतीने जागेविषयी टिप्पणी करताच वातावरण चिघळले आणि बैठकीत शाब्दिक वादाला तोंड फुटले. यामुळे उपस्थित नागरिक, महिला प्रतिनिधी आणि अधिकारी संभ्रमात पडले. या घटनेमुळे महायुतीतील अंतर्गत समन्वय आणि लोकप्रतिनिधींचा परस्पर संवाद किती विस्कळीत आहे, हे पुन्हा एकदा समोर आले. नागरिकांच्या प्रश्नांवर गंभीर चर्चा होण्याऐवजी राजकीय कुरघोडी व टोलेबाजीमुळे बैठकीचे गांभीर्य हरपल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली. शहरात स्थानिक पातळीवरील समस्या सोडवण्यासाठी प्रशासन आणि जनप्रतिनिधींनी कत्र येण्याची गरज असताना, अशा वादामुळे विकास प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# कात्रज चौकात वसंत मोरे यांचे आक्रमक आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कात्रज चौक आणि कात्रज-कोंढवा रस्त्याच्या विकासकामांची पाहणी करण्यासाठी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त, वरिष्ठ अधिकारी आणि आमदार योगेश टिळेकर शनिवारी दौऱ्यावर होते. मात्र या दौऱ्यादरम्यान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे नेते वसंत मोरे यांनी २५ ते ३० कार्यकर्त्यांसह ठिकाणी आंदोलन करत प्रशासनाला खडे बोल सुनावले. मोरे यांनी महापालिकेने केलेल्या एका महत्त्वाच्या भूखंड व्यवहारावर गंभीर आरोप केले. "कात्रज चौकातील संजय गुगळे यांच्या ३९ गुंठ्यांच्या जागेसाठी महापालिकेने २१ कोटींचा मोबदला दिला. प्रत्यक्षात मात्र तेवढे क्षेत्र भरत नाही. शिवाय, गेल्या पन्नास वर्षांपासून पंपिंग स्टेशन आणि राजीव गांधी प्राणी संग्रहालयासाठी वापरात असलेल्या जागेचाही मोबदला देण्यात आला का?" असा सवाल मोरे यांनी उपस्थित केला. याप्रकरणी वरिष्ठ स्तरावर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली. तसेच, कात्रज गावठाणालगतचा एक जुना रस्ता दुष्काळाच्या काळात बांधण्यात आला होता. तो निवासी झोनमध्ये कसा वर्ग करण्यात आला? असा प्रश्न उपस्थित करत, "गावाचा रस्ता बंद करण्याचे दिवास्वप्न कोणी पाहू नये," असा इशाराही मोरे यांनी दिला.



पुणे — कात्रज चौक आणि कात्रज-कोंढवा रस्त्याच्या विकासकामांची पाहणी करण्यासाठी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त, वरिष्ठ अधिकारी आणि आमदार योगेश टिळेकर शनिवारी दौऱ्यावर होते. मात्र या दौऱ्यादरम्यान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे नेते वसंत मोरे यांनी २५ ते ३० कार्यकर्त्यांसह ठिकाणी आंदोलन करत प्रशासनाला खडे बोल सुनावले.

# लोकशाही समाजवाद हा भाईंचा श्वास : डॉ. श्रीपाल सबनीस




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोकशाही समाजवादासाठी भाई वैद्य यांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. भाईंसारखा व्रतस्थ आणि तपस्वी राजकारणी माणूस दिसणे आजच्या काळात जवळपास अशक्य आहे. लोकशाही समाजवाद हा भाईंचा श्वास होता, असे मत ज्येष्ठ लेखक आणि माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले. मनोहर कोलते मैत्र संघ पुणेतर्फे ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैदय यांच्या जयंतीनिमित्त लोकनेते भाई वैद्य स्मृती पुरस्कार आज लोकनेते भाई वैद्य यांच्या शिक्षण हक्क चळवळीतील क्रियाशील कार्यकर्त्या सुरेखा खरे यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे भाई वैद्य फौंडेशन आणि आरोग्य सेनेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. अभिजीत वैद्य, ललिता श्रीपाल सबनीस, मनोहर कोलते मैत्र संघाचे प्रमुख मनोहर कोलते, प्रा. डॉ. गीतांजली वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, अन्यायाविरोधात भाई वैद्य यांनी सातत्याने लढा दिला आणि सर्वसामान्य माणसाबरोबरची बांधिलकी त्यांनी शेवटपर्यंत जपली. समाजवाद्यांचे मार्क्सवाद हे अधिष्ठान होते. समाजवाद्यांचा आणि कम्युनिस्टांचा मार्क्सवाद वेगवेगळा होता. त्यावेळेचा वैचारिक संघर्षाचा काळ हा अस्वस्थ करणारा होता. या सगळ्या वैचारिक अस्वस्थतेच्या काळात भाई वैद्यांनी समाजवादाचा विचार रूजवला. यावेळी पुरस्काराला उत्तर देताना सुरेखा खरे म्हणाल्या की, भाईंनी दिलेल्या वैचारिक ताकदीमुळेच शिक्षण हक्क चळवळ उभी राहिली आहे.

मी भाईंचा केवळ मुलगा नसून मी त्यांच्या विचारांचा आणि संघर्षाचा अनुयायी आहे, याचा मला अभिमान वाटतो. समाजातील तळागाळात समाजवादी विचार पोहोचविण्यात लोहिया यांच्यानंतर मी भाईंचेच नाव घेईल. दिवसागणिक संविधानाची पायमल्ली होत आहे आणि हेच लोक संविधानाचा हत्यादिन साजरा करतात, हा फारमोठा विरोधाभास आहे.

**-डॉ. अभिजित वैद्य;** संस्थापक अध्यक्ष, आरोग्य सेना

# जान्हवीने केले घायाळ



बॉलिवूडच्या स्टायलिश अभिनेत्रींच्या यादीमध्ये जान्हवी कपूरचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. कामामुळे तसेच लूकमुळे ती नेहमीच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसते. अलिकडेच लंडनमधील 'मिउ मिउ' च्या नवीन स्टोअर लाँचमध्ये तिच्या ग्लॅमरस उपस्थितीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रिया कपूरने स्टाइल केलेली जान्हवी नेव्ही ब्लू ड्रेस आणि न्यूड सॅटिन ब्रॅलेटमध्ये खूपच सुंदर दिसत होती. तिचे फोटो सोशल मीडियावर पसंती मिळवत आहेत.

जान्हवी कपूरने लंडनमधील न्यू बॉन्ड स्ट्रीटवरील मिउ मिउ च्या नवीन फ्लॅगशिप स्टोअरच्या भव्य उद्घाटनाला हजेरी लावली होती. या कार्यक्रमासाठी तिने मिउ मिउ ची सिग्नेचर स्टाइल स्वीकारली. अर्थातच यातील तिचा खेळकर, स्टायलिश आणि थोडा बंडखोर लूक सगळ्यांनाच भावला. तिच्या आउटफिटमध्ये नेव्ही ब्लू निट ड्रेस होता आणि त्याखाली सॅटिन ब्रॅलेट दिसत होते. 'इनरवेअर अॅज आउटवेअर' ट्रेंडचा हा एक धाडसी दृष्टिकोन म्हणायला हवा आणि हीच मिउ मिउची खास शैली आहे.

जान्हवीने गुडघ्यापर्यंत उंच चमकदार मोजे, काळे लोफर्स आणि काळ्या बकेट हॅटने आपला लूक पूर्ण केला. तिने कॅज्युअली फर स्टोल देखील घातला ज्यामुळे तिचा संपूर्ण लूक विंटेज आणि मॉडर्नचा परिपूर्ण संगम झाला. सॉफ्ट ग्लॅम मेकअप आणि मोकळ्या केसांसह जान्हवीने पायऱ्या आणि हॉटेलच्या बेडवर अशी पोज दिली की जणू ती जागा स्वतःच्या मालकीची आहे. थोडक्यात, तो फक्त एक पोशाख नव्हता तर सहज आणि उत्साही मूड होता, असेच म्हणावे लागेल.

जान्हवीला तिची चुलत बहीण आणि स्टायलिस्ट रिया कपूरने स्टायल केले होते. हा लूक सामान्यतः चांगला मानला जात नसे. परंतु मिउ मिउ च्या कल्पकतेमुळे त्याला एक स्टायलिश अंदाज मिळाला असून आता तो डिझायनरच्या पसंतीचा ठरत आहे. रियाने इन्स्टाग्रामवर जान्हवीचे फोटो शेअर केले असून त्यात ती कार्यक्रमासाठी तयार होताना दिसत आहे.

फॅशन व्यतिरिक्त जान्हवी तिच्या प्रोजेक्ट्ससाठी देखील चर्चेत आहे. लवकरच ती सिद्धार्थ मल्होत्राबरोबर 'परम सुंदरी'मध्ये दिसणार आहे. ही केरळच्या बॅकवॉटरवर आधारित क्रॉस-कल्चरल प्रेमकथा असून चित्रपट २५ जुलै २०२५ रोजी प्रदर्शित होईल. याशिवाय ती सनी लिओनीच्या 'तुलसी कुमारी'मध्ये वरुण धवन, रोहित सराफ, सान्या मल्होत्रा आणि मनीष पॉल यांच्यासोबत दिसणार आहे.





# रश्मिकाने जोडीदार शोधला?



अभिनेत्री रश्मिका मंदान्ना आगामी 'कुबेरा' मध्ये दिसणार आहे. यामध्ये ती अभिनेता धनुष आणि नागार्जुनसोबत पडदा शेअर करणार आहे. अलिकडेच एका भव्य कार्यक्रमात चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला. त्यावेळी रश्मिकाने अनेक मनोरंजक गोष्टी शेअर केल्या. यावेळी तिला कथित बॉयफ्रेंड विजय देवरकोंडाबद्दल देखील विचारण्यात आले. मात्र तिच्या एका उत्तराने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. तसे पाहायला गेले तर रश्मिका आणि विजयच्या कथित अफेअरच्या बातम्या दररोजच चर्चेत असतात. मनोरंजक गोष्ट अशी आहे की, आतापर्यंत दोघांनीही अशा बातम्यांवर मौन बाळगले आहे. त्यामुळे लोक केवळ अंदाज बांधत आहेत.

कार्यक्रमात रश्मिकाला विचारले गेले की, ती प्रत्येकाच्या कोणत्या गुणांची कॉपी करू इच्छिते? दिलेल्या यादीमध्ये धनुष, नागार्जुन अक्किनेनी आणि रश्मिकाचा 'पुष्पा २' मधील सह-अभिनेता अल्लू अर्जुन अशी नावे समाविष्ट होती. त्यावर उत्तर देताना तिने यादीतील नावे बाजूला ठेवत विजयचे प्रत्येक गुण अंगीकारायचे आहेत, असे उत्तर देत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विजय देवरकोंडाचा प्रत्येक गुण सगळ्यांनी अंगिकारण्यासारखा आहे, असेही ती म्हणाली.

काही काळापूर्वी 'फिल्मफेअर'साठीच्या एका मुलाखतीत विजय देवरकोंडाला विचारण्यात आले होते की, त्याला भावी पत्नीमध्ये कोणते गुण हवे आहेत. यावर, अभिनेत्याने उत्तर दिले होते की तो सध्या जीवनसाथी शोधत नाही. पण आता रश्मिकाने मात्र जीवनाचा जोडीदार म्हणून त्याला निवडले असल्याचे अनेकांचे मत आहे. अर्थात काहीही असले तरी तूर्तास तरी 'कुबेरा'ला प्रेक्षक कसे स्विकारतात हे बघणे गरजेचे आहे.

# लवकरच मिळेल गोड बातमी

अभिनेत्री कियारा अडवाणी लवकरच आई होणार आहे. पती आणि अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रासोबत लग्नाच्या दोन वर्षांनंतर ती पहिल्या बाळाचे स्वागत करणार आहे. सध्या हे जोडपे आपला प्रत्येक क्षण खास बनवताना दिसत आहे. अलीकडेच कियाराने बेबी शॉवरची झलक दाखवली असून ती सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाली आहे. चाहते तिच्या या फोटोला मोठ्या प्रमाणात लाईक्स देत आहेत.

फादर्स डेच्या निमित्ताने, कियाराने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर अनेक फोटो शेअर केले होते. त्यापैकी एक तिच्या बेबी शॉवरचा देखील होता. या फोटोमध्ये कियारा सिद्धार्थसोबत केक कापताना दिसून असून केकवर 'ओह बेबी' लिहिलेले आहे. केक खूप सुंदर आहेच त्याचबरोबर शेजारी सुंदर फुले देखील ठेवलेली दिसतात. मागील सजावटही लक्षवेधी आहे.

कियाराच्या चेहऱ्यावरील तेज अगदी पाहण्यासारखे आहे. दोघेही केक कापण्यापूर्वी डोळे मिटून प्रार्थना करताना दिसत आहेत. कियाराने या खास दिवसासाठी पिवळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. चाहत्यांना कियाराचा हा फोटो खूप आवडला असून ते येणाऱ्या सुंदर क्षणांसाठी जोडप्याला शुभेच्छा देत आहेत. कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्राने मोठ्या थाटामाटात लग्न केले होते. लग्नापूर्वी बराच काळ ते एकमेकांना डेट करत होते. आता हे जोडपे पालक होण्यास सज्ज तसेच खूप उत्सुक आहे. तेव्हा त्यांच्याकडून कधी गोड बातमी मिळते ते पाहू या.

# मनोरंजनाचे चौकार-षटकार



तो गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने लोकांचे मनोरंजन करत आहे. टीव्हीवर राज्य केल्यानंतर त्याचा शो ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवरही यशस्वी ठरला आहे. तीन यशस्वी सीझननंतर आता 'द ग्रेट इंडियन कपिल शो' चा चौथा सीझन ओटीटीवर सुरू होणार आहे. याद्वारे नवज्योत सिंग सिद्धू सहा वर्षांनी पुनरागमन करत आहेत. विशेष म्हणजे ते अर्चना पुरण सिंगसह जज म्हणून शोमध्ये सामील होणार आहे. कपिल शर्माच्या शोच्या पहिल्या भागात सलमान खान पाहुणा म्हणून दिसणार असून त्याचा एक व्हिडिओ देखील सोशल मीडियावर लीक झाला आहे. कॉमेडी शो प्रेमी सिद्धूच्या पुनरागमनाबद्दल खूप उत्सुक आहेत. अर्चना पुरण सिंग हसताना आणि गप्पा मारताना दिसताना मात्र सिद्धू पाजी उत्तमोत्तम कविता आणि मजेदार शैलीने सर्वांचे मनोरंजन करतात, असे त्यांचे चाहते सांगतात.

सोशल मीडियावरील वापरकर्ते अर्चना आणि सिद्धूपैकी कोण शो साठी जास्त फी घेते, हा प्रश्नही विचारत आहेत. अर्चना पुरण सिंग यांनी आत्तापर्यंत अनेक कॉमेडी शो जज केले आहेत. लाफिंग क्वीन अर्चना एका एपिसोडसाठी सुमारे १० ते १२ लाख रुपये घेते. यावरुनच शोच्या बजेटची कल्पना येऊ शकते.

कपिल शर्माच्या शो मधील सिद्धू पाजी यांचे काही जुने एपिसोड अजूनही चर्चेत आहेत. त्यांची अनोख्या शैली आणि कपिलची निवेदनाची मजेदार पद्धत हे दोन्ही प्रेक्षकांना भावले आणि शो ला भरपूर प्रसिद्धी मिळाली. त्यामुळे आता पुन्हा एकदा शोमध्ये परतत असल्यामुळे पुर्वीसारखे वातावरण पाहता येईल, असा प्रेक्षकांना विश्वास आहे. सिद्धू पाजी कपिलच्या शो प्रति एपिसोड ३० ते ४० लाख रुपये घेणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# 'हाऊसफुल ५' चा बोलबाला


प्रत्येक प्रकारची भूमिका अतिशय उत्तम प्रकारे साकारणाऱ्या निवडक कलाकारांच्या यादीत अक्षय कुमारचे नाव समाविष्ट आहे. कॉमेडी शैलीतील त्यांच्या काही हिट फ्रँचायझी चित्रपटांचा उल्लेख अनेकदा केला जातो. यामध्ये 'हाऊसफुल' चाही समावेश आहे. नुकताच साजिद नाडियाडवालाच्या या हिट फ्रँचायझी चित्रपटाचा पाचवा भाग प्रदर्शित झाला. यावेळी निर्मात्यांनी हा चित्रपट एका नवीन योजनेसह बॉक्स ऑफिसवर आणला. स्वाभाविकच याची प्रचंड चर्चा झाली आणि मोठ्या कलाकारांच्या सहभागामुळे कलेक्शनवरही मोठा परिणाम झाला.



'हाऊसफुल ५' मध्ये अक्षय कुमार, रितेश देशमुख आणि अभिषेक बच्चन यासारखे मोठे स्टार मुख्य भूमिकेत आहेत. कथेत एक मोठा ट्विस्ट येतो, जेव्हा तिघेही जॉलीच्या वेशात जहाजावर पोहोचतात आणि स्वतःला खरा जॉली म्हणवतात. यानंतर विनोदी प्रवास सुरू होतो आणि अॅक्शनने भरलेला हा चित्रपट लोकांना मनमुराद हसवण्याच्या अनेक संधी देतो. तथापि, काही लोकांनी त्यावर अश्लीलता पसरवण्याचा आणि मुलींना वस्तू म्हणून सादर केले असल्याचा आरोप केला आहे. अर्थातच दिग्दर्शक तरुण मनसुखानी यांनी, लोकांचा दृष्टिकोन असा आहे की, त्यांना यावरच अधिक लक्ष केंद्रित करायचे आहे... असे म्हणत आरोप फेटाळून लावले आहेत.

थोडक्यात प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळत असला तरीही कलेक्शनच्या बाबतीत चित्रपट सातत्याने पुढे जातो आहे. पहिल्या दिवशी त्याने भारतात २४ कोटींनी सुरुवात केली. त्यानंतर सलग दोन दिवस ३० कोटींहून अधिक कमाई केली. आठवड्याच्या शेवटी पुन्हा एकदा चित्रपटाच्या कमाईचा आलेख वरच्या दिशेने जाताना दिसला.

रविवारी त्याने पूर्ण ताकद दाखवली. शनिवारी चित्रपटाने भारतात ९.५ कोटींची कमाई केली. वीकेंड संपल्यानंतरही हा सिलसिला सुरू आहे. त्यामुळेच चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ झाली असून एकूण कलेक्शनने १५० कोटींचा आकडा ओलांडला आहे. या लोकप्रिय चित्रपटाने पहिल्या १० दिवसांमध्येच भारतात १५० कोटींहून अधिक कमाई केली असल्याचे कळते. त्यामुळेच येत्या काळात कमाई किती वाढते हे पाहणे रंजक ठरेल.




# मरणाने अकाली गाठले

अभिनेत्री करिश्मा कपूरने पती संजय कपूरशी घटस्फोट घेतला असला तरी त्यांच्या अचानक निधनाने तिच्यासह सर्वांनाच धक्का बसल्याचे स्पष्ट दिसले. ५३ वर्षीय संजय कपूर यांचे लंडनमध्ये पोलो सामन्यादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूपूर्वीचा त्यांचा शेवटचा फोटो नुकताच समोर आला आहे. हा फोटो त्यांच्या पोलो संघाने पोस्ट केला असून त्यात संजय यांच्या चेहऱ्यावर हास्य आणि डोळ्यात एक वेगळीच चमक दिसते आहे. फोटोमध्ये संजय टीमची जर्सी घालून हसत मित्रासोबत फोटो काढताना दिसत आहेत.

संपूर्ण टीमने संजय यांना भावनिक श्रद्धांजली वाहिली आहे. संघाने सोशल मीडियावर लिहिले की, 'आज आपण प्रिय मित्र संजय कपूर यांच्या स्मरणार्थ कार्टियर ट्रॉफीचा अंतिम सामना खेळत आहोत. काही दिवसांपूर्वी मैदानावर त्यांचे दुखद निधन झाले. आमचे कर्णधार आणि मार्गदर्शक जयसल सिंग संजय त्यांच्या सन्मानार्थ एक मिनिट मौन पाळण्यासाठी संघात सामील होतील.'

संजय कपूर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना, ऑरियस पोलो क्लबनेही सोशल मीडिया पोस्टमध्ये श्रद्धांजली वाहिली. त्यामध्ये लिहिले होते, 'ऑरियस संघाला मोठा धक्का बसला आहे. संजय, तुम्ही ऑरियस संघाचा आत्मा होता. तुम्ही खरे प्रेरणास्थान होता. हा वारसा कायम राहील.' एकूणच संजय कपूर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन होण्याची बाब मान्य करणे, अनेकांना कठीण गेले. त्यांनी चुकून काहीतरी गिळले आणि त्यामुळे मृत्यू ओढावला, असे सांगण्यात येत आहे.

# गोंडस शुभेच्छा



प्रत्येक दिवस वडिलांसाठी आणि वडिलांमुळे असला तरी फादर्स डे खास पद्धतीने साजरा केला जातो. अलिकडेच तो आनंदाने साजरा झाला. या निमित्ताने अनेकांनी वडिलांवरील प्रेम व्यक्त केलेले दिसले. अभिनेत्री अनुष्का शर्मानेही सोशल मीडियावर एक खास नोट शेअर केली जी तिची मुलगी वामिकाने वडील विराट कोहलीसाठी लिहिली होती. यासोबतच अभिनेत्रीने सोशल मीडियावर स्वत:च्या वडिलांसोबतची एक झलक देखील शेअर केली.

हे दोन फोटो बरेच चर्चेत राहिले. पहिला फोटो अभिनेत्रीच्या वडिलांचा असून त्यात दोघे एका सेलिब्रेशनमध्ये दिसत आहेत. त्याच वेळी, दुसरा फोटो वामिकाच्या नोटचा आहे.


तिने फादर्स डे निमित्त विराट कोहलीसाठी काही लिहिलेला आहे. वामिकाची गोंडस सही नोटच्या खाली आहे. चिठ्ठीत लिहिले आहे की,

**तो माझ्या भावासारखा दिसतो**
**तो खूप मजेदार आहे**
**मला गुदगुल्या करतो**
**मी त्याच्यासोबत खेळते**
**मी त्याच्यावर खूप प्रेम करते**
**तो माझ्यावर खूप प्रेम करतो**
**फादर्स डे च्या शुभेच्छा**
**....वामिका...!**

हे फोटो शेअर करताना अनुष्काने लिहिले, 'मी ज्या पहिल्या माणसावर प्रेम केले आणि ज्या पहिल्या माणसावर आमची मुलगी प्रेम करते... जगभरातील सर्व सुंदर वडिलांना फादर्स डे च्या शुभेच्छा..' अनुष्का शर्माची ही पोस्ट सोशल मीडियावर खूप व्हायरल होत असून चाहत्यांना ती खूप आवडली आहे.

चाहत्यांनी अनुष्का शर्माला शाहरुख खानसोबत 'झिरो' मध्ये शेवटचे पाहिले आहे. मात्र लवकरच ती 'चकदा एक्सप्रेस' मध्ये दिसणार आहे.

# 'समसारा'चा वेगळा अंदाज



अत्यंत वेगळ्या धाटणीच्या, दमदार स्टारकास्ट असणाऱ्या 'समसारा' ची सध्या बरीच चर्चा आहे. त्याचा अतिशय धीरगंभीर टीजर पोस्टर लाँच झाल्यापासून उत्सुकता वाढलेली दिसली. एकूणच 'समसारा' हा एक उल्लेखनीय चित्रपट ठरणार असल्याची आशा बाळगणे चुकीचे ठरणार नाही.

संचय प्रॉडक्शन्स प्रस्तुत 'समसारा'ची निर्मिती पुष्कर योगेश गुप्ता यांनी केली असून, दिग्दर्शनाची जबाबदारी सागर लढे यांनी सांभाळली आहे. कथा सागर लढे, विश्वेश वैद्य आणि समीर मानेकर यांची असून, पटकथा सागर लढे आणि समीर मानेकर यांनी लिहिली आहे. समीर मानेकर, निहार भावे यांनी संवादलेखन केलं आहे. विश्वेश वैद्य यांनी संगीत, अक्षय राणे छायांकनाची जबाबदारी निभावत आहेत. सायली संजीव, ऋषी सक्सेना, पुष्कर श्रोत्री, डॉ गिरीश ओक, नंदिता धुरी, प्रियदर्शनी इंदलकर, तनिष्का विशे, यशराज डिंबळे, कैलास वाघमारे, साक्षी गांधी अशी उत्तम स्टारकास्ट त्यात आहे.

'समसारा'ची कथा पौराणिक कथांशी जोडलेली असून ती देव आणि असुरांमधील युद्धावर आधारित आहे. एका असुराला भानवीच्या जुळ्या बहिणींचा नाश करायचा असतो. यामुळे देव आणि असुरांमध्ये युद्ध सुरू होते. चित्रपटात मृत्यूची देवता यम आणि जीवनाची देवी यमी यांची कथा देखील दाखवण्यात आली आहे.

'देव, दानव, असुर, मानव यांच्यातला एक पडला तरी दुसरा उभा राहतो. हे चक्र सुरू राहतं. पण हे चक्र थांबवायला काळ स्वत: जागा होतोय. आम्ही येतोय....' असे शब्द धीरगंभीर आवाजात ऐकू येतात आणि त्यातून 'समसारा' चं पोस्टर समोर येतं. हे अत्यंत कल्पक पोस्टर असलं तरी त्यातून कथानकाचा नेमका अंदाज बांधता येत नाही. 'काहे दिया परदेस' नंतर 'सम सारा' हा ऋषी सक्सेना आणि सायली संजीव यांचा पहिला मोठा प्रोजेक्ट आहे. यापूर्वी दोघांनीही एका म्युझिक व्हिडीओमध्ये एकत्र काम केलं आहे. ते 'लाजिरा' या हिट सिंगल ट्रॅकच्या म्युझिक व्हिडीओमध्ये एकत्र दिसले होते. या गाण्यात ऋषी सक्सेना पारंपरिक लूकमध्ये दिसला होता.

# देशातील पहिल्या 'शास्त्र संग्रहालय'चा शुभारंभ

## धर्मग्रंथांच्या जोरावर भारत पुन्हा विश्वगुरू बनेल : एकनाथ शिंदे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाराणसी :** 'हे संग्रहालय आपल्या प्राचीन ग्रंथांची ज्ञान परंपरा नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्याचं काम करेल. वेदांच्या ज्ञानानेच देशाचं रक्षण होईल. तसेच, हे संशोधन केंद्र आजच्या तरुणांना सनातनच्या प्राचीन ज्ञान परंपरेशी जोडण्याचं काम करेल, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे उपमुख्ममंत्री एकनाथ शिंदे यांनी वाराणसी इथं केलं. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते शुक्रवारी (27 जून) वाराणसी इथं देशातील पहिल्या 'शास्त्र संग्रहालय आणि संशोधन केंद्रा'चं उद्घाटन झालं. यावेळी ते बोलत होते.

प्राचीन ग्रंथसंपत्तीचं जतन होणार : वाराणसीतील दुर्गाकुंड येथील धर्मसंघ भवनात 'शास्त्र संग्रहालय आणि संशोधन केंद्र'चे उद्घाटन एकनाथ शिंदेंच्या हस्ते झालं. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीनं प्राचीन ग्रंथसंपत्तीचं जतन करणे, त्याचं डिजिटलायझेशन करणं आणि समाजात त्याचा प्रसार करणं, हे या संग्राहलयाचं उद्दिष्ट आहे.

प्राचीन ग्रंथांची माहिती उपलब्ध होईल: एकनाथ शिंदे हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. यावेळी ते म्हणाले की, "या कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्याला प्राचीन ज्ञान परंपरेशी जोडलं गेल्यासारखं वाटत आहे. याद्वारे तरुणांना त्यांच्या प्राचीन ग्रंथांची माहिती मिळविण्यात मदत होईल. तसेच, धर्म संघाची ही संस्था केवळ मंदिर नाही तर भारतीय संस्कृती आणि एकतेचं प्रतीक आहे.".



"पंतप्रधान मोदींनी आपल्याला विकास आणि वारशाचा संदेश दिला आहे. प्राचीन ग्रंथांच्या डिजिटायझेशनला प्रोत्साहन देण्याचं काम हे पंतप्रधान मोदींच्या नियोजनाचा पुरावा आहे. आपला देश पुन्हा एकदा धर्मग्रंथ आणि शास्त्राच्या बळावर विश्वगुरू होण्याच्या दिशेनं पुढे जाईल. यासाठी सरकार आणि समाजाला खांद्याला खांदा लावून काम करावं लागेल. वसुधैव कुटुंबकमच्या भावनेनं भारलेला सनातन हिंदू हा केवळ एक धर्म नाही तर सर्वसमावेशक समाज उभारणीचा आधार आहे".

**- एकनाथ शिंदे**

## 'कांटा लगा गर्ल' अभिनेत्री शेफाली जरीवाला चे निधन



**नवी दिल्ली :** 'कांटा लगा गर्ल' आणि 'बिग बॉस 13' मधील स्पर्धक शेफाली जरीवाला (४२) हिचं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झाले. शेफालीची प्रकृती खालावल्यानंतर तिचे पती पराग त्यांनी यांनी तिला कूपर रुग्णालयात नेले. परंतु रुग्णालयातील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. शेफालीच्या मृत्यू संपूर्ण मनोरंजन क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

२००२ मध्ये 'कांटा लगा' या अल्बममधील गाणे रिलीज झाले आणि ते रिलीज होताच सर्वांच्या पसंतीस उतरले. या गाण्यामुळे शेफाली जरीवालाला चांगली प्रसिद्धी मिळाली होती.

## राज्यात ५१ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**नाशिक :** राज्यातील ५१ पोलीस अधीक्षक आणि अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या बदल्या करण्यात आल्या असून त्यामध्ये नाशिक पोलीस आयुक्त नव्याने २ पोलीस उपयुक्त येणार आहे तर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधीक्षक पदी नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या गृह विभागाने शुक्रवारी सायंकाळी ५१ पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक दर्जाच्या पोलीस पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेले आहे. या बदल्यांमध्ये नासिक पोलीस आयुक्तलयातील गुन्हे शाखेचे पोलीस उपयुक्त प्रशांत बच्छाव यांची नासिक वरून नागरी हक्क संरक्षण कोल्हापूर येथे बली करण्यात आलेली आहे तर नाशिक पोलीस आयुक्तालयातील मुख्यालय येथे कार्यरत असलेले पोलीस उपयुक्त चंद्रकांत खांडवी यांची धुळे येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे पोलीस अधीक्षक या पदावरती बदली करण्यात आलेली आहे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वलावडकर यांची छत्रपती संभाजी नगर पोलीस आयुक्तालयात पोलीस उपयुक्त या पदावर बदली करण्यात आलेली आहे तर गुप्तवार्ता विभागामध्ये कार्यरत असलेले गीता चव्हाण यांची महाराष्ट्र पोलीस अकॅडमी मध्ये पोलीस अधीक्षक या पदावर बदली करण्यात आलेली आहे.


नाशिकमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सुरक्षा विभागामध्ये गुप्तवार्ता या पदावरती कार्यरत योगेश चव्हाण यांची नाशिक पोलीस आयुक्तालयात उपयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे.



## मुस्लिम तरुणाची अनोखी विठ्ठल भक्ती

**लातूर :** पंढरपूरच्या विठुरायाच्या भाविक भक्त मोठा आहे. लाखोंच्या संख्येने भाविक पंढपुरात दाखल होत असून आलेले भाविक विठुरायाच्या चरणी सोने-चांदीचे दागिने अर्पण करत असतात. तर एका मुस्लिम तरुणाची विठू माऊलीवर असलेली अनोखी श्रद्धा आणि भक्ती पाहण्यास मिळाली आहे. या तरुणाने विठ्ठलावर असलेल्या श्रद्धेतून आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर चांदीचा मुकुट विठुरायाला अर्पण केला.

लातूर येथील एका मुस्लिम तरुणाच्या अनोख्या विठ्ठल भक्तीचे दर्शन यातून झाले आहे. दगड फोडून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या गणी सय्यद या मुस्लिम तरुणाने विठुरायाच्या चरणावर एक लाख रुपये किंमतीचा एक किलो वजनाचा चांदीचा मुकूट अर्पण केला आहे. देव, देश आणि धर्म एक असल्याचा संदेशही सय्यद यांनी आपल्या कृतीतून दिला. मशिदीमध्ये जावून नमाज पठण करणारा गणी सय्यद शुक्रवारी थेट गाभाऱ्यात जाऊन विठुरायाच्या चरणावर लीन झाला. त्याच्या या अनोख्या विठ्ठल भक्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याच्या भक्तीने भारावलेल्या विठ्ठल मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज यांनी त्याचा सत्कार केला.



## तामिळनाडू पॅसेंजर रुळाहून घसरल्याने प्रवाशांमध्ये गोंधळ

**चेन्नई :** तामिळनाडूच्या रानीपेट जिल्ह्यात एक प्रवासी ट्रेन रुळावरून घसरली, त्यानंतर काही काळ गोंधळ उडाला. जिल्ह्यातील चित्तेरी रेल्वे स्थानकावर अरक्कोनम-कटपाडी मेमू पॅसेंजर ट्रेन (66057) रुळावरून घसरल्याची बातमी समोर आली आहे. शनिवारी पहाटे तामिळनाडूच्या रानीपेट जिल्ह्यातील चित्तेरी रेल्वे स्थानकावर लोको पायलटला असामान्य आवाज आल्याने आणि त्याने तातडीने ट्रेन थांबवल्याने संभाव्य दुर्घटना टळली. सुरुवातीच्या अहवालांमध्ये रेल्वे रुळावरून घसरल्याचे दिसून आले होते, घटनास्थळावरील दृश्यांमध्ये ट्रॅकचा एक भाग स्पष्टपणे खराब झालेला दिसत होता. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, चित्तेरी स्थानकावरून ट्रेन सुटल्यानंतर काही वेळातच मोठा आवाज ऐकू आला, ज्यामुळे पायलटला त्वरित प्रतिसाद मिळाला. घटनास्थळी असलेल्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने पुष्टी केली की कोणतीही दुखापत किंवा जीवितहानी झाली नाही. मात्र यानंतर, दक्षिण रेल्वेने स्पष्टीकरण दिले आहे की कोणतेही डबे रुळावरून घसरलेले नाहीत. ही घटना चित्तेरी स्टेशनवरील यार्ड रोड १ लूप लाईनवर घडली.

# सेबीची आणखी मोठी कारवाई!

## देशभरात ३०० कोटीहून मोठ्या घोटाळा संशयितांची चौकशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** ऑनलाईन शेअर बाजारात 'Buy Multibagger Stocks' अशा आकर्षक जाहिरातींबरोबरच अनैसर्गिकपणे बाजारातील किंमतीवर प्रभाव पाडणे, तसेच 'या शेअर्समध्ये गुंतवणूक करा' अशाप्रकारे जाहिरातीतून गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या अनेक बाजारातील व्यक्तीविरुद्ध सेबीने धाड सत्र सुरू केले आहे. सेबी कडून हे धाड सत्र तसेच त्यांच्या ठिकाणी 'सर्च ऑपरेशन' सुरू केल्याचे सेबीने जाहीर केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

'याद्वारे हे स्पष्ट केले जाते की सेबीने जून २०२५ मध्ये पंप आणि डंपिंगच्या काही स्क्रिपच्या संदर्भात अनेक ठिकाणी शोध आणि जप्तीची कारवाई केली आणि गुन्हेगारी पुरावे जप्त केले आहेत. या प्रकरणाचा तपास प्रगतीपथावर आहे.' असे सेबीने पंप आणि डंपिंग घोटाळ्याच्या बाबतीत भाष्य केले आहे. भूलथापा देऊन सामान्य लोकांना विशिष्ट समभागात शेयर मध्ये गुंतवणूक करा सांगून नंतर त्या शेअर्समध्ये घसरण झाल्यानंतर नफेखोरी करणारी टोळी बाजारात आहे. अशा व्यक्तीविरुद्ध सेबीने अहमदाबाद, मुंबई, पुणे, गुरूग्राम अशा विविध ठिकाणी १८ जूनला धाडी टाकल्या होत्या. आता सेबी या 'Pump and Dump' प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

या कारवाया करताना विशिष्ट १५ ते २० शेल कंपन्यांना सेबीने लक्ष केले आहे. ज्यामध्ये काही कंपन्यांच्या प्रवर्तकांनी स्वतःच्या शेअर्समध्ये वाढ करण्यासाठी आणि नंतर विक्रीस काढून नफेखोरी करण्यासाठी हा घोटाळा केला होता. त्यावर सेबीने आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रकरणी सेबीने कॉर्पोरेट फाईल्स, तसेच रबर स्टॅम्प व इतर सामग्री जप्त केली आहे. सुरुवातीला प्रसारमाध्यमांनी म्हटल्याप्रमाणे हा ३०० कोटींचा घोटाळा होता मात्र नेमका मूल्यांकनाचा आकडा समोर आलेला नाही.

पंप अँड डंप योजनेत, घोटाळेबाजांशी संबंधित संस्था प्रथम स्टॉकची किंमत वाढवण्यासाठी स्वतःच्या कंपन्यांचे शेअर्स मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यास सुरुवात करतात आणि एकदा किंमत लक्षणीय रीत्या वाढली की ते किरकोळ गुंतवणूक दारांचे लक्ष वेधून घेतात आणि नंतर हेराफेरी करणारे शेअर्स अल्पज्ञानी किरकोळ गुंतवणूकदारांना विकून नफा मिळवून स्टॉकमधून बाहेर पडतात. थोडक्यात कृत्रिम नफेखोरी करतात.

सेबी या प्रकरणी सेबी काही टेलिग्राम चॅनेल्सवर लक्ष ठेवून आहे. जिथे सेबी नोंदणीकृत नसलेल्या विश्लेषकांकडून या समभागांची जाहिरात केली जात आहे आणि हे टेलिग्राम गट देखील हेरफेर योजनेचा भाग आहेत का त्याची सखोल चौकशी सुरू आहे.

### पंप आणि डंप घोटाळा म्हणजे नक्की काय?

● प्रवर्तक बनावट कंपन्या तयार करतात आणि त्यांना मालकीचे व्यापारी म्हणून नोंदणीकृत करतात जे नंतर कंपनीचे समभाग खरेदी आणि विक्री करतील. भूतकाळात अशी अनेक उदाहरणे आहेत जिथे सेबीने स्मॉल आणि मिड कॅप कंपन्यांच्या प्रवर्तकांना त्यांच्या स्टॉकमध्ये फेरफार करण्यासाठी पकडले होते.

# आश्रमात घुसून महिला कीर्तनकाराची हत्या

## शांतीच्या स्थळी हिंसेचा कहर!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर :** वैजापुरातील एका आश्रमात महिला कीर्तनकाराची अज्ञात मारेकऱ्याने दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हत्येमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आहेत.

ह. भ. प. संगीताताई महाराज असं हत्या झालेल्या कीर्तनकार महिलेचं नाव आहे. त्या वैजापूर इथं एका आश्रमात राहत होत्या. २७ जून रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञाताने आश्रमात घुसून त्यांची हत्या केली. आरोपीनं अमानुषपणे त्यांच्या डोक्यावर दगडाने अनेक प्रहार केले. हे वार इतके गंभीर होते की, या हल्ल्यात संगिताताई रक्ताच्या थारोळ्यात पडल्या आणि यातच त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झालं. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आहे. फॉरेन्सिक पथक आणि श्वान पथक देखील घटनास्थळी दाखल झाले असून, ठोस पुरावे गोळा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.



महिला कीर्तनकाराची दगडाने ठेचून हत्या होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या घटनेमुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. आता या प्रकरणात नेमके काय खुलासे होणार? हे पाहणे महात्त्वाचे ठरणार आहे.

### भीतीचे वातावरण

संगीताताई पवार यांच्या हत्येमुळे चिंचडगावसह वैजापूर तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रचंड संताप आणि भीती पसरली आहे. या घटनेमुळे आश्रम आणि धार्मिक स्थळांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# इराणची इस्रायलवर जहरी टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इराण :** सध्या इराण-इस्रायलमध्ये तणावपूर्ण शांतता असली तरी इराण आणि इस्रायलमधील नेत्यांमध्ये शाब्दिक युद्ध सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराक्ची यांनी इस्रायलवर जहरी टीका केली आहे. तसेच ही टीका करत असताना डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरही खोचक टिप्पणी केली आहे. मंत्री अब्बास अराक्ची यांनी इस्रायलवर टीका करताना म्हटलं की,'डॅडीकडे मदत मागण्याशिवाय पर्याय नव्हता.' तसेच यावेळी अब्बास अराक्ची यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्याबाबतही खोचक टिप्पणी केली.

गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेला इराण-इस्रायलमधील संघर्ष काही प्रमाणात निवाळल्याचं दिसून येत आहे. इराण आणि इस्रायलमध्ये युद्धबंदी झाल्यानंतरच्या पहिल्याच भाषणात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी अमेरिकेला इशारा दिला होता. खामेनी यांनी म्हटलं होतं की, "भविष्यात अमेरिकेच्या हल्ल्यांना मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ला करून प्रत्युत्तर दिले जाईल. इराण कधीही अमेरिकेसमोर शरणागती पत्करणार नाही आणि भविष्यात होणाऱ्या हल्ल्याची त्यांना मोठी किंमत मोजावी लागेल", असे इराण आणि इस्रायलमधील युद्धबंदीनंतरच्या त्यांच्या पहिल्याच भाषणात आयातुल्ला अली खामेनी यांनी म्हटलं होतं.



**पुणे :** कोलंबियातील बेलो येथील भूस्खलनाच्या परिसरात समुदाय सदस्य आणि बचाव गट मदत कार्य करत असताना

# जागतिक तणाव झाला कमी, सोन्याच्या दरात घसरण




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सोन्याचे दर अक्षरशः 'क्रॅश' झाले आहेत. सलग पाचव्या दिवशी सोन्याचा दरात ही झालेली मोठी घसरण म्हणावी लागेल. 'गुडरिटर्न्स' संकेतस्थळावरील माहितीनुसार, आज सोन्याच्या २४ कॅरेट प्रति ग्रॅम दरात ६० रूपयांनी घसरण झाली आहे. तर २२ कॅरेट प्रति ग्रॅम दरात ५५ रुपयांनी घसरण झाली आहे. परिणामी सराफा बाजारात २४ कॅरेट प्रति ग्रॅम दर ९७४२ रूपये तर २२ कॅरेट प्रति ग्रॅम दर ८९३० रूपये आहे. १८ कॅरेट प्रति ग्रॅम किंमत ४५ रूपयांनी घसरत ७३०७ रूपयांवर पोहोचली आहे. २४ कॅरेट प्रति तोळा किंमत ६०० रूपयांनी घसरल्याने ९७४२० रूपयावर पोहोचली आहे. २२ कॅरेट प्रति तोळा किंमत ५५० रूपयांनी घसरत ८९३०० रूपयांवर पोहोचली आहे. १८ कॅरेट प्रति तोळा किंमत ४५० रूपयाने घसरत ७३०७० रुपयांवर पोहोचली आहे.

आज मुंबई, पुण्यासह अनेक प्रमुख शहरांत २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दर ९७४२ रुपये आहे. दिल्लीत मात्र दर प्रति ग्रॅम ९८५७ रूपये आहे दिल्ली, बडोदा, अहमदाबाद वगळता इतरत्र किंमत ९७४२ रूपये प्रति ग्रॅम कायम आहे. मुंबई पुण्यासह बहुतांश शहरात २२ कॅरेट प्रति ग्रॅम किंमत ८९३० रूपये तर १८ कॅरेट प्रति ग्रॅम किंमत ७३६० रूपये आहे. एमसीएक्सवरील सोन्याचा निर्देशांक १.६१% घसरला होता. तर आंतरराष्ट्रीय बाजारातील गोल्ड फ्युचर निर्देशांक यामध्ये काल १.३६% घसरण झाली होती. सोन्याच्या दरात २७ जूनला चार आठवड्यातील सर्वाधिक घसरण नोंदवली गेली. स्पॉट गोल्ड निर्देशांकात काल १% घसरण झाली होती ज्यामुळे दर ३२९३ डॉलर प्रति औंसवर गेले होते, जे २ जूननंतर सर्वाधिक घसरलेले दर आहेत. गेल्या आठवड्यात सोन्याच्या निर्देशांकात २% घसरण झाली आहे. ही मोठी घसरण मानली जाते.

इस्त्राईल व इराण यांच्यातील युद्धाविराम करून अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी मध्यस्थी केली होती. ज्याचा मोठा फायदा अमेरिकन बाजारातील परिस्थितीवर झाला.

शनिवारी सोन्याचा दर ९४४२० रू पयांच्या निचांकी पातळीवर गेला आहे. ब्युरो ऑफ इकॉनॉमिक अनालिसिसच्या आर्थिक आकडेवारीवरून असे दिसून आले की मे महिन्यातील वैयक्तिक वापर खर्च निर्देशांक, फेडरल रिझर्व्हचा पसंतीचा महागाई मापन, दरवर्षी २.३% वाढला, जो एप्रिलच्या २.१% पेक्षा जास्त होता जो अंदाजानुसार होता कोर पीसीई जो अस्थिर अन्न आणि ऊर्जेच्या २.५% वरून २.७% वर पोहोचला आणि २.६% एकमत अंदाज ओलांडला गेला.



“ जसप्रीत बुमराहने सांगितले की तो फक्त तीन सामने खेळणार आहे आणि मी विचार करतोय की, हे जगजाहीर करायची गरज होती का? हे गुपित ठेवता आले असते, तसं का केलं नाही? आपण आपला संघही जाहीर करत नाही. त्यामुळे मालिकेला रवाना होण्यापूर्वी आणि इथे दाखल झाल्यानंतरही ही गोष्ट वारंवार का सांगितली जात आहे? इंग्लंडला विचार करायला लावा.. तुम्हाला ज्या खेळाडूंसह खेळायचेय ते तुम्ही खेळा. तो एक सामना खेळून झाला आहे आणि उर्वरित चारपैकी दोन सामनेच खेळणार आहे. ही गोष्ट चांगली नाही. जर त्याने दुसरी कसोटी खेळली, तरी उर्वरित तीनपैकी तो एकच खेळले. हे प्रतिस्पर्ध्याला माहित आहे आणि त्याचा ते नक्कीच फायदा उचलणार. बुमराह ही टीम इंडियाची ताकद आहे आणि तो खेळणार नाही म्हटल्यावर इंग्लंडला बळ येईल. त्यानुसारच ते खेळपट्टी तयार करतील. त्यामुळे जसप्रीत बुमराहचं गुपित सांगायला नको हवं होतं.

— आकाश चोप्रा

# सिंथेटिक ट्रॅक फक्त ॲथलेटिक्स खेळाडूंसाठीच

## दोन वर्षापुर्वी आठ कोटी रुपये खर्च करून नव्याने तयार केलेला ट्रॅक पुन्हा खराब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या सणस मैदानातील सिंथेटिक ट्रॅक हा फक्त ॲथलेटिक्स खेळाडूंसाठीच आहे. त्याचा गैरवापर होत असल्याचे क्रिडा विभागाच्या निदर्शनास आले. त्यामुळे काही निर्बंध घातले गेले आहे, याविषयी तेथील प्रशिक्षकांची बैठक सोमवारी बोलाविण्यात आली आहे.

सारसबाग जवळील सणस मैदानावर महापालिकेने पंधरा वर्षापुर्वी ॲथलेटिक्ससाठी सिंथेटिक ट्रॅक तयार केला होता. हा ट्रॅक खराब झाल्याने दोन वर्षापुर्वी आठ कोटी रुपये खर्च करून नव्याने ट्रॅक तयार केला. या ट्रॅकच्या वापरासंदर्भात नियमावली तयार केली गेली होती. या ठिकाणी महापालिकेने सहा प्रशिक्षकांना प्रशिक्षणासाठी ट्रॅक उपलब्ध करून दिला. या ट्रॅकवर ॲथलेटिक्स खेळाडूंबरोबरच नवख्या खेळाडू आणि पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी सराव करण्यास सुरुवात केली होती. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर पोलिस भरतीच्या मुलांना मनाई केली गेली. या ट्रॅकवर तीन वर्षापेक्षा अधिक मुले - मुलींना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली गेली होती. परंतु , सदर ट्रॅकपेक्षा तीन ते बारा वयोगटातील मुलांना मातीच्या ट्रॅकवर सराव प्रशिक्षण द्यावे अशी भुमिका महापालिकेच्या क्रिडा विभागाने घेतली. या मुलांना सिंथेटीक ट्रॅकवर इजा होण्याची शक्यता असते, हे कारण विभागाने दिले आहे. यासंदर्भात महाविकास आघाडीने क्रिडा विभागाला निवेदन दिले असुन, याविषयी क्रिडा अधिकारी किशोरी शिंदे यांनी या मैदानावर प्रमाणापेक्षा अधिक खेळाडू सराव करीत असल्याने ट्रॅक खराब होत आहे. नुकतेच दहा लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. सदर ट्रॅक कोणालाही बंद केला नाही, अपप्रचार केला जात आहे. याविषयी सोमवारी बैठक बोलविली आहे, असे सांगितले.



### मैदानाची माहिती

- सिंथेटिक ट्रॅक व मैदानाचे उद्‌घाटन २७ मे २०२३
- मैदानासाठी ८ कोटी रुपये खर्च
- मैदानावर ५०० ते ६०० खेळाडू करतात सराव

- सारसबागेच्या शेजारील क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या सात एकर जागेवर कै. बाबूराव सणस मैदान महापालिकेने २०० ६ मध्ये विकसित केले आहे. या मैदानावरील ४०० मी. ८ लेन सिंथेटिक ट्रॅकचे नूतनीकरण करण्याचे काम भवन विभागाकडून मे २०२३ अखेर करण्यात आले. महापालिकेच्या क्रीडा धोरण २०१३ च्या नियमावलीप्रमाणे मैदानाचा व सिंथेटिक ट्रॅकचा वापर होत आहे.

### महाविकास आघाडीचे उपस्थित केलेले मुद्दे...

- एका प्रशिक्षकांनी २५ खेळाडूंना शिकवणे बंधनकारक आहे. पण ॲथलेटिक्स खेळामध्ये ७२ खेळ प्रकार आहेत.
- तसेच जिल्हास्तरीय स्पर्धा वयोगट सहा वर्षापासून ते खुल्या गटापर्यंत आहेत. मग २५ खेळाडू कशाप्रमाणे घ्यायचे आहेत हा प्रश्न क्रीडा विभागाला पडला नाही का ?
- २५ खेळाडू हे त्यांच्या खेळ प्रकारानुसार निवडायचे आहेत का उंचीनुसार, वजनानुसार, वयोगटांनुसार, खेळ प्रकरणानुसार २५ घ्यायचे आहेत का ?. क्रीडा क्षेत्रात आपल्याला खेळ वाढवायचा आहे, पुण्यातून जास्तीत जास्त खेळाडू राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावर तयार झाले पाहिजेत त्या उद्दिष्टाने खेळाडू तयार करण्याचे काम सणस मैदानावर होत आहे.
- असंच कोणताही विचार न करता क्रीडा विभागाने खेळाडूंना, बाल खेळाडूंना गेले १५ दिवसांपासून मैदानापासून वंचित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे हे अतिशय चुकीचे आहे, प्रशिक्षक, खेळाडू, पालक, स्थानिक नागरिक यांवर हा होणारा अन्याय आहे.
- क्रीडा विभागाच्या पत्रानुसार मैदानातील सिंथेटिक ट्रॅकचा दर्जा तपासणी महत्वाचे आहे, लहान मुलांच्या आती वापराने सणस मैदानावरील ट्रॅक खराब झाला, आहे असे बोलणे उचित नाही.
- ठेकेदाराच्या, अधिकाऱ्यांच्या चुकीचे खापर या बालकांच्या डोक्यावरती फोडू नये.
- हा ट्रॅक बनवण्यामध्येच भ्रष्टाचार झाला आहे का?
- २ वर्षात जर ट्रॅक खराब झाला असेल तर नक्कीच काम निष्कृठ दर्जाचे झाले असेल त्यामुळे त्याची तत्पर चौकशी तज्ञ व्यक्तींच्या मार्फत व्हावी.

“ सणस मैदानावरील सिंथेटिक ट्रॅक खराब झाला होता. त्याची दुरुस्ती करण्याचे पत्र भवन विभागाकडून देण्यात आले होते. ट्रॅकची पाहणी करुन दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आले. दुरुस्तीच्या कामासाठी ट्रॅक बंद ठेवण्यात आला होता. या ट्रॅकवर १२ वर्षाखालील खेळाडूंनी सराव करुन नये, कारण त्यांना शारिरीक इजा होण्याचा धोका असतो. ॲथलेटिक्स खेळाडूंना सराव करताना इतर खेळाडूंची त्रास होत असल्याच्या तक्रारी आहेत. मध्येच एखादा खेळाडून आल्यामुळे ॲथलेटिक्स खेळाडूंना इजा होत असल्याचे समोर आले आहे. तक्रारी आल्यानुसार याबाबक सोमवारी (दि. ३०) बैठक लावण्यात आली आहे. **- किशोरी शिंदे,** प्रमुख, क्रीडा विभाग, पुणे महापालिका.

# ८ वर्षांच्या पुणेकर चिमुकलीचे पराक्रम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अवघ्या आठ वर्षांच्या वयात पुण्यातील आरिष्का लढ्ढा हिने नुकताच अफ्रिकेतील सर्वोच्च शिखर माउंट किलीमंजारो सर करत थक्क करणारी कामगिरी केली आहे. तिच्या आई डिंपल लढ्ढा यांच्यासह जूनच्या दूसरा आठवड्यात ही मोहीम यशस्वी करून तिने आपल्या नावावर एक आगळीवेगळी नोंद केली आहे. या धाडसामुळे संपूर्ण राज्यात आणि देशभरातून या माय-लेकींचं मोठं कौतुक होत आहे.

आरिष्का आणि डिंपल यांनी नुकतेच किलीमंजारो वर सलग आठ दिवसांची कठीण चढाई करत यशस्वी कामगिरी केली. अत्यंत प्रतिकूल हवामान, उंचीमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी आणि थकवणाऱ्या चढाईवर मात करत त्यांनी हा पराक्रम गाठला. शिखरावर पोहोचल्यावर त्यांनी भारत सरकार आणि भारतीय सैन्याच्या ‘ऑपरेशन सिंदूर’ ला वंदन करत देशभक्ती व्यक्त केली.

आरिष्का ही कोथरूडमध्ये राहते. तिने याआधी केवळ सहा वर्षांची असताना तिच्या आईसोबत एव्हरेस्ट बेस कॅम्प यशस्वीरीत्या गाठला होता. अशा प्रकारचा ट्रेक करणारी ती त्या वेळी सर्वांत लहान भारतीय मुलगी ठरली होती, असा तिच्या कुटुंबाचा दावा आहे.

आरिष्काची आई डिंपल लढ्ढा या स्वतः ट्रेकर, मॅरेथॉन धावपटू आणि सायकलस्वार आहेत. मुलीच्या प्रत्येक पावलाला मार्गदर्शन आणि साथ देणाऱ्या डिंपल यांनी तिच्यात लहान वयातच साहसीवृत्ती बिंबवली. आरिष्काचे वडील कौस्तुभ लढ्ढा यांना साहसी क्रीडांमध्ये विशेष रस नसला तरी ते दोघींना सतत प्रोत्साहन देत असतात.

ही कामगिरी केवळ धाडसाची नाही, तर एका नव्या पिढीच्या आत्मविश्वासाची आणि प्रेरणेची ओळख ठरली आहे. आरिष्काने सिद्ध केले आहे की, वयापेक्षा महत्त्वाची असते ती इच्छाशक्ती आणि तयारी!

## मुंबईचा संघ २३७ धावा करूनही हरला

**नवी दिल्ली :** सलग १० सामने गमावणाऱ्या सेटल ऑरकस संघाने मेजर लीग क्रिकेट स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठ्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करून इतिहास रचला. निकोलस पूरनचे शतक अन् तजिंदर सिंगच्या वादळी ९५ धावांच्या जोरावर एमआय न्यूयॉर्क संघाने २३७ धावांचा डोंगर उभा केला होता. शेवटच्या चेंडूपर्यंत हा सामना गेला अन् शिमरोन हेटमायरने ट्वेंटी-२०तील सर्वात अनुभवी खेळाडू किरॉन पोलार्डच्या शेवटच्या चेंडूवर षटकार खेचून थरारक विजय मिळवून दिला. न्यू यॉर्क टीमची सुरुवात साजेशी झाली नाही. क्विंटन डी कॉक ( १) पुन्हा एकदा अपयशी ठरला. मोनांक पटेल २० धावांवर गेराल्ड कोएत्झीच्या गोलंदाजीवर माघारी परतला.

# सणस मैदान बंद करण्याच्या निर्णयाचा होतोय तीव्र निषेध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या सणस मैदान बंद करण्याच्या निर्णयाचा क्रीडा समन्वय समिती, महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे तीव्र निषेध करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांपासून क्रीडा क्षेत्राकडे महापालिका व राज्य शासन दुर्लक्ष करत असून, सणस मैदानासारख्या अत्यंत आवश्यक क्रीडा केंद्रावर बंदी घालणे हे तर थेट क्रीडापटूंवरील अन्यायच असल्याचे मत समितीचे अध्यक्ष लतेंद्र भिंगारे यांनी व्यक्त केले आहे.

भिंगारे म्हणाले, “गेल्या १२ वर्षांपासून मनपाने क्रीडा प्रशिक्षण वर्गांसाठी भाड्याचे दर हजारोंमध्ये वाढवले. यामुळे अनेक संस्था बंद पडल्या. खेळाडूंना योग्य सुविधा उपलब्ध करून देण्याऐवजी त्यांना मैदाने वापरण्यापासूनही दूर ठेवले जात आहे. यामुळे युवक-युवतींना क्रीडाऐवजी वाममार्गाकडे वळण्याची शक्यता वाढत आहे.”

महापालिकेत सध्या लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय अधिकारीच सर्व निर्णय घेत आहेत. मात्र या निर्णयांवर राज्य सरकारचा दबाव असून, तो जनतेच्या हिताच्या विरोधात जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

सणस मैदानासह सर्व क्रीडा प्रशिक्षण केंद्रे खेळाडूंना तात्काळ खुली करावीत, अशी मागणी समितीने महापालिका आयुक्त आणि राज्याचे क्रीडामंत्री यांच्याकडे केली आहे.

“शालेय शिक्षणातही क्रीडेला भर पुरवला जात नाही. त्यामुळे मैदानांवर मर्यादा घालणे म्हणजे क्रीडा संस्कृतीच नष्ट करण्याचा प्रकार आहे,” असेही भिंगारे यांनी स्पष्ट केले.

# कबीर बोरसे, सेजल जाधव यांना विजेतपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे व केपीआयटी व सोलींको प्रायोजित १२,१४ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटातील पीएमडीटीए मानांकन मंदार वाकणकर टेनिस अकादमी ब्रॉन्झ सिरिज २०२५ स्पर्धेत कबीर बोरसे, सेजल जाधव यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

सप महाविद्यालय टेनिस कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत १२ वर्षांखालील मुलांच्या गटात दुसऱ्या मानांकित कबीर बोरसेने अकराव्या मानांकित प्रांशूल पुजारीचा १-६, ६-३, १०-६ असा पराभव करून विजेतपद पटकावले. याआधीच्या उपांत्य फेरीच्या लढतीत अकराव्या मानांकित प्रांशूल पुजारीने सहाव्या मानांकित रिदित नवलेचा ९-१ असा तर, दुसऱ्या मानांकित कबीर बोरसेने तिसऱ्या मानांकित विआन पेंडुरकरचा ९-६ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.



याच मुलींच्या गटात अंतिम सामन्यात अव्वल मानांकित सेजल जाधव याने चौथ्या मानांकित कनिष्का नारूकाचा ७-५, ६-१ असा पराभव करून विजेतपद पटकावले.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूना करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण डॉ. स्वरूप सावननूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक मंदार वाकणकर आणि स्पर्धा निरीक्षक निहारिका गोरे आदी उपस्थित होते.

## बांगलादेशाची जिरली! श्रीलंकेने डावाने दुसरी कसोटी जिंकली



**नवी दिल्ली :** पहिल्या कसोटीत धावांचा एव्हरेस्ट उभ्या करून मोठ्या थाटात मिरवणाऱ्या बांगलादेशाची कोलंबो येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेने जिरवली. श्रीलंकेच्या ४५८ धावांचा टप्पा त्यांना दोन्ही डावात मिळूनही ओलांडता आला नाही. श्रीलंकेने एक डाव व ७८ धावांनी विजय मिळवून बांगलादेशविरुद्धची ही मालिका १-० अशी जिंकली. फिरकीपटू प्रभात जयसूर्याने दुसऱ्या डावात पाच विकेट्स घेऊन श्रीलंकेच्या विजयात महत्त्वाचा वाटा उचलला. कसोटीच्या पाचव्या दिवशी तासाभरात बांगलादेशचे चार फलंदाज माघारी परतले. बांगलादेशचा पहिला डाव २४७ धावांवर गुंडाळला गेला. असिथा फर्नांडो व सोनल दिनुषा यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या, तर विश्वा फर्नांडोने २ बळी टिपले. बांगलादेशकडून सलामीवीर शादमान इस्लाम ( ४६), मुश्फिकर रहिम ( ३५), लिटन दास ( ३४) व तैजूल इस्लाम ( ३३) यांनी चांगला खेळ केला. प्रत्युत्तरात श्रीलंकेने पहिल्या डावात ४५८ धावा चोपल्या आणि २१२ धावांची आघाडी घेतली. पथूम निसंकाने २५४ चेंडूंत १९ चौकारांसह १५८ धावांची खेळी केली. त्याने सलामीला लाहिरू उदारा ( ४०) सह ८८ धावांची भागीदारी केली. दिनेश चंडिमल ( ९३) व कुसल मेंडिस ( ८४) यांनी दमदार खेळ करून बांगलादेशसमोर डोंगर उभा केला. बांगलादेशच्या तैजूल इस्लामने पाच, तर नईम हसनने ३ विकेट्स घेतल्या.

## झिम्बाब्वेसमोर चॅम्पियन्स दक्षिण आफ्रिकेने गुडघे टेकले



**नवी दिल्ली :** जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा २०२३-२५ विजेत्या दक्षिण आफ्रिका संघाला दुबळ्या झिम्बाब्वेने धक्के दिले. झिम्बाब्वे-दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या पहिल्या कसोटी सामन्याला आजपासून सुरूवात झाली. नाणेफेक जिंकून दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. या मालिकेसाठी आफ्रिकेने बऱ्याच नव्या चेहऱ्यांना संधी दिली. चेन्नई सुपर किंग्सचा स्टार डेवॉल्ड ब्रेव्हिस याचे कसोटीत पदार्पण झाले. त्याचवेळी क्वेना मफाका व लॉअन- ड्रे प्रेटोरियस हे युवा खेळाडू आज प्लेइंग इलेव्हनमध्ये आहेत. १८९६ नतंर प्रथमच आफ्रिकेच्या संघात दोन किशोरवयीन खेळाडू खेळत आहेत. टेम्बा बवुमाच्या गैरहजेरीत आफ्रिकेच्या नेतृत्वाची जबाबदारी केशव महाराजकडे सोपवली गेली आहे. डब्लूटीसी फायनल विजेत्या संघातील बरेच खेळाडू या दौऱ्याचा भाग नाही. त्यामुळेच झिम्बाब्वेच्या गोलंदाजांनी वर्चस्व गाजवलेले पाहायला मिळतेय. डावाच्या सहाव्या षटकात सलामीवीर टॉनी डी झॉर्झी ( ०) याला तनाका चिवांगाने झेलबाद केले. त्यानंतर आफ्रिकेने सावध खेळ केला आणि १३व्या षटकात झिम्बाब्वेला दुसरे यश मिळाले. दुसरा सलामीवीर मॅथ्यू ब्रित्झके ( १३) यालाही चिवांगाने बाद केले. पाठोपाठ डेव्हिड बेडिंगहॅम ( ०) याचाही अडथळा चिवांगाने दूर केला. त्यामुळे आफ्रिकेची अवस्था ३ बाद २३ अशी दयनीय झाली. वियान मुल्डर व प्रेटोरियस यांनी डाव सावरण्यासाठी जोर लावला होता. पहिलाच सामना खेळणाऱ्या प्रेटोरियसने २ चौकार व १ षटकार मारून आक्रमकता आणली. पण, मुल्डर ( १७) रन आऊट झाल्याने आफ्रिका पुन्हा सावध झाली.

## जसप्रीत बुमराहला खरंच विश्रांतीची गरज आहे!

**नवी दिल्ली :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना बर्मिंगहॅमच्या एजबेस्टन मैदानावर खेळवला जाणार आहे. पहिला सामन्यातील पराभवानंतर शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ पुनरागमन करण्याच्या उद्देशाने मैदानात उतरणार आहे. मात्र, हा सामना भारतासाठी सोपा नक्कीच नाही. कारण या मैदानावर भारताला आजपर्यंत एकदाही इंग्लंडला पराभूत करता आलेलं नाही. अशातच या सामन्यात भारतीय संघ जसप्रीत बुमराह शिवाय मैदानात उतरण्याची शक्यता आहे. संघ व्यवस्थापन दुसऱ्या कसोटीसाठी बुमराहला विश्रांती देण्याच्या विचारात आहे. खरं तर इंग्लंड दौऱ्याला सुरुवात होण्यापूर्वीच जसप्रीत बुमराह सर्व पाच सामने खेळणार नाही हे स्पष्ट झालं होतं. कारण यापूर्वी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर बुमराहला सर्व पाच सामन्यात खेळण्यात आलं होतं. त्यामुळे त्याला दुखापतीचा सामना करावा लागला होता. सध्या जसप्रीत बुमराहवर गोलंदाजीचा सर्वाधिक ताण आहे. मागच्या एका वर्षात बुमराहने कसोटी क्रिकेटमध्ये इतर कोणत्याही वेगवान गोलंदाजापेक्षा जास्त षटके गोलंदाजी केली आहे. बुमराहने 1 जानेवारी 2024 पासून ते आतापर्यंत एकूण 410.4 षटके गोलंदाजी केली आहे. त्याच्याशिवात कोणताही गोलंदाज 400 षटकांचा टप्पा पार करू शकलेलं नाही. गेल्या एक वर्षात मोहम्मद सिराजने एकूण 15 कसोटी सामने खेळले आहेत. या 15 सामन्यात त्याने 355.3 षटके गोलंदाजी केली आहे. बुमराह वेगवान गोलंदाजांमध्ये सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. एका वर्षाच्या कालावधीत त्याने 78 विकेट्स घेतल्या आहेत.



# लथिक राम ने इंटरनॅशनल मास्टरला बराबरीत रोखले



**पुणे :** सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयात सुरू असलेल्या ‘यू-इन-स्पोर्ट्स’ आंतरराष्ट्रीय खुल्या बुद्धिबळ मानांकन स्पर्धेच्या चौथ्या दिवशी महाराष्ट्राच्या लथिक राम याने धक्कादायक निकालाची नोंद केली. त्याने गुजरातच्या इंटरनॅशनल मास्टर राहुल संगमाला बरोबरीत रोखत मोठा अपसेट घडवला.

लथिक राम (रेटिंग - १७०१) याने पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळत २१३६ रेटिंग असलेल्या संगमाला रोखले. जवळपास ४०० गुणांचा रेटिंग फरक असूनही लथिकने अफलातून खेळ करत बरोबरी साधली. त्यामुळे सातव्या फेरीतील हा सामना सर्वांच्या चर्चेचा विषय ठरला.

**तिघेही महाराष्ट्रीयन खेळाडू आघाडीवर :** सातव्या फेरीअखेर ६ गुणांसह महाराष्ट्राचे अथर्व मडकर, प्रथमेश शेरला आणि शाश्वत गुप्ता हे तिघे खेळाडू संयुक्तपणे आघाडीवर आहेत. सातव्या फेरीतील प्रथमेश शेरला (महाराष्ट्र) (६) - पराभूत - अथर्व मडकर (महाराष्ट्र) (६), शाश्वत गुप्ता (महाराष्ट्र) (६) - विजयी - निलय कुलकर्णी (महाराष्ट्र) (५), अयान सोमाणी (महाराष्ट्र) (५.५) - बरोबरी - सुदीप पाटील (महाराष्ट्र) (५.५), लथिक राम (महाराष्ट्र) (५) - बरोबरी - राहुल संगमा (गुजरात-पेट्रोलियम बोर्ड) (५), श्रीराज भोसले (महाराष्ट्र) (५.५) - विजयी - गणेश ताजणे (महाराष्ट्र) (४.५), अलौकिक सिन्हा (महाराष्ट्र) (५) - बरोबरी - अमेय चौधरी (महाराष्ट्र) (५), अमर्त्य गुप्ता (दिल्ली) (५) - बरोबरी - ईश्वरी जगदाळे (महाराष्ट्र) (५), मेहफुज पठाण (महाराष्ट्र) (४.५) - पराभूत - ऋषिकेश कबनुरकर (महाराष्ट्र) (५.५), आदित्य सावळकर (महाराष्ट्र) (५) - विजयी - श्लोक माळी (महाराष्ट्र) (४), दिव्या पाटील (महाराष्ट्र) (५).


## जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धा

# प्रौढांच्या विभागात संतोष वाकराडकर विजेते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शारदा जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील प्रौढांच्या चाळीस वर्षावरील वयोगटाच्या एकेरीत विजेतेपद पटकावले आणि आपले अव्वल मानांकन सार्थ ठरविले. प्रौढांच्या दुहेरीत कृपाल देशपांडे यांनी ओंकार जोग यांच्या साथीत अजिंक्यपद पटकावले.

या स्पर्धेस शारदा ग्रुप व डेक्कन डाईज अँड केमिकल्स यांचे प्रायोजकत्व लाभले आहे. ही स्पर्धा पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने शारदा स्पोर्ट्स सेंटर येथे दिनांक १५ जून पर्यंत सुरू राहणार आहे. या मोसमातील ही पहिलीच मानांकन स्पर्धा आहे.



प्रौढांच्या चाळीस वर्षांवरील एकेरीच्या अंतिम फेरीत अग्रमानांकित संतोष वाकराडकर (टॉस अकादमी) यांनी आपल्याच क्लबचे सहकारी कृपाल देशपांडे यांना ११-४,११-७,७-११,११-६ अशा गेम्सने पराभूत केले. या सामन्यात दोन्ही खेळाडूंनी अष्टपैलू खेळ करीत प्रेक्षकांची मने जिंकली. कृपाल यांनी एक गेम जिंकून सामन्यात चुरस निर्माण केली होती मात्र वाकराडकर यांनी महत्त्वाच्या क्षणी खेळावर नियंत्रण मिळवले आणि विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

उपांत्य फेरीत वाकराडकर यांनी ओंकार जोग यांचा ११-८,११-७,११-६ असा सरळ तीन गेम्स मध्ये पराभव केला तर द्वितीय मानांकित कृपाल देशपांडे यांनी स्वानंद बेडेकर यांच्यावर मात केली. अटीतटीने झालेला हा सामना देशपांडे यांनी ११-६,१५-१३,६-११,८-११,११-५ असा जिंकला.

वाकराडकर यांची दुहेरी मुकुटाची संधी मात्र हुकली. दुहेरीमध्ये मात्र कृपाल व ओंकार या जोडीने वाकराडकर व दीपक कदम यांचा ११-४,११-८,१०-१२,६-११,१५-१३ असा पराभव केला. दोन्ही जोड्यांनी अष्टपैलू खेळाचा प्रत्यय घडवित सामना शेवटपर्यंत रंगतदार केला. मात्र कृपाल व ओंकार यांनी शेवटच्या गेममध्ये अचूकता दाखवली आणि विजयश्री खेचून आणली.

#रा